



रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, २६ मार्च २०२३

# काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांचे
# तेलही गेले, तूपही गेले ?

भारतीय मतदारांनी २०१४ भ्रष्टाचाराच्या प्रश्नावरून काँग्रेस पक्षाला सत्तेतून खाली खेचले.नंतर २०१९ च्या निवडणुकीत मतदारांनी पुन्हा विकासाच्या मुद्द्यावर मोदी सरकारवर शिक्कामोर्तब केले.पण गांधी परिवार हा पराभव अजूनही पचवू शकलेला नाही.तो भाजपा व मोदींना सत्तेवरुन घालण्यासाठी आतूर झालेला आहे.लोकशाहीत सत्ताधारी पक्षावर अंकूश ठेवण्यासाठी विरोधी पक्ष सक्षम असला पाहिजे,यात दुमत नाही.पण दुर्देवाने काँग्रेस पक्षाने सकारात्मकपेक्षा नकारात्मक टीकेला महत्व देत आलेला आहे.यामुळे पक्षाचे नुकसान होत आहे. राहूल गांधी हे वादग्रस्त विधाने व आरोप करण्यात देशातच नव्हे,आता जगप्रसिध्द झाले आहेत. कारण त्यांनी नुकतेच ब्रिटन जाऊन भारतीय लोकशाही सपुष्टाच आली आहे,असे वक्तव्य केले होते.त्यावरुन संसदेचे कामकाज ठप्प पडले आहे.तरी गांधी माफी मागण्यास तयार नाहीत. त्यांचा भारतातील लष्कर कारवाईवर,न्यायसंस्था,तपास यंत्रणेवर विश्वास राहिलेला नाही. गांधी हे स्वातंत्र्यवीर सावरकर,पंतप्रधानपदाचा सतत अवमान करत आले आहेत.राफेल प्रकरणावरुन न्यायालयाचा आधार घेत त्यांनी 'चौकीदार चोर' असे म्हंटले होते.पण त्यांना २०१९ मध्ये शपथपत्र दाखल करून माफी मागितली होती.काँग्रेस पक्षाचा सतत पराभव होत गेल्याने गांधी यांनी पक्षाचे अध्यक्षपदही नाकारले. तरीही गांधी घराण्याचे भक्त असलेले पक्षातील नेते त्यांना देव मानून पूजा करतात.त्यांचे नेतृत्व मान्य करतात.

यात गांधी घराणे सूडाने पेटले आहेत.कारण भाजपाने स्व. राजीव गांधी तसेच श्रीमती सोनिया,राहुल गांधीवर भ्रष्टाचाराचे आरोप केल्याने,त्याचा त्यांना बदला घ्यावयाचा आहे.काँग्रेस नेते आणि चाटूकार मिडीया त्यांचे कौतूक करत असतात. आता "पप्पू' पास झाला आहे,ते एक परिपक्व नेते आहेत.ते अधिक आक्रमक झाले आहेत,त्यामुळे मोदी सरकार अडचणीत येत आहेत,असे म्हणून त्यांचे नेतृत्व "लाँच' केले जाते.पण त्यांचे नेतृत्व 'लाँच' होत नाही. काँग्रेस मोदी सरकारच्या प्रत्येक निर्णयाचा विरोध करत आलेला.त्यात तो समाधान मानत आहे.संसदेत त्यांनी 'अदानी व मोदी रिस्ता क्या है' असा प्रश्न विचारत थेट पंतप्रधान मोदीवर भ्रष्टाचाराचे आरोपकेले,तसेच या प्रकरणाची संसदीय समितीमार्फत चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.पण सर्वोच्च न्यायालयाने याबाबत समिती नियुक्त केली ती मान्य नाही.गांधी म्हणजे धर्म राज,सत्यवान मानले जातात.गांधी परिवार जे आरोप सत्यच असतात! चौकशी समिती आमच्या संमतीने व निकाल आम्ही देऊ!असा राजकीय बालहट्ट करत आहेत.काँग्रसकडे अदानी व मोदी यांच्यातील भ्रष्टाचाराचे पुरावे असतील तर सर्वोच्च न्यायालयात जाण्याचे धाडस करत नाहीत.केवळ तथ्यहीन आरोप व बेताल विधान करणे हेच त्यांच्या अंगलट आलेले आहे. त्यातील शिक्षा झालेले प्रकरण म्हणजे.कर्नाटक कोलार येथील सभेत १३ एप्रील २०१९ रोजी त्यांनी ललित मोदी व नीरव मोदी यांचे नाव घेत त्यांनी सर्वच मोदी आडनावाचे चोर कसे ? असे विधान केले. यावरून भाजपाचे आमदार व माजी मंत्री पूर्णेश मोदी यांनी जातीसमुहाची बदनामी केल्याचा खटला दाखल केला होता.त्यावेळी तेथील निवडणुक अधिकाऱ्यांनी त्याबाबतची व्हिडीओ केलेला आहे.याबाबत गांधी यांना बाजू मांडण्यासाठी सूरत न्यायालयात तीन- चार वेळा चकरा मारल्या. त्यांनी आपण निर्दोष आहोत असल्याचे म्हंटले होते.यात न्यायालयात दोन्ही बाजूने सुनावणी आणि युक्तीवाद झाला. त्यावेळी त्यांनी जाती समुहाची माफी मागितली असती,तर ही वेळ असली असती. पण त्यांचा अंहकार व त्यांना कायद्याचा चुकीचा सल्ला दिला गेला.त्यामुळे खटल्याची सुनावणी झाली.त्यानंतर १७ मार्चला न्यायधीशांनी निकाल राखून ठेवला होता. यात गांधी व काँग्रस पक्षाला निकाल आपल्याच बाजूने लागेल असा विश्वास होता.पण सुरत न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश एच एच वर्मा यांनी दि.२३ मार्च रोजी निकाल दिला.त्यात गांधी यांना भा.द.वि.५०० अन्वये दोषी मानून दोन वर्षाची शिक्षा सुनावली.हा निकाल विरोधात जाताच काँग्रेस पक्ष नेत्यांनी न्यायालयाच्या विरोधात टिप्पणी करण्यास सुरूवात केली.यात काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खडगे यांनी निकालावर प्रश्न निर्माण केले.ते म्हणाले,' आम्हाला माहित होते,न्यायाधीशांची बदली करणे,तरी पण आमचा न्यायसंस्थेवर विश्वास आहे'.

राजस्थानचे काँग्रेस नेते व मुख्यमंत्री गहिलोत व छत्तीसगडचे बघेल यांनी तर सीमा पार केली.या नेत्यांनी तर न्यायालयावर दबाब असल्याचे म्हंटले.आहे.न्यायालयाचा निकाल गांधी यांच्या बाजूने लागला असता तर हेच काँग्रेस नेते लोकशाही आणि न्यायसंस्थेच्या विरोधात बोलले असते काय?देशात अनेक राजकीय नेत्यांना न्यायालयाने शिक्षा झालेली आहे.अलाहाबाद न्यायालयाने १९७५ मध्ये श्रीमती इंदिरा गांधी यांचे विरोधात निकाल दिला होता. बिहारचे नेते लालू प्रसाद यादव यांना शिक्षा झाली आहे.१९९५ मध्ये महाराष्ट्रात भाजपा व शिवसेनेची युती होती. ज्येष्ठ समजसेवक अण्णा हजारे यांनी समाज कल्याण मंत्री घोलप यांचे विरोधात भ्रष्टाचाराचा आरोप करत आंदोलन केले.त्यामुळे घोलप यांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. घोलप हे अण्णांच्या विरोधात न्यायालयात गेले.तेथे घोलप विरोधात भ्रष्टाचाराचे योग्य पुरावे देता आले नाहीत.न्यायालयाने अण्णांना ३ महिन्याची साधी कैदेची शिक्षा सुनावली गेली.न्यायालयाने शपथपत्राच्या अटीवर सोडण्याचे म्हंटले होते.पण अण्णांनी जेलमध्ये जाणे पसंत केले. तेंव्हा गांधी परिवारासाठी वेगळा न्याय मागणे चुकीचे आहे. १९७७ मध्ये जनपा पक्षाने श्रीमती इंदिरा गांधी यांना अटक केली होती. त्यामुळे मध्ये देशात मध्यावधी निवडणूका झाल्या.त्यात श्रीमती गांधी सहानूभूती मिळाली व पक्षाने ३५१ जागेवर मिळविला आहे. राहूल गांधी यांना न्यायालयाने दोषी ठरविले याची पक्षाला खंत नाही,उलट गांधींमुळे सहानूभूती मिळेल पक्ष जिंकेल,असे वाटते. काँग्रेस नेते राहुल यांना 'बळीचा बकरा' करत आहेत.


कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

**आधुनिक केसरी**

**भारतीय राज्यघटनेत कलम १९ नुसार प्रत्येकाला मतस्वातंत्र्याचा व भाषण स्वातंत्र्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.पण याला कायद्याने मर्यादा आहे.काँग्रेस पक्षाचे वाडनाड येथील खा.राहूल गांधी यांना बेछूट आरोप व बेताल वक्तव्य करत असतात.त्या बेताल विधानाच्या या सवयीला न्यायालयाने दणका दिलेला आहे.त्यांनी "मोदी आडनावाचे चोर कसे काय असतात',असे विधान त्यांना भोवले.त्यांना मानहानीच्या आरोपाखाली त्यांना सुरत न्यायालयाने दोषा ठरवत दोन वर्षाची शिक्षा ठोठावली आहे.राहूल गांधी यांनीच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षपद नाकारले, आता खासदारकी गमावली आहे,त्यांचे पंतप्रधान होण्याचे स्वप्न धूळीला मिळाले आहे.त्यामुळे गांधी यांची अवस्था 'तेल ही गेले तूप गेले'अशी अवस्था झाली आहे.**




गांधी यांनी तर मी न्यायालयात दयेची भीक मागणार नाही,असे म्हंटले होते.पण त्यांनी निकालावर प्रतिक्रिया देताना' माझा सत्य व अहिंसा माझा धर्म'असे म्हंणत स्वतः आधुनिक महात्मा गांधी घोषित केले आहे.त्यांनी शहीद भगतसिंग,सुखदेश, राजगुरू यांची दि.२३ मार्च रोजी शहीद दिवस होता. त्याच दिवस गांधी यांना शिक्षा झाली.त्यामुळे त्यांना कोणी तरी शहीदांचे स्मरण करण्याची आठवण करून दिली.तसे त्यांनी तसे व्टिट केले. या परिवाराला इतर क्रांतीविरांची स्मरण कधीच होत नाही.हा निकालविरोधात गेल्याने ते स्वतः ला क्रांतीवीर समजत आहेत. म्हणजे 'बोट कापून शहीद, होण्याचा अजब प्रकार आहे.गांधी यांनी मोदी या ओ.बी सी.या समाजाला चोर म्हंटलेले आहे. त्यामुळे २०२३ मध्ये ७ राज्यात विधानसभा निवडणूका होणार आहेत.भाजपाने हा विषय उचलून धरला तर काँग्रेसला नुकसान होऊ शकते,असा अंदाज आहे.काँग्रेस पक्ष प्रत्येक घटनेत गांधीचा बचाव करण्यासाठी पुढे येत आहे.या निकालानंतर गांधी यांच्या निवासस्थानी काँग्रेस नेत्यांची बैठक झाली.यावरुन पक्षाचा 'रिमोट कंट्रोल' गांधी घराण्याकडे आहे.

काँग्रेसने 'भिऊ नका' असा संदेश दिला आहे.याचअर्थ काँग्रेसचा भारतील लोकशाही व न्यायसंस्थेवर विश्वास राहिलेला नाही. काँग्रेसचे प्रवक्ते तीच 'झील'ओढत आहेत.गांधी यांचे विधान राजकीय स्वरूपाचे आहे.त्यांचा आवाज म्हणजे देशाचा आवाज,तो आवाज मोदी सरकार दाबण्याचा प्रयत्न करत आहे.,असे म्हंटले जात आहे.काँग्रस पक्ष न्यायालयालच्या निकालाच्या विरोधात काँग्रेस कार्यकर्ते प्रदर्शने करत आहेत. गांधी यांना मानहानीचे आणखी काही खटल्यांना त्यांना सामोरे जावे लागणार आहे.त्यात २०१४ मध्ये राष्ट्रीय स्वंयसेवक संघाने महात्मा गांधी यांची हत्या केली,असा आरोप केला याचा महाराष्ट्रातील भिवंडी येथे भा.द. वि. ४९९ व ५०० खटला दाखल केला गेला आहे. तसेच गौरीलंकेश यांचे हत्यामागे आर.एस. एस. विचारधारा आहे,असे विधान केले.त्यावरून गुन्हा दाखल झाला आहे. २०१६ मध्ये असाम गुहाटी येथे आर.एस एस.ची बदनामी केल्याबाबत खटला दाखल आहे. २०१८ मध्ये 'मोदी चोर चोर' असे विधान केले,झारखंडला २० कोटी रूपायांचा दावा आहे. गांधी यांनी काही दिवसापूर्वी दुर्देवाने मी संसद सदस्य आहे असे म्हंटले होते.शेवटी ते खरे ठरले आहे!त्यांचे खासदारकी गेली आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार लोकप्रतिनिधी कायदा १९५१ च्या कलम ८ ( ३) नुसार दोन वर्षे या त्यापेक्षा अधिक शिक्षा झाल्यास लोकप्रतिनिधीचे सदस्य रद्द होते.या कायद्यात कलम ८ ( ४) नुसार लोकप्रतिनीधींचे सदस्य अपात्रेसाठी तीन महिन्याचा कलावधी होता.पण सर्वोच्च न्यायालयाने २०१३ मध्ये थॉम्पसन विरूध्द केंद्र या खटल्यात तीन महिन्याचा कालावधीची तरतूद रद्द करण्याचा निर्णय दिला.त्यामुळे गांधीची लोकसभेतून गच्छंती झालेली आहे.तत्कालिन पंतप्रधान मनमोहनसिंघ यांच्या कार्यकाळात या कायद्यान्वये २०१३- २०१४ या एका वर्षात चार खासदार, ३१ आमदारांचे सदस्यत्व रद्द केले गेले.यात सपा,भाजपा,काँग्रेसचे सदस्य आहेत. हा कायदा भ्रष्ट व दोषी ठरलेल्या व ज्यांना न्यायालयाने दोन वर्षाची शिक्षा दिली, त्यांचेच सदस्यत्व त्वरित रद्द करण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे.तेंव्हा गांधी हे एकटेच अपवाद कसे असू शकतात?. काँग्रस पक्ष आतापर्यंत या कायद्याच्या विरोधात रस्त्यावर का उतरला नाही? देशात गांधी परिवार म्हणजे भारत,लोकशाही, घटना,असा समज आहे.तो चुकीचा आहे.

न्यायालयासमोर सर्वच समान आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. देशात एक गांधी परिवाराला बचावासाठी लोकशाही,घटना,तपास यंत्रणा,न्यायव्यवस्थेला बदनाम करण्याचे राजकीय षडयंत्र रचले जात आहे.याच्या विरोधात देशातील विचारवंतानी,जागृत नागरिकांनी आवाज उठविला पाहिजे. तत्कालिन पंतप्रधानमनमोहनसिंघ यांनी २०१३ मध्ये नेते लालू प्रसाद यादव यांचे सदस्य वाचविण्यासाठी अध्यादेश आणला होता.हाचत्र अध्यादेश गांधींनी 'मूर्खपणाचा' म्हणत टराटरा फाडून टाकला.हा अध्यादेश लागू झाला असता तर त्यांचे सदस्य तीन तरी वाचवू शकले असते.तीच कुऱ्हाड पायावर मारून घेतली आहे.गांधी यांचे आम आदमी त्यांचे समर्थन करत आहे. याचे कारण केजरीवाल व त्यांचे नेते असेच बेछूट आरोप करत आले व त्यांनी चार प्रकरणात स्वतः माफी मागितली आहे.तेंव्हा काँग्रेस व आमआदमी पक्ष हे समान दु:खी आहेत.परवा दिल्लीत 'मोदी हटाव देश बचाव' अश्या घोषणेचे पोस्टर्स लावले गेले. त्यावर कायद्याने प्रकाशकाचे नाव टाकणे हे बंधनकारक असते. आम आदमीने पोस्टर्सवर प्रकाशकाचे नाव टाळले.त्यांचा इरादा वेगळाच होता.तो फसला आले!यावरुन ३६ गुन्हे दाखल झाले आहेत. इंग्रजाच्या काळात असे गुन्हे दाखल झाले होते काय? असा प्रश्न केजरीवाल यांनी केला आहे.काँग्रेस पक्ष व गांधी आणि आम आदमीला भारतात कोणते स्वातंत्र्य पाहिजे.या पक्षांना भारतीय घटनेप्रमाणे केलेले कायदे मान्य नाहीत काय?विरोधी पक्षाला भारतीय घटनेत अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावावर यांना बेछूट आरोप व बेताल विधान करण्याचा परवाना दिलेला आहे काय? २०११ काँग्रेस सरकारच्या भ्रष्टाचाराच्या विरोधात योग गुरू रामदेव बाबा व समर्थकावर दिल्ली पोलिसांनी रात्री अचानक हल्ला केला होता.तेंव्हा रामदेवबाबांचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न नव्हता काय? त्यांचेविरोधत एकाच दिवशी ८१ गुन्हे दाखल केले.

तसेच त्यांना एक हजार नोटीस दिल्या व त्यांचे विरोधात दोनशे खटले चालू आहेत.हे लोकशाहीत व्याख्येत बसते काय? याच दिवशी दिल्लीत आम आदमीचे नेते केजरीवाल मोदींना शिव्या देत होते.राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांचे दिल्ली निवासस्थानी विरोधी पक्षांची बैठक घेण्यात मग्न होते.यावेळी स.पा.चे कपील सिब्बल, रामगोपाल यादव,भारत राष्ट्र समितीचे केशव राव,ठाकरे शिवसेना गटाचे अनिल देसाई,माकपचे ए.करीम,भाकपचे डी. राजा, काँग्रेसचे दिग्विजयसिंह नेते उपस्थित होते. ममता बॅनर्जी यांना आघाडीत काँग्रस नको आहे, त्यामुळे या पक्षाचा नेता बैठकीला हजर नव्हता.तर पवारांना काँग्रेस पक्षाची ओढ लागली आहे.काँग्रेसशिवाय विरोधी पक्षाची आघाडी होऊ शकत नाही,असे पवारंचे म्हणणे आहे.पवारांना विरोधी पक्षाच्या आघाडीचा नेता होण्याची सुप्त इच्छा आहे.केवळ इ.व्ही. एम.चा बहाणा आहे. तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी ओरिसाचे मुख्यमंत्री पटनायक यांना भेटल्या आहेत.विरोधी पक्ष २०२४ मध्ये मोदींना पराभूत करण्यासाठी विरोधी पक्ष लंगोट बांधत आहे. पण विरोधी पक्षाकडे मोदींना पराभूत करण्यासारखा पहिलवान विरोधी पक्षाकडे नाही.त्यात प्रत्येक राज्याचा प्रादेशिक पक्ष हा मालक बनला आहे.इतर पक्षांनी तेथे निवडणूक लढविणे म्हणजे ती घुसखोरी समजली जाते.तेंव्हा विरोधी पक्षात जागा,नेतृत्वावरून एकमत होऊ शकत नाही.याच दिवशी महाराष्ट्र विधानसभेच्या आवारात राहूल गांधी यांनी सावकरांविषयी अपशब्द वापरले म्हणून भाजपाने त्यांच्या प्रतिमेला 'जोडो मारो, आंदोलन करण्यात आले.यावरुन विधानसभेत गोंधळ झाला.स्वातंत्र्य वीर सावकरांनी तर काळ्या पाण्याची शिक्षा भोगली.मग हे आधुनिक गांधी शिक्षेला का भीत आहेत?भारतीय स्वातंत्र्यात लढ्यात काँग्रेसचा मोठा नेता फाशीवर गेलेला नाही,लाठ्या खाल्या नाहीत, कोणत्याही काँगेस नेत्याला काळ्या पाण्याची शिक्षा भोगलेली नाही.तरी काँग्रेस देशाला स्वातंत्र्य मिळवून दिल्याचे खोटा इतिसास सांगतोय! भारत छोडा' आंदोलनामुळे इंग्रज भारत सोडून पळाले गेले. नाहीत,ते भारत सोडून जाण्याची वाट पहात होते.इंग्रजांना प. नेहरूंनी लेखी स्वरूपात माफी मागितली आहे.तेंव्हा ते माफीवीर नाहीत काय? काँग्रेस पक्ष हा न्यायालयाचा सन्मान करणार नाही,हे दिसतेय! न्यायालयाच्या या निकालाच्या विरोधात सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येवून मार्च काढला,तो न्यायालयाचा अवमान करणारा नाही काय?.वास्तविक यावर गांधी व काँग्रेस पक्षाला उच्च न्यायालयात तीन महिने अपील करण्याची संधी आहेः यात न्यायव्यवस्थेला राजकारणात ओढून मोठी चूक केली जात आहे गांधी यांचे विधान सभ्यतेला व संस्काराला मुळीच शोभणारे नाही, ते कायद्याचे उल्लंघन करणारे आहे.भारतीय न्याय संस्थेचा सन्मान करणे,प्रत्येक भारतीय नागरिकांचे कर्तव्य आहे. काँग्रेस,गांधी परिवार,व आता विरोधी पक्षाला याचा विसर पडलेला आहे,हे दुर्देव!.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# हरवलेल्या रानवाटा


असं म्हणतात की आपल्याला सुखानं जगायचं असेल तर भूतकाळाचा आणि भविष्यकाळाचा विचार करू नये. वर्तमान आपल्या हातात असतो. वर्तमानात आनंदात जगावे. ना कालचे दुःख, ना उद्याची चिंता ! तसे तर हे खरेच आहे. पण कधी कधी भूतकाळातील आठवणींचा कप्पा अचानक उघडला जातो. जणू एखादी सुगंधी कुपी अचानक उघडली जावी आणि त्यातल्या सुगंधाचा दरवळ सगळीकडे पसरावा तसे होते. मग दोनचार दिवस मन त्याच धुंदीत विहार करते. ध्यानीमनीही नसताना जणू कालचक्र उलटे फिरते आणि शरीर जरी वर्तमानात असलं तरी मन मात्र त्या काळात विहार करून येतं. परवाच्या दिवशी अचानक आमच्या गावी खूप दिवसांनी जाण्याचा योग आला. खरं तर खूप वर्षांनी. शहरातले पाहुणे माझ्याकडे आले आणि त्यांनी त्या गावाला जाण्याचा इच्छा व्यक्त केली. आता रस्ता चांगला झाल्याने अर्ध्या तासातच तिथे पोहोचता येतं. मग काय सकाळी सकाळीच पोहोचलो तिथे. तिथे जाताना एक अनामिक हुरहूर मनात होती. कसं असेल हे माझं गाव आता ? ओळखेल का ते मला ? या गावात जो विश्वास नावाचा छोटा मुलगा काही वर्षे वावरला, त्याच विश्वासला आता हे गाव स्वीकारेल ? बरोबर आहे, त्याने नाही ओळखले तर त्याला कसा दोष देता येईल ? मी तर आता अंतर्बाह्य बदललो आहे. बालपणीचा निरागस चेहरा, काळे कुरळे केस, बालपणीचा अवखळपणा, हुंदडणे सगळेच काळाच्या उदरात गडप झाले आहे. ती शेतं, ती झाडं, शेतातली ती विहीर की जिच्या थंडगार पाण्याने माझी अनेकदा तहान भागवली



होती, ती सगळी मला ओळखतील ? मला म्हणतील का, 'ये, खूप दिवसांनी आलास. विसरला होतास का रे आम्हाला ?'

खरं तर मी त्यांना विसरलेलो नसतोच. विसरणे शक्यही नसते. मनाच्या एका कोपऱ्यात ती सगळी मंडळी सुखाने राज्य करीत असतात. 'काळरूपी दिवसांचे पक्षी भुर्रकन उडून गेलेले असतात. आठवणींची फुले सुकली असली तरी त्यातील मंद मंद सुगंध कधी तरी वेड लावतो. अशा वेळी मो. रफीच्या एका सुरेख गाण्याच्या ओळी आठवतात.' याद न जाये, बिते दिनोंकी...' पण काळाच्या ओघात ती शेती विकली गेली असल्यामुळे त्या गावाला जायचे काही कारण उरत नाही. म्हणून खूप वर्षे त्या गावाला गेलो नाही एवढेच. पण शेती विकली तरी आठवणी थोड्याच विकल्या जातात ! त्या तर अनमोल असतात. खरं तर अशा बाबतीत परमेश्वराचे, मनाचे किंवा नियतीचे आभार मानावे तेवढे कमीच ! कारण सगळ्याच गोष्टी विकाऊ असलेल्या या जगात आठवणी, सुखदुःखे, प्रेम, भावभावना यासारख्या गोष्टी विकता किंवा खरेदी करता येत नाहीत. जर त्यांची खरेदी विक्री होतच असेल, तर त्या खऱ्या तरी कशा म्हणायच्या ? पण एक गोष्ट मात्र किती छान आहे ! या आठवणी, ही सुखदुःखे वाटून घेता येतात. त्यातून आनंद देता अन घेता येतो.

**क्रमशः**



## आनंदी पहाट

# स्वयंघोषित असणारे भामटे भ्रम निर्माण करतात

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अलीकडच्या काही वर्षांत बोगस डॉक्टरचं पितळ उघडं पडल्याच्या घटना आपणं ऐकत आलो आहोत. वैद्यकीय क्षेत्रातील कोणतंही शिक्षण घेतलेलं नसताना, बनावट सर्टिफिकेटच्या आधारे एखादी व्यक्ती स्वतःला डॉक्टर असल्याचं घोषित करण्याची हिम्मत कशी काय करू शकते? अशा डॉक्टरांनी थाटलेल्या दवाखान्यांत पेशंटची गर्दी कशी काय होऊ शकते? सुशिक्षित व्यक्तींना देखील त्या व्यक्तीच्या खरेपणाची, डॉक्टर असल्याची खात्री करून का घ्यावीशी वाटत नसते? पेशंटच्या जीवाशी खेळणाऱ्या अशा स्वयं घोषित डॉक्टरकडे आपणच औषधोपचार करून घेण्यासाठी जातो, म्हणजे एकप्रकारे त्याला आपण पाठींबाच देत असतो, ह्याची जाणीव का बरं होत नाही? म्हणूनच अशांना रान मोकळं मिळतं. अनेकदा अनर्थाला देखील सामोरं जावं लागल्याचं आपण ऐकून असतो, तरीही ह्या स्वयं घोषित डॉक्टर्सची दुकानं तेजीत धंदा करत असतात. ज्यांच्यावर कायदेशीररीत्या कारवाई होते, तेच स्वयं घोषित डॉक्टर असल्याचं सिद्ध होतं, परंतू कारवाई न झालेले असे कितीतरी स्वयं घोषित डॉक्टर असतील, ज्यांच्या खोटेपणाबद्दल आपल्याला जाणीव व्हायला नकोय का? स्वयं घोषित डॉक्टरांनी दिलेल्या औषधांचा किती आणि काय विपरीत परिणाम होईल समजणे देखील मुश्कील होऊ शकतं. स्वयं घोषित व्यक्तीमध्ये अलीकडच्या काळांत बुवाबाजी करणाऱ्यांची संख्या देखील खूपच वाढल्याचं दिसून येतं. आध्यात्माचा लवलेशही नसलेली व्यक्ती स्वतःला महाराज म्हणवून घ्यायला लागते. त्यासाठी कोणत्याही शिक्षणाची गरज नाही, अभ्यासाची जरुरी नाही, फारशी कोणतीही आध्यात्माची जाण असायची आवश्यकता नाही; अशी समजूत असणारेच स्वयं घोषित महाराज म्हणून जगभर भ्रमण करून त्यांच्या तथाकथित भक्तांना मार्गदर्शन, स्वर्गदर्शन घडवत असतात.



आधुनिक केसरी

फळे निष्कामता। पुण्य वाढे ।।
कुकर्माचे ठायी। दुःखाचेच फळ ।।
सदासर्वकाळ। पाप वाढे ।।१ ।।

वासनेच्या पोटी। पातकाचे बाळ।।
नियतीचा खेळ। आकळेना ।।२ ।।

शिंदीवृक्षा खाली। ताक प्रशियले ।।
जन ऐसे बोले। शिंदी प्याला ।।३ ।।

म्हणोनी संगती। करावी संतांची।।
तेणे सत्कर्माची। गोडी लागे ।।४ ।।

जळते वासना। हरिनाम घेता ।।
फळे निष्कामता। पुण्य वाढे ।। ५ ।।



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

नानां स्निग्धता चापि
धन्यता मान्यता तथा।
लभते च यशः श्रेयः
कृपया युवयोः सदा ॥5 ॥
तुमच्या दोघांच्या कृपेने त्याला लोकांचा स्नेहभाव तसेच धन्यता मान्यता यश आणि श्रेय त्याला लाभते.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी

लोभ धार बाहर रहे, जग विषयन महँ रात।
और मिले कुछ और हो, लोभ बढ़त दिन रात ।।१०।। (स्वर्वेद तृतीय मण्डल नवम अध्याय) ०३/०९/१०

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
संसारातील विषयांच्या प्राप्तीसाठी लोभाची धार सदैव बाहेर प्रवाहीत असते आणि विषयासक्त जीव सदैव प्रकृती-मुख म्हणजेच बहिर्मुख होऊन जातो; अंतरंगाचे त्याला भान रहात नाही. सदैव भोगाची इच्छा मनात असते. संतोष होत नाही. लोभ दिवसेंदिवस वाढत जातो. अजून काही मिळेल ही अपेक्षा सदैव वाढत जाते. लोभी पुरूषाचं समाधान न झाल्यामुळे त्याच्या चित्ताला कधीच चैन पडत नाही.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## देहांन्तनिरूपण

आधुनिक केसरी




सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

अभ्यासाला म्हणून बसलेलो असतो आता पंचाईत आईची होते कारणं आपण आता आई कडे वशिला लावतो की मी खेळायला तर जाणार आहे पण तु बाबांना सांगू नकोस की मी खेळायला गेलो. याठिकाणी आपण मित्रांसोबत सहजपणे खेळायला जातो. व खोटं बोलण्याचं पाप हाती ओढवून घेतो. म्हणजेच अशा साध्यासुध्या गोष्टीतुनचं आपल्या पापपुण्याची गणती सुरू होते. म्हणजे समर्थांचे सज्जन स्वरूप आपण अजाणतेपणी का होईना दुर्लक्ष केले आहे असा त्याचा अर्थ निघू शकतो. सातव्या दशकातील एक समासचं समर्थांनी " *देहांत निरूपणात केले आहे. परमार्थात माणसाच्या अंतकाळाला फार महत्व आहे. 1)आपल्या मनांत द्रुष्याचे प्रेम फार खोलवर गेलेले आहे. आपण संतविचारांच्या पावलावर पाय ठेऊन चालणारी माणसं आहोत. संत विचारांची संगत करतो, पुष्कळ वाचन करतो, श्रवणही करतो, थोडीफार साधनाही करतो, तरी पण आपले मन काही द्रुष्य वस्तूंच्या छायेतून बाहेर येत नाही. स्वस्वरूपाचे दर्शन हे आपले ध्येय आहे. स्वस्वरूप हे अत्यंत सुक्ष्म आहे. त्याची धारणा करण्यासाठी आपले मन सुध्दा अत्यंत सुक्ष्म व्हायला हवे. नेहमीच्या व्यवहारात द्रुष्य अत्यंत स्थूल असल्याने त्यास खरेपणाने चिकटलेले मन तसेच स्थूल बनते. त्यासाठी तरी आपल्या मनावर सतत संतविचारांचा पगडा असला पाहिजे तरचं आपली साधना वाढते फलद्रुप होते. आणि आपले मन सुक्ष्म होते. व सतत सत्संगात रहावेसे वाटते. **क्रमशः**

# ।। वासनेचे प्राबल्य।।

आधुनिक केसरी

माझ्या निरूपणाचा तुम्हांस विसर पडतो म्हणूनच बरे आहे. एखादी गोष्ट चांगली आहे आणि ती मिळाली तर सुखप्रद होईल ह्या गोष्टीची आठवण असूनही आपण ती मिळविण्यासाठी प्रयत्न करीत नाही हे अगदी अयोग्य आहे. हे पापच आहे. जर आपल्याला समजलेच नाही तर ते न करण्यात पाप नाही, परंतु समजूनही न करण्यात अत्यंत पाप आहे. खरे म्हणजे, प्रयत्न करणे हे आपल्या हातात आहे. आपण ऐकतो की, अंतकाळी जी मती तीच गती. मृत्युसमयी जशी वासना धरावी त्याप्रमाणे आपल्याला पुनर्जन्म प्राप्त होतो; तेव्हा वासनेतच आपला जन्म आणि वासनेतच आपला अंत, असे असताना तिला दूर कशी करता येईल ? एखादा मनुष्य काळा असेल तर त्याला आपले काळेपण काही घालवता येत नाही; त्याप्रमाणे वासना असणे हा मनुष्याचा एक सहज-गुण आहे, तो त्याला



पालटता येत नाही. तर मग आम्हाला वासनेतून कधीच मुक्त होता येणार नाही का ? मनुष्याच्या ठिकाणी इतर प्राणिमात्रांपेक्षा जर काही वेगळे असेल तर चांगले काय आणि वाईट काय हे कळण्याची बुद्धी. आपण कळून सवरूनही वासनेला, अहंपणाला आधार देतो, इथेच आपले चुकते. आपला अहंपणा इतका खोल गेलेला आहे की, आपल्याला हे सर्व माझेच वाटते : माझी बायको, माझी मुले, माझे घर. माझे माझे म्हणून किती सांगावे ! त्या माझेपणामुळेच अहंभाव वाढीला लागून, सर्व काही आपल्या मनाजोगते, आपल्याला सुख देणारे, हवेसे वाटू लागते आणि दुःख अगदी नकोसे वाटते. अर्थात् जगात कोणालाच नुसते सुख मिळत नाही. असे असूनही अहंपणाला बळी पडून सुखाच्या लालचीने मनुष्य मरेपर्यंत बरीवाईट कृत्ये करीत असतो, आणि त्याप्रमाणे त्याची वासना बनत जाते. वासना म्हणजे अभिमान, म्हणजेच मीपणा. अशा रीतीने अहंपणाच जर वासनेचे मूळ अधिष्ठान आहे, तर तो नको का घालवायला ? खरोखरच, मनुष्याचा अहंपणा इतका खोल मुरलेला आहे की, त्याचे निर्मूलन करायला तसेच सूक्ष्म अस्त्र पाहिजे. नामाइतके प्रभावी आणि सूक्ष्म अस्त्र दुसरे कोणतेच नाही. ते परमेश्वराच्या अगदी जवळचे आहे. परंतु एवढे असूनही आपण ते आवडीने, निष्ठेने घेत नाही. आम्हांला सर्व काही समजते, परंतु नामस्मरण करण्याचा आळस आपल्यात भरलेला आहे; भगवंत कर्ता आहे असे अनुसंधान जो रात्रंदिवस ठेवील त्याचाच अहंकार जाईल हे ध्यानात ठेवून आपण भगवंताचे नाम घ्यावे.

मनाने भगवंताचे होणे हे भक्तीचे मर्म आहे. आपल्याला जे पाहिजे ते त्याच्याजवळ मागावे. मागितलेली वस्तू भगवंत देईल किंवा न देईल. वस्तू दिली तर बरेच झाले, पण आपण मागितलेली वस्तू भगवंताने दिली नाही तर ती देणे आपल्या हिताचे नव्हते असे खरे मनापासून वाटावे. ही भावना वाढण्यासाठी, भगवंत दाता आहे असे लक्षात ठेवून शक्य तितके त्याचे नामस्मरण करावे.

आजचे बोधवचन आहे

६६. जो नामात राहिला त्याचा वासनाक्षय झाला. श्रीराम समर्थ

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

भक्तऋणी देव बोलती पुराणें । निर्धार वचनें साच करीं ॥१ ॥
मागें काय जाणों अइकिली वार्त्ता । कबिर सातें जातां घडिया वांटी॥ध्रु.॥
माघारिया धन आणिलें घरासि । न घे केला त्यासि त्याग तेणें ॥२ ॥
नामदेवाचिया घरासि आणिलें । तेणें लुटविलें द्विजां हातीं ॥३ ॥
प्रत्यक्षासि काय द्यावें हें प्रमाण । व्यंकोबाचें ऋण फेडियेलें ॥४ ॥
बीज दळोनियां केली आराधना । लागे नारायणा पेरणें तें ॥५ ॥
तुका म्हणे नाहीं जयासि निर्धार । नाडला साचार तो चि एक ॥६ ॥

रविवार, २६ मार्च २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२०६
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • SUNDAY 26 MARCH 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-206 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-14 • PRICE-5




# उद्योजक, राजकारणी, पत्रकार पुरुषोत्तम ठाकूर यांचे सामाजिक कार्य गौरवास्पद : वसंत मुंडे

## मा. खासदार उत्तमसिंग पवार यांच्या हस्ते पुरुषोत्तम ठाकूर यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

छत्रपती संभाजीनगर : सामाजिक भान राखत समाजात झपाटल्यासारखे कार्य करणा-या व्यक्तिमत्त्वात उद्योजक, राजकारणी तथा पत्रकार पुरुषोत्तम ठाकूर यांचे सामाजिक कार्य गौरवास्पद असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने उद्योजक, राजकारणी तथा पत्रकार पुरुषोत्तम रघुनाथसिंह ठाकूर यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल जाहीर सत्कार शनिवारी मा. खा. उत्तमसिंह पवार यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या विभागीय कार्यालयात संपन्न झाला. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विगाचे प्रमुख दिनकर माने, मिलिंद दाभाडे, अफसर खान, सुभाष वानखेडे, आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी पुढे बोलताना वसंत मुंडे म्हणाले, पुरुषोत्तम ठाकूर यांची कौटुंबिक पार्श्वभूमी खूप मोठी आहे. त्यांचे पणजोबा मोठे जमीनदार, आजोबा भारतीय शस्त्रनिर्मिती कारखान्यात अधिकारी आणि







वडील भारतीय सैन्यात लष्करी अधिकारी होते. वडिलांची देशसेवा जवळून बघताना पुरुषोत्तमरावांनी त्यातील सेवा या शब्दांचे मोल आपल्या अंगी उतरवले. अत्यंत कुशल संघटक आणि संघर्षांच्या बळावर त्यांनी यशाची नवनवीन शिखरे पादाक्रांत करीत समाजसेवेचा पिंड मनापासून जोपासला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठांतून एम. ए. मास कम्युनिकेशन व पत्रकारितेचे उच्च शिक्षण घेऊन आपल्या जीवनास एक वेगळा आयाम दिला. नगरसेवक म्हणून सामाजिक कार्य करीत असताना जनसामान्यांच्या प्रश्नांवर ते सतत धावून आले. त्यांनी स्थानिक राजकारणात रस तर दाखवलाच. परंतु देशपातळीवरील एअर इंडियाचा देश पातळीवरील संप एकट्याने यशस्वीरित्या समेट घडवून आणला. त्या वेळेस शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी पुरुषोत्तमरावांच्या कामाचा उल्लेख "आमचा ठाकूर एकटा शिवसैनिक काय करू शकतो ते बघा" असे कौतुक केले, ते आम्हा स्नेहीजणांना आनंददायी वाटते. त्याचबरोबर अगदी तरुण वयातच अल्पावधीत त्यांनी भूविकसक म्हणून संबंध शहर तसेच जिल्ह्यात नावलौकिक मिळवला. सर्वसामान्य लोकांना उच्च दर्जाच्या भूकंपरोधक आणि कमी किमतीत परवडणा-या वास्तू निर्माण करून त्या विश्वासाने सुपूर्द केल्या. हे उल्लेखनीय आहे. समाजभान जपत त्यांच्या विविध क्षेत्रातील योगदानाबद्दल अलीकडेच दिव्य मराठी वृत्तपत्र समूहाच्या वतीने आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान केला. तो आमच्यासाठी गौरवास्पद आहे.

याप्रसंगी मनोज भारस्कर, शांताराम मगर, संतोष सुर्यवंशी, आकश ठाकूर, अनिस कुरेशी, विलास इंगळे, दिपक शेळके, श्रीनिवास झंवर, संतोष भुतेकर, महेश बुलगे, छबूराव ताठे, रवी वैद्य, मुकेश मुंदडा, मनोज पाटणी, गंगाधर कांबळे, बी. डी. तिगोटे, आर. एस. ठाकरे, गौरव जैस्वाल, रतनकुमार साळवे, प्रा. दिलीप महालिंगे, डॉ. किशोर शिरसाठ, डॉ. दयानंद कांबळे, संजय व्यापारी, संदीप घंटे, विलास शिंगी, बाळासाहेब जोगदंड, आदित्य बरांडे, परवेज बेजीन आदींची उपस्थिती होती.



# राहुल सारखेच इंदिरा गांधी यांच्याबाबतीत देखील घडले



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**मोदी आडनावाबद्दलच्या मानहानी प्रकरणात काल सुरत न्यायालयाने राहुल गांधी यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावली होती. त्यानंतर आज राहुल गांधी यांचं संसद सदस्यत्व रद्द करण्यात आलं असून त्यांना खासदार म्हणून अपात्र ठरवण्यात आलं आहे. दरम्यान, यावरून विविध राजकीय प्रतिक्रिया येत असताना अनेक विरोधी नेते या प्रकरणी विविध प्रतिक्रिया देत हा निर्णय लोकशाही विरोधी असल्याच्या प्रतिक्रियेवर राजकारण तापलं आहे.काँग्रेससह विरोधी पक्षांच्या ज्या प्रतिक्रिया येत आहे, या प्रकरणी जो विवाद निर्माण केला जात आहे.हा विरोध घटनेला अनुसरून नाही. लोकं प्रतिनिधित्व कायद्यानुसार राहुल गांधी यांच सद्दुत्व गेलं.देशात या आधी देखील अशी प्रकरणे घडलेली आहेत.**

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना देखील खासदारकी गमवावी लागली होती.अलिकडच्या काळात अशी बरीच उदाहरणं पाहायला मिळाली आहेत, ज्यामध्ये अनेक नेत्यांना कोर्टाने वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये दोषी ठरवल्यानंतर त्यांची विधानसभेची अथवा लोकसभेची सदस्यता रद्द करण्यात आली होती. इंदिरा गांधी यांनी निवडणुकीत रायबरेलीमधून निवडणूक लढवली आणि त्यांनी संयुक्त सोशालिस्ट पार्टीचे उमेदवार राजनारायण यांचा पराभव केला. पण राजनारायण यांना आपल्या विजयाची खात्री होती. अशा स्थितीत त्यांनी इंदिरा गांधींच्या विजयाला अलाहाबाद उच्च न्यायालयात आव्हान दिले. या खटल्यात शांती भूषण यांनी राजनारायण यांची बाजू मांडली. हे प्रकरण इंदिरा गांधी विरुद्ध राजनारायण या नावानेही ओळखले जाते.

इंदिराजींवर एकूण ७ आरोप लावले होते

इंदिरा गांधींनी निवडणूक जिंकण्यासाठी सरकारी यंत्रणा आणि साधनांचा गैरवापर केल्याचा आरोप राजनारायण यांनी आपल्या याचिकेत केला होता. अशा परिस्थितीत त्यांची निवडणूक रद्द झाली पाहिजे. राजनारायण यांनी इंदिराजींवर एकूण ७ आरोप लावले होते. या प्रकरणी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनाही न्यायालयात हजर राहावे लागले होते. कोणत्याही परिस्थितीत पंतप्रधान न्यायालयात हजर राहण्याची ही देशातील पहिलीच वेळ होती. इंदिरा गांधींना अनेक तास आपल्यावर लावण्यात आलेल्या आरोपांची उत्तरे द्यावी लागली.

इंदिरा गांधी दोन मुद्द्यांवर अढळल्या दोषी

१२जून १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जगमोहन लाल सिन्हा यांनी आपला निकाल दिला. त्यांनी ७ पैकी ५ आरोपात इंदिराजींना दिलासा दिला. पण इंदिरा गांधी दोन मुद्द्यांवर दोषी आढळल्या. न्यायालयाने इंदिरा गांधींची निवडणूक रद्द केली. यासोबतच इंदिरा गांधी यांना लोकप्रतिनिधी कायद्यानुसार पुढील सहा वर्षांसाठी लोकसभा किंवा विधानसभा निवडणूक लढवण्यास अपात्र ठरवण्यात आले. न्यायमूर्ती सिन्हा यांनी आपल्या आदेशात लिहिले होते की, इंदिरा गांधींनी त्यांच्या निवडणुकीत भारतीय सरकारी अधिकारी आणि सरकारी यंत्रणा वापरली होती.

या यादीत बिहारचे माजी मुख्यमंत्री लालू प्रसाद यादव यांच्यासारख्या दिग्गज नेत्याचं देखील नाव आहे.

उत्तर प्रदेशातील अलाहाबाद हायकोर्टानं एका प्रकरणात तात्कालीन पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधी यांना दोषी ठरवत त्यांची खासदारकी रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. गांधी या रायबरेली मतदारसंघातून खासदार होत्या. कोर्टाच्या कारवाईमुळं इंदिरा गांधी यांना पंतप्रधानपदावर पाणी सोडावं लागलं होतं.





स्वातंत्र्यानंतर हंगामी संसदेचे सदस्य असलेले काँग्रेस नेते एच जी मुदगल यांच्यावर १९५१ मध्ये संसदेत प्रश्न विचारण्यासाठी पैसे घेतल्याचा आरोप झाला होता. त्यावेळी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी या प्रकरणाच्या चौकशीसाठी संसदेत समिती स्थापन करण्याचा ठराव मंजूर केला होता.

समितीने मुदगल यांना दोषी ठरवले आणि त्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले. मात्र, संसदेत प्रस्ताव मांडण्यापूर्वीच मुद्‌गल यांनी राजीनामा दिला. त्यानंतरही हा प्रस्ताव आणण्यात आला. दुसरेः संसदेची बदनामी केल्याच्या आरोपावरून १९७६ मध्ये सुब्रमण्यम स्वामी यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले. १९७६ मध्ये आणीबाणीच्या काळात सुब्रमण्यम स्वामी जनसंघाचे नेते आणि राज्यसभेचे खासदार होते. त्यावेळी स्वामी यांच्यावर देशविरोधी प्रचार आणि संसद आणि देशातील महत्त्वाच्या संस्थांची बदनामी केल्याचा आरोप करण्यात आला होता.

यानंतर संसदेत १० सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली. चौकशीनंतर समितीने स्वामी यांना दोषी ठरवून १५ नोव्हेंबर १९७६ रोजी राज्यसभेतून बाहेर काढले.

अलिकडच्या काळात अशी बरीच उदाहरणं पाहायला मिळाली आहेत, ज्यामध्ये अनेक नेत्यांना कोर्टाने वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये दोषी ठरवल्यानंतर त्यांची विधानसभेची अथवा लोकसभेची सदस्यता रद्द करण्यात आली होती. या यादीत बिहारचे माजी मुख्यमंत्री लालू प्रसाद यादव यांच्यासारख्या दिग्गज नेत्याचं देखील नाव आहे.

यावर्षी १३ जानेवारी रोजी लक्षद्वीपचे खासदार मोहम्मद फैजल यांची सदस्यता रद्द करण्यात आली होती. हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी त्यांच्यावर एक खटला सुरू होता. या खटल्यात त्यांना केरळमधल्या एका सत्र न्यायालयाने दोषी ठरवलं होतं. न्यायालयाच्या निर्णयानंतर दोन दिवसांनी लोकसभा सचिवालयाने त्यांना संसदेतून बाहेरचा रस्ता दाखवला. तशी अधिसूचना सचिवालयाने जारी केली होती. त्यानंतर केरळ उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती दिली.

नेहमीच वादग्रस्त वक्तव्यामुळे चर्चेत असणारे समाजवादी पार्टीचे नेते आझम खान यांचंदेखील नाव या यादीत आहे. गेल्या वर्षी ते हेट-स्पीच केसमध्ये दोषी असल्याचा निकाल न्यायालयाने दिला होता. त्यानंतर त्यांची विधानसभेची सदस्यता रद्द करण्यात आली. तसेच त्यांना तुरुंगातही जावं लागलं. खान यांच्याविरोधात अनेक खटले होते. त्यावरदेखील या काळात सुनावणी झाली. यापैकी अनेक खटल्यांमध्ये खान यांना दोषी ठरवण्यात आलं. लालू प्रसाद यादव शेकडो कोटी रुपयांच्या चारा घोटाळा केसमध्ये लालू प्रसाद यादव यांना सीबीआय कोर्टाने दोषी ठरवलं होतं. त्यानंतर त्यांनी त्यांची लोकसभेची सदस्यता गमावली. ते बिहारच्या सारन मतदार संघातून खासदार म्हणून निवडून आले होते. मुजफ्फरनगर दंगलीप्रकरणी भाजपाचे आमदार विक्रम सैनी दोषी आढळले होते. त्यामुळे त्यांना विधानसभेची सदस्यता गमवावी लागली. मुजफ्फरनगर एमपी-एमएलए कोर्टाने २०१३ मधील मुजफ्फरनगरमधील दंगलीतल्या त्यांच्या सैनी यांच्या भूमिकेमुळे त्यांना शिक्षा झाली होती. ते उत्तर प्रदेशमधल्या खटौली मतदार संघातून निवडून आले होते.

राष्ट्रवादीचे नेते यशवंतराव गडाख हे शिर्डी लोकसभा मतदारसंघातून खासदार झाले होते. परंतु त्यांनी निवडणूक आयोगाला खोटी माहिती दिल्याचा आरोप करत काँग्रेसचे नेते बाळासाहेब विखे पाटील यांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती. त्यानंतर कोर्टानं गडाख यांना अपात्र ठरवलं होतं.

# राहुल गांधीला पोरकटपणा अंगलट आला?



राम कुलकर्णी
भाजप प्रदेश प्रवक्ता



आधुनिक केसरी

**राहुल गांधी राजकारणात अपरिपक्व असल्याची टिका एकदा राष्ट्रवादीचे नेते शरदचंद्रजी पवार यांनी केली होती.मध्यंतरी खा.संजय राऊतांनी देखील युपीएचं नेतृत्व पवारांच्याकडे येण्यासाठी हालचाली केल्या त्यावेळी देखील राऊतांनी राहुल गांधींवर टिका करताना त्यांच्या कार्यक्षमतेवरच आक्षेप घेतला होता. लिहिताना हा दाखला देण्याचा उद्देश हाच आहे की, सुरत न्यायालयाने राहुल गांधींना दोन वर्षाची शिक्षा ठोठावली. कारण 2019 च्या लोकसभा निवडणुकीत कर्नाटकाच्या जाहिर सभेत बोलताना सर्व चोरांचे आडनाव मोदी कसे अशी टिप्पणी केली होती. अवमान याचिका न्यायालयात दोन वर्षे चालली होती. संविधानाचा आधार घेत शिक्षा झाल्याबरोबर लोकसभा सचिवालयाने त्यांचं सदस्यत्व रद्द करून टाकलं. तदनंतर सार्‍या विरोधी पक्षाच्या मंडळीनं छाती बदडुन घ्यायला सुरूवात केली. काय तर म्हणे लोकशाहीचा गळा कापला.**

लोकशाही धोक्यात आली. असं म्हणणार्‍यांना जनताही आता एक सवाल विचारू लागली, मोदी तेरी कब्र खोदेगी, असं जाहिर वक्तव्य एका काँग्रेसी नेत्याने केल्यानंतर त्याच्या विरोधात देशाच्या कुठल्याही ठाण्यात एक फिर्याद दाखल झाली नाही. मग खरंच लोकशाही धोक्यात आली का ?असा प्रश्न पडतो. उलट राहुल गांधीच्या प्रकरणावर जो गदारोळ नाहक विरोधक करू लागले त्यामुळे देशातील जनतेला खर्‍या अर्थाने आणीबाणीच्या काळाची आठवण होवु लागली. ज्या काळात संपादकाला रोज बातम्या लिहिताना सरकारचा अधिकारी खुर्चीजवळ येवुन बसायचा, नव्हे तर सरकारच्या विरोधात एक वाकडा शब्द येणार नाही याची काळजी घ्यायचा. मग सांगा, लोकशाही धोक्यात कुणामुळे आली ? एकुणच सारे संदर्भ पाहिल्यानंतर राहुल गांधी ज्या पोरकटपणाचं राजकारण करतात तेच अखेर त्यांच्या अंगलट आलं असंच म्हणावे लागेल.

देशावर ज्या पक्षाने साठ वर्षे अधिक अधिकराज्य गाजवलं त्या पक्षाचं नेतृत्व अलीकडच्या काळात मातोश्रीच्या नंतर राहुल गांधीकडे आलं. तसं पाहता कुटुंबाच्या पलीकडे नेतृत्व कधीच गेलं नाही. घराणेशाही, वारसा हक्क, वंशवाद या सर्व बिरूद्या काँग्रेसवाल्यांनी अंगीकृत केल्या.स्व.इंदिरा गांधींना जे राजकारण जमलं तदनंतर सुनबाई म्हणुन सोनिया गांधींनी देखील चांगला पक्ष चालवला. पण अगदी वारसाच चालवण्यासाठी पुढे आल्यानंतर राहुल गांधींच्या नेतृत्वाने असं काही काम केलं की ज्यामुळे पक्षाची वाताहतच नाही तर हा पक्ष रसातळाला जावुन बसला. 2014 नंतर नरेंद्र मोदी यांनी काँग्रेस मुक्तीचा नारा देत देशाच्या राजकारणातुन हे संकट बाहेर काढलं पण मोदी हे निमित्त असले तरी स्वतःचा पक्ष संपवण्यासाठी राहुल स्वतःच कारणीभुत म्हणावे लागतील. एक तर अंतर्गत मोठ्या प्रमाणावर वाद उफाळुन आले. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे राजकारण करताना जो पोक्तपणा लागतो तो त्यांच्या अंगी कधीच जाणवला नाही. बालीशपणाचं राजकारण अनेकदा देशांनी अनुभवलं. संसद चालु असताना पंतप्रधानाच्या गळ्यात जावुन भिडण्याचं केलेलं नाटक असेल किंवा आतापर्यंत पंतप्रधानावर दहा वेळा अवमानकारक असे वक्तव्य त्यांनी केले. मोदींना शिव्या घालणे अगदी चौकीदार हा शब्द त्यांनी शोधुन काढला, मागच्या लोकसभा निवडणुकीत मोदी नावाचे सारेच चोर जे बाहेरच्या देशात पळुन जातात असं म्हणत पंतप्रधानावरच टिका केली. खरं म्हणजे लोकशाहीच्या या जगात अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी एवढे हक्क आणि अधिकार सामान्य जनतेला दिले हे नक्कीच पण पोरकटपणाचे राजकारण करणार्‍या अशा लहरी युवक नेतृत्वाकडून त्याचा कळसही झाला. संविधान पदावर नरेंद्र मोदी बसलेले असताना पंतप्रधान चोर असं म्हणणं हा खरंच संविधानाचा अपमान देखील आहे. मध्यंतरी स्वातंत्र्यवीर सावरकरांवर देखील खालच्या पातळीवर जावुन त्यांनी टिका केली होती. ते काय बोलतील ? आणि कुठला जावाई शोध लावतील ? हे न सांगणे बरे. काय तर म्हणे सावरकरांनी ब्रिटिशांची माफी मागितली होती. देश भक्तीचा किंचितही लवलेश या लेकराच्या अंगी नसल्याचे अनेकदा देशवासियांनी अनुभवलं. नरेंद्र मोदीजी आणि त्यांचं वय लक्षात घेवुन खरं तर भारतीय संस्कृती आदरभाव, स्नेहभाव याचंही पालन त्यांच्याकडून झालं नाही. सुरत न्यायालयाने दोन वर्षाची शिक्षा ठोठावल्यानंतर केंद्रिय सचिवालयाने सदस्यत्व रद्द करून टाकलं. खरं म्हणजे यात राजकिय सुड अजिबात नसावा. कारण कायद्याच्या चौकटीत बसुन सर्व काही घडलं. न्यायालयाचा निकाल निःपक्ष पातीपणातुन पुढे आला. तो काही केंद्राचा निर्णय नाही किंवा सरकारी नाही. सचिवालयाने फक्त निकालाचा आधार घेत सभासदत्व रद्द केलं. मात्र त्यांचं सभासदत्व रद्द झाल्यानंतर अगोदरच वैमनस्याने पिछाडलेल्या देशातील विरोधकांनी रस्त्यावर येवुन थयथयाट सुरू केला. लोकशाहीचा गळा घोटला, हुकुमशाहीचं राज्य आलं अशा अनेक प्रतिक्रिया विरोधक देवु लागले. एक गोष्ट सत्य म्हणावी लागेल की, विरोधकांना 2024 च्या निवडणुकीत देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचंच नेतृत्व बहुमताने पुढे येईल याची खात्री पटलेली आहे. कारण हे नेतृत्व तथा भाजपाच्या हातुन आता पुढची नाही म्हटलं तरी पन्नास वर्षे सत्ता जाणार नाही. विरोधक हे सत्य स्विकारायला तयार नाहीत. या सार्‍या पार्श्वभुमीवर शरदचंद्र पवार आणि खा. संजय राऊत यांनी राहुल गांधींच्या नेतृत्वावर जो आक्षेप घेतला होता खरं तर या दोन्ही नेत्यांचं अभिनंदन यासाठी करायला हवं की या लेकराचा पोरकटपणा त्यांनी अगोदरच ओळखला होता.

लोकशाहीचा गळा घोटला अशी आवई उठवणार्‍यांना एक निश्चित सांगावे लागेल की आणीबाणीचा काळ आठवायला हवा. हुकुमशाही कुणाची होती ? आणि ती कशी होती ? एक शब्द काढण्याची हिंमत देशात कुणाच्या अंगी नव्हती आणि जर काढला तर थेट त्याला जेल होता. आजही कुठली चुक नसताना आणीबाणीच्या काळात संघ परिवारातील हजारो कार्यकर्त्यांना जेलमध्ये टाकलं होतं. स्व. प्रमोदजी महाजन, गोपीनाथराव मुंडे यांच्यासारखे कितीतरी कार्यकर्ते तुरूंगवास भोगत होते. आज ज्यांना वाटतंना लोकशाही धोक्यात आली, त्या डाव्या, उजव्या, आडव्या मंडळींनी आणीबाणीचा काळ आठवायला हवा. मोदी तेरी कब्र खोदेगी असं वक्तव्य एका काँग्रेस नेत्याने काही दिवसापुर्वी केलं. हुकुमशाहीच असती तर हा बेफाम वक्तव्य करणारा नालायक कदाचित फाशीवर जाण्या इतपर्यंत शिक्षा देण्यात आली असती. पण देशाच्या कुठल्याही ठाण्यात असं म्हणणार्‍याच्या विरोधात एक सिंगल फिर्याद नाही. मग सांगा, लोकशाही कुठं धोक्यात आली ? याउलट राहुल गांधीला झालेली शिक्षा म्हणजे डॉ.बाबासाहेबांचे संविधान आणि त्याची ताकद किती आहे हे देशातील जनतेला कळुन चुकलं. हा देश म्हणजे गांधी घराण्याची खासगी मालमत्ता नाही हा देखील बोध येतो. सभासदत्व रद्द झाल्यानंतर ज्या काँग्रेसी तथा त्यांच्या सहकार्‍यांनी स्मशानात बसल्यासारखा गळा काढला त्यांना देखील एक निश्चित सांगावे लागेल नाही म्हटलं तरी किमान पाच पन्नास वेळा देशात स्व.इंदिराजी गांधी यांनी 356 कलमाचा वापर केला. खरं तर न्यायालयाने दोषी ठरवलं त्या अनुषंगाने सभासदत्व रद्द केलं. या सार्‍या खेळात लोकशाही धोक्यात कशी येवु शकते ? उच्च न्यायालयाने इंदिरा गांधींना दोषी ठरवल्यानंतर दुसर्‍याच दिवशी आणीबाणी लावली होती आणि विरोधी पक्षातील नेत्यांना एका रात्रीत अटक केलं. मग सांगा, हुकुमशाहीची परंपरा कोणत्या कुटुंबात होती ? आपला तो बबड्या दुसर्‍यांचं कारटं ही काँग्रेस राजकारणाची मुळात निती आहे. साठ वर्षे सत्ता भोगताना केलेल्या पापाचा घडा भरला म्हणूनच वाताहतीला त्यांचच कर्म जबाबदार म्हणावे लागेल. ही सर्व पार्श्वभुमी लक्षात घेता पन्नासी पार केलेल्या राहुल गांधींच्या अंगातला पोरकटपणा अद्याप गेलेला नाही. राजकारण बालिशपणाचं आहे. कुशाग्र बुद्धीचं राजकारण त्यांच्याजवळ नाही. सत्ता, पैसा आणि भ्रष्टता हेच अंगीकृत करणं त्यांच्या अनेकदा अंगलट आलं. 2019 ला महाराष्ट्राच्या राजकारणात कट्टर हिंदुत्ववादी असलेल्या शिवसेनेला पाठिंबा वैचारिक भुमिका बाजुला ठेवुन सत्ता लाभासाठी दिला.त्यावेळेसही त्यांच्या नेतृत्वाची प्रगल्भता लक्षात आली होती.

बाकी काही असलं तरी जनता जनार्धन उघड्या डोळ्यांनी पहात आहे. विरोधकांनी कितीही तमाशा केला तरी दोन वर्षाची शिक्षा झाल्यानंतर त्यांचं संसद सभासदत्व रद्द करण्याच्या निर्णयाचे देशातील सामान्य माणसानं निश्चित स्वागत केलं हे मात्र नक्की.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# स्वप्नपंखी



सौ. माधुरी नंदन कुलकर्णी
संपर्क क्र. 79877 77899

आधुनिक केसरी

"Life is either challenge or an adventure if it is none ,it is not a life at all."

हेलन केलर यांचे हे सुप्रसिद्ध असं जीवनावरचे भाष्य. "जीवनात साहस किंवा आव्हान हवंच त्याशिवाय जीवन हे जीवन नव्हेच!" विलक्षण अपंगत्व आणि त्याचबरोबर अचंबित करणारे कार्य बघितलं की पटकन हेलन केलरच्या या जीवन भाषेची आठवण होते .परमेश्वराने दिलेल्या आयुष्याचं सोनं करून जगण्याची एक आस दाखवणारे आणि आदर्श वाटणारे एक व्यक्तिमत्व म्हणजे सुलोचना महाशद्बे.

सुलोचना महाशब्दे म्हणजे माझी सुलू मावशी. तिचं अपंगत्व हे एका दृष्टिक्षेपात नजरेत भराव असंच आहे. अडीच फुटी देह ,चालताना धनुष्याकृती होणारा ,हाताचा टेकू दिल्यावर गती घेणारे दुबळे पाय. हे अपंगत्व ही जन्मजात देणगी. तिला पाहिल्यावर ती किती परावलंबी असेल याची कल्पना येऊन मनात प्रथम कणव निर्माण होते, मन नकळत चुकचुकतं. पण शरीराची उंची आणि तिच्या धाडसाची अर्थात ध्येयाची उंची बघून मात्र तिच्या अपंगत्वाची छबी धुसर होऊन प्रत्येकाचा तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलून जातो. सुलु मावशी नेहमी एक वाक्य म्हणत असे,' स्वतःच्या दुःखाला कवटाळत बसण्यापेक्षा ध्येयाच्या रस्त्याने हिम्मतीने पाऊल टाकणे म्हणजेच आयुष्य '. जन्मताच अपंग त्यातच तिच्या दुबळ्या पायांवर उकळतं तेल सांडल्यामुळे पायाच्या नसा जमुन गेल्या..... त्याबरोबरच कधीकाळी ती बरी होईल ह्या आशेने चाललेले नवस ,पुजपाठ ,ठरविलेले उपचार पण थांबले . तरीही आपल्या या शारीरिक परिस्थितीवर तिने मात केली ,ह्या परिस्थितीसाठी तिने कधीही स्वतःच्या नशिबाला किंवा परमेश्वराला दोष दिला नाही. तशी ती पहिल्यापासूनच देवभक्त रोज पहाटे लवकर उठणे, बगीच्यातून देवासाठी फुलं काढणे ,आजोबांन बरोबर देवाची पूजा करणे, गजानन महाराजांची पोथी वाचणे आणि त्याचबरोबर आपल्या हातापायांची सांगड घालत पंचवटी ते काळाराम मंदिर म्हणजे जवळजवळ तीन किलोमीटर पायी पायी देवदर्शनाला जाणे हा तिचा नियम सर्वांनाच अचंबित करायचा .

लहानग्या सुलुला शाळेत जाण्याची फार हौस शिक्षणाचा विलक्षण ध्यास पण ,आपल्या शारीरिक अपंगत्वामुळे अनेक अडचणींवर मात करून शिक्षण घेणे म्हणजे एक दिव्यच होते. पण म्हणतात ना 'मुलाचे पाय पाहण्यात दिसतात' हेच खरे.

तिच्या शारीरिक परिस्थितीला बघता तिला कोणीही शाळेत प्रवेश द्यायला तयार नव्हते .तिची जबाबदारी कोण घेणार ? कोणी खेळताना ढकललं पाडलं तर नसती आफत, आधीच ती दुबळी नसतं संकट कोण ओढवून घेणार .शाळेची प्रवेशद्वार तिच्यासाठी बंद झाली होती ,पण तिची शाळेची ओढ मात्र त्यामुळे आणखीनच तीव्र झाली. मग काय वडिलांनी शेवटी घरी शिकवणी ठेवली आणि चौथीपर्यंतचे शिक्षण झाले .पण 'मला आता असे शिकवणीचे शिक्षण नको मला शाळेत जायचे' हा एकच हट्ट .अखेर खूप खटपटीनंतर तिला शाळेत प्रवेश मिळाला .आणि.....जेमतेम सातवी पर्यंतच शिक्षण झाले. कारण जिथे तिथे आड येत होते ते तिचे विचित्र अपंगत्व. आणि त्यातून मुलीची जात किती तो त्रास आणि किती तो प्रयास शेवटी निर्णय घेण्यात आला की बस आता इथे शिक्षण थांबवायचे.

सुलुला शिक्षणाबरोबर स्वावलंबी होण्याचा ध्यास होता, त्यामुळे विणकाम, भरतकाम शिकून त्यातही ती निपुण झाली . "वा फारच छान केलं" असं भरभरून कौतुक केलं जायचं, पण तिला त्यात समाधान नव्हतं शरीर दुबळ होतं ,पाय दुबळे होते पण मन ते कुठे दुबळं होतं ! ते तर सदैव आकाशात झेप घेत असायचं, स्वप्न होतं ते स्वतःच्या पायावर उभे राहण्याचं. आणि विणकाम ,भरतकाम हे किती वेळ चालणार आणि ह्यावरून स्वावलंबी व्हायचं तर हे तर फारच तोकड आहे, अपूर्ण आहे या सगळ्या विचारांनी तिचं मन अस्वस्थ व्हायचं. मग शिवणकाम सुरू केलं पाय मशीन वरच शिवण शिकू लागली. छोटे छोटे दुबळे पाय पण मनाची जिद्द तशाच पायांनी शिवण शिकली. शिवणकामाचा डिप्लोमा झाला, पण तरी समाधान कुठे ! परत तेच शिक्षण आणि फक्त शिक्षण . शिक्षणापासून आपण दूर होत आहोत ही खंत मनाला स्वस्थ बसू देईना.

शिक्षणाची ओढ सतत मनाला टोचणी देत होती आणि एक दिवस सुलू ने पक्का निर्णय केला आपण बालवाडी काढायचीच . घरातून आई-वडिलांचा सुलुला तिच्या ह्या कामाला मदत नव्हती, पण हो विरोधी नव्हता. होती ती काळजी कारण स्वतः शारीरिक दृष्ट्या अशा परिस्थितीत असताना ही भलतीच जबाबदारी ...... तिला पेलवेल का ? आणि नाही पेलावली, अयशस्वी ठरली तर ती निराश तर होणार नाही. स्वतःच्या आयुष्यात नको ते अपयशाचे दुःख तिला भोगावे तर लागणार नाही. असा त्यांचा तिला नाही म्हणण्याचा स्वच्छ हेतू होता .त्यातून परमेश्वर कृपेने तिच्याकडून आर्थिक दृष्ट्या कमाई ची घराला मदतीची गरज तर नव्हतीच. तरीदेखील सुलुच्या हट्टापुढे ते काही बोलू शकले नाही.

आता बालवाडीच का ? तर हेच खरं संस्कारक्षम वय असते आपण लहान मुलांच्या शिक्षणाचा पाया भक्कम करायचा उभ्या आयुष्याभर त्यांना साथ मिळेल अशी संस्कारांची 'कवच कुंडल' त्यांना द्यायची, हा मनाचा पक्का निश्चय करून सुलु नाशिकच्याच स्वामीनारायण मंदिरातल्या बालवाडी शिक्षिका उषाताई दाणीबाईंना भेटली.दाणीबाई शिक्षण देण्यात तज्ञ होत्या त्यांनी मोठ्या प्रेमाने आणि बारकाव्यानिशी बालवाडी कशी चालवायची, मुलांना गोष्टी कशा सांगायच्या, कविता कशा पाठ करून घ्यायच्या याचे शिक्षण सुलुला दिले. बालवाडीसाठी योग्य ते शिक्षण पूर्ण झाले आता बालवाडी सुरू तर करायचीच हा ठाम निर्णय तर झालाच होता. आणि हा निर्णय तिने सहस्रबुद्धे बाईंना देखील बोलून दाखविला. पण बालवाडीसाठी जागेचा मोठा प्रश्न आहे असे म्हणताच सहस्रबुद्धे बाईंनी हा प्रश्न देखील लगेच सोडवला. तू तुझी बालवाडी माझ्या घरात सुरू कर .....जागेचा प्रश्न सुटला.



सुलोचना महाशब्दे आपल्या मैत्रिणींसोबत

आता पुढचा प्रश्न होता बालवाडीसाठी मुलं कशी गोळा करायची ? आपल्या ह्या मैत्रिणीला बरोबर घेऊन ती घरोघर फिरली आणि सुरुवातीला दोघींनी मिळून वीस - पंचवीस मुलं एकत्र करून बालवाडी सुरू केली. ते वर्ष होतं १९६८ मुलांना शाळेची प्रवेश फी एक रुपया व महिन्याची फी दोन रुपये अशी ठेवण्यात आली होती .आलेले पैसे दोघी सारखे वाटून घेत होत्या. कमाई ती किती! पण अभिमान होता ,आनंद होता तो स्वकष्टार्जित कमाईचा आणि समाधान होत ज्ञान देण्याच्या पुण्याईचे .पण थोड्याच दिवसात बालवाडी ची सर्व जबाबदारी एकट्या सुलू वर आली. वास्तविक मावशी त्यावेळी 23 वर्षाची होती ,तारुण्यातले फुलपंखी दिवस पण तीचं स्वप्नपंख वेगळ्याच दिशेने उडत होते.निर्धारित मनाने आपल्या खांद्यांवर एक नवीन जबाबदारी घेऊन सुलू मावशीच्या नवीन आयुष्याची वाटचाल सुरू झाली. छोट्याशा जागेत भरणारी ही बालवाडी एका 'जिद्दी स्त्री ची कर्म कहाणी'. मुलांचा सर्वांगीण विकास करण्यात तसुभरही कमतरता नव्हती ,होती ती तळमळ त्याच्या जोडीला करारी बाणा ,शिस्तशीर पणा , टापटीप, स्वच्छता, मुलांसाठी भरपूर खेळणी, शैक्षणिक विविध प्रकारची सामुग्री, आखीव रेखीव अभ्यासक्रम ,यामुळे मुलांबरोबर पालकही खुश असत .

कोणत्याही जाहिरात माध्यमाची साथ न घेता बालवाडी प्रसिद्ध झाली. मुलांची संख्या अगदी झपाट्याने वाढू लागली . आता आपल्या स्वतःच्या जागेत स्वतंत्र बालवाडी सुरू करावी या निश्चयाने बँकेकडून कर्ज घेऊन त्यातुन बालवाडी सुरू केली. खरंतर त्याकाळी बँकेची कर्ज घेणे हे आजच्या प्रमाणे सरळ आणि सोपे नव्हते. त्यासाठी बऱ्याच वेळेस होणारे बँकेचे सर्वे,बँकेत जाऊन स्वतः कागदांची पूर्तता करणे , अतीशय जटिल कार्यवाही होती. त्यावेळी बँकेच्या कर्मचाऱ्यांनी तसेच सुलुच्या मोठ्या बहिणीने व भावाने तिला बरीच मदत केली आणि बँकेचे कर्ज मिळाले..

' गीतांजली 'बाल मंदिर' हे नाव नवीन हॉलवर झळकू लागले .आता बालवाडीत तब्बल ८० मुले होती .सकाळी ८ते ११ आणि दुपारी १२ते३ अश्या दोन सत्रात बालवाडी सुरू झाली. झाडलोट करणे, पाणी भरणे ,लहान मुलांची शि_शु झाली तर त्यांना बघणे यासाठी एक स्वतंत्र बाई नेमून, बाकी दोन्ही सत्रामध्ये एकटी सुलु मावशी मुलांना शिकवत असे, सांभाळत असे. कधीकाळी कामावरची बाई आली नाही तर ती सगळी कामे देखील स्वतः करायची कधीही दुसऱ्यांवरती अवलंबून राहून, ती कधी थांबलीच नाही. तिच्या कष्टाला सीमा नव्हती आणि समाधानाला मर्यादाही नव्हती, होती ती एकच तळमळ आणि ती म्हणजे ,आपली ही बालवाडी एक 'आदर्श बालवाडी 'म्हणून नावारूपाला आणायची.

मुलांवर उत्तम संस्कार आणि शिक्षण हे उद्दिष्ट असल्यामुळे सर्व सणवार साग्रसंगित साजरे होत. मुलांची दहीहंडी जन्माष्टमीच्या दिवशी खूप मोठ्या प्रमाणात साजरी होत असे आणि त्याचबरोबर मुलांच्या मातांसाठी श्रावण महिन्यातील शुक्रवारचे हळदीकुंकू देखील केले जात असे.

बालवाडीचा वार्षिक समारंभ म्हणजे तर एक मोठी पर्वणीच असायची. वार्षिक समारंभाचा खूप खर्च व्हायचा पण त्याचा बोझ पालकांन वर पडत नसे, त्यामुळे पालकही खुश होत व कार्यक्रमाचा खूप गाजावाजा व्हायचा .अतिशय धुमधडाक्यात आणि थाटात हा समारंभ साजरा केला जायचा .नाशिकच्या प्रसिद्ध कालिदास मंदिरात सांस्कृतिक कार्यक्रम अतिशय यशस्वीरित्या पार पडायचा . सांस्कृतिक कार्यक्रम बसवण्यापासून अगदी दणक्यात पार पडेपर्यंत कुंदाताई महाबळ आणि कुटुंबातील सर्वांचे सहकार्य मिळायचे. कुंदाताई महाबळ हे एक उत्साही व्यक्तिमत्व रामायण ,महाभारत, कृष्ण लीला, पर्यावरण यावर अनेक कार्यक्रम बसवले जात. आजच्या काळातील लाखोंची फी घेणाऱ्या शाळांच्या वार्षिक समारंभाला मागे टाकणारी सांस्कृतिक प्रस्तुती होत असे .मुख्य म्हणजे मुलांना लागणारे ड्रेस स्वतः सुलु मावशी शिवणकाम करून कलाकारी करून तयार करत असे, मग ती परीराणी असो वा ससुल्या चा ड्रेस असो. ह्या मधून देखील ती आपल्या कलाकुसरीची हौस पूर्ण करत असे .

वार्षिक समारंभा बरोबरच दरवर्षी एक वार्षिक सहलीचेही आयोजन होत असे. त्यातही ती स्वतः जातीने सहभागी होत असे. तीचा पाठांतरावर जास्त भर होता त्यामुळे मुलांचे गोष्टी ,कविता, पाढे अगदी तोंडपाठ असत .त्यामुळे गंमत अशी की माजी विद्यार्थी देखील स्वतःच्या मुलांना घेऊन सुलुबाईंन जवळ येत ,आणि बाई आमच्यावर केलेत तसेच संस्कार आणि शिक्षण आमच्या मुलांना द्या असे आवर्जून सांगत.कारण प्रथम गुरू म्हणजे 'भूतकाळातील दुवा आणि भविष्यकाळाचा दिवा असतो 'हे त्यांना कळलं होत.ही सुलू च्या यशाची मिळालेली एक मोठी पावतीच म्हणायला हवी.

स्वामी विवेकानंदांनी कर्मयोगात म्हटले आहे विद्यादान हे अन्नदानापेक्षा ,प्राण दानापेक्षा श्रेष्ठ आहे. कारण हे 'ज्ञानच माणसाचे खरे जीवन होय' . अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनाची सुरुवात सुलूबाईंनी अश्याच विचारांनी केली .आजही तिचे माजी विद्यार्थी उच्चपदस्थ व्यक्ती असूनही तिच्यापुढे नम्रतेने झुकतात आणि त्यावेळी सुलु मावशीच्या चेहऱ्यावरून अलौकिक असा अभिमान ओसांडून वाहत असतो, तो अगदी बघण्यासारखा असतो.

'शरीराने अपंग असले तरी मनाने अपंग राहू नका 'हे संस्कार नकळत तिच्या विद्यार्थ्यांवर घडतात हे महत्त्वाचे नाही का ! अपंगत्व हा केवढा मोठा शाप, त्याचं भांडवल करून सुलु मावशीला इतरांच्या सहानुभूतीचा विषय होता आले असते. पण तिचा स्वाभिमानी स्वभाव, शिक्षणावरची नितांत निष्ठा ,मुलांना संस्कार करण्याचा ध्यास आणि मुख्य म्हणजे आत्मसन्मान इतका प्रचंड होता की या वाटचालीत ज्या ज्या अडचणी आल्या, त्यावर मात करून खंबीरपणाने तिने आपली 'गीतांजली' बाल मंदिर सुरूच ठेवले. आई-वडिलांचे छत्र हरवल्यानंतर तिने स्वतःला आणि भावांना धीर देऊन ,भावांच्या संसारात प्रत्येकाच्या सोयीप्रमाणे स्वतःला न डगमगता ढाळून घेतलं .अडीअडचणींना भावांच्या पाठीशी कायम उभी राहिली. घरकामात देखील ती तरबेजच होती .भाजी निवडणे ,धान्य निवडणे, मुख्य म्हणजे अगदी मऊ खमंग अशा पोळ्या करणे अशी काम ती सांभाळून घेत. घरातील सगळ्यांना तिच्यात काही कमी आहे असे कधी भासलेच नाही.

आम्हा धडधाकटांनाही स्वतःची दोन मुले सांभाळायची तर जीव मेटाकुटीला येतो .शिक्षणाबरोबर मुलांना संस्कारीत करणे तर अगदी अशक्य होऊन जाते .जे तिने अगदी सहज हस्तगत करून घेतले होते. दोन सत्रांमध्ये 40- 40 मुले कशी सांभाळत असेल ? याचे उत्तर एकच ते म्हणजे तिचे हे काम तिच्या आंतरिक तळमळीतून निर्माण झालेले होते .दिवसाच्या आठ ते दहा तासाच्या शाळेनंतर देखील शांत न राहता सुलु मावशी इतर ठिकाणी अभ्यासात मागे पडणारी मुलं शिकवणीसाठी घेत असे आणि त्यांचाही अभ्यास ती तेवढ्याच जोमाने घेत.

सुलु मावशीला तीच्या या कार्याबद्दल बऱ्याच ठिकाणी गौरवण्यात आले होते .मायको एम्प्लॉईज फोरम मध्ये ज्योती कलश कार्यक्रमात ,तसेच वेध न्यूज वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात उल्लेखनीय कार्य करणारे व्यक्तिमत्व म्हणून गौरवण्यात आले होते. त्याचबरोबर लोकमत आणि टकले नगरच्या कला क्रीडा व साहित्य मंडळाच्या वतीने सामाजिक क्षेत्रातील अतुलनीय कार्याबद्दल 'लोकमत पंचवटी रत्न 'हा पुरस्कार दिला गेला होता. आघाडी महिला पुरस्कार आणि नाशिक आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन तिला गौरवान्वित केले गेले होते.

मी हे करणारच या जिद्दी वरती ती रोज नव्याने उभी राहत असे आणि हे बघून लगेच हेलन केलर प्रमाणेच सुलू मावशीनेही जीवन हे एक आव्हान म्हणून स्वीकारले आहे याची खात्री पटते. सहाजिकच मनात आदरभाव जागृत होतो .

आज ८० च्या घरात असलेली मावशी तिचे हे विद्यादानाचे कार्य भाचे सुनेकडे सोपवून आपले उर्वरित आयुष्य कृष्ण मंदिराची दिवसातून चार तासाची सेवा करण्यात घालवते. दुपारी मंदिरात भजनी मंडळात अगदी तल्लीन होऊन हरे कृष्ण.... हरे कृष्ण.... चा जप करीत असते . आजही तीच्या एका वेगळ्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाची ओळख सगळ्यांना होते. स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी पायांमध्ये हवे ते बळ नाही हे लक्षात येताच ,आपल्या ध्येयपूर्तीसाठी स्वतःच स्वप्नांचे पंखल्यालेली माझी ही 'स्वप्नपंखी' मावशी माझ्यासाठी नेहमीच नक्की एक प्रेरणा असणार.

महाराष्ट्र Business Katta












# विवाह समुपदेशन : काळाची गरज

आधुनिक केसरी



उद्धव भयवाळ
संपर्क क्र. ८८८८९२५४८८

**आपल्या भारतीय विवाह संस्थेला जागतिक पातळीवर विशेष महत्त्व प्राप्त आहे. भारतीयांमधील विवाहबंधनाला एक पवित्र नाते मानले जाते. भारतात वैवाहिक संबंध हे केवळ दोन व्यक्तीमधील न मानता दोन कुटुंबातील संबंध असे मानले जातात. पाश्चिमात्य देशासारखे विवाह म्हणजे एक करार ही संकल्पना भारतीय संस्कृतीमध्ये नाही. मात्र तंत्रज्ञान आणि आधुनिक समाज व्यवस्था यामुळे नातेसंबंधाचे स्वरूप दिवसेंदिवस बदलत आहे.**



आज इंटरनेटच्या माध्यमातून फेसबुकवरूनही विवाह जमवला जात आहे. तसेच मॅरेज ब्युरोमार्फत ऑनलाईन स्थळे सुचवण्याचा जमाना आहे; परंतु त्याचे जसे फायदे आहेत, तसे तोटेही आहेत. सध्या घटस्फोटाचे प्रमाण खूपच वाढत आहे. अगदी क्षुल्लक कारणांवरून, पती-पत्नीतील किरकोळ मतभेदांमुळे देखील जोडपी न्यायालयात घटस्फोटासाठी धाव घेताना दिसतात. या पार्श्वभूमीवर विवाह समुपदेशन ही काळाची गरज झालेली आहे.

अलीकडे लोक इंटरनेटच्या माध्यमातून त्याचप्रमाणे फेसबूकसारख्या समाजमाध्यमातून विवाह जमवत आहेत; परंतु त्याचे फायदे आहेत तसेच तोटेही आहेत, हे वधू-वरांच्या पालकांनी लक्षात घ्यायला हवे. तथापि सध्या घटस्फोटाचे प्रमाण खूपच वाढत आहे. अगदी क्षुल्लक कारणांवरून, पती-पत्नीतील किरकोळ मतभेदांमुळेही जोडपी न्यायालयात घटस्फोटासाठी धाव घेतात. एखादा कौटुंबिक अगर वैवाहिक वाद जेव्हा कोर्टात जातो, तेव्हा त्याला वेगळेच स्वरूप प्राप्त होते, तो वाद खासगी राहात नाही. कोर्टासमोर पती-पत्नी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करीत राहतात. कोर्टात त्याची नोंद होत राहते. आणि नाती इतकी दुभंगतात की, कधीही न जुळणारी बनतात.

घटस्फोटांच्या वाढत्या प्रमाणामुळे त्यास सामाजिक समस्येचे स्वरूप प्राप्त झाले आहे. वैवाहिक संबंध दृढ, आपुलकीचे आणि प्रेमाचे ठेवण्यासाठी लग्नापूर्वी विवाहपूर्व समुपदेशन आणि लग्नानंतर पुन्हा समुपदेशन याची गरज भासत आहे. लग्नाआधी एकमेकांतील न दिसलेले गुण-दोष जोडप्यांना लग्न होऊन मधुचंद्रानंतर स्पष्ट दिसू लागतात व जोडीदारास दोषांसोबत स्वीकारण्याची मनाची तयारी नसल्याने संबंध टोकास जातात, कधीही न जुळणारे बनतात. त्यामुळे जोडीदार निवडताना आणि निवडल्यानंतर विवाहपूर्व समुपदेशनसुद्धा आजच्या काळात आवश्यक झाले आहे. विवाहपूर्व समुपदेशनामुळे जोडीदारांना विवाहापूर्वीच एकमेकांना समजून घेण्यास मदत होते व भविष्यातील गुंतागूंत अथवा मतभेदांना अगोदरच फाटा देता येतो. संस्कारातील अंतर व मतभेद यांचे प्रमाण खालच्या पातळीवर आणण्यात मदत होते. तसेच विवाहापूर्वी वधू-वर आपल्या अपेक्षा एकमेकांसमोर उघड न करता एकमेकांपासून काही अपेक्षा ठेवून असतात व त्या अपेक्षा विवाहानंतर पूर्ण झाल्या नाहीत की नात्यामधील गोडवा संपून, वाद-विवाद वाढतात. विवाहपूर्व समुपदेशनामुळे जोडीदारांना एकमेकांकडून विवाहानंतरच्या अपेक्षा, आवड-निवड याबाबत उघडपणे बोलण्यास व्यासपीठ प्राप्त होते.

विवाहानंतरचे समुपदेशन तर अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. नवरा-बायकोमधील तुटू पाहणारे नाते योग्य वेळी समुपदेशनाच्या माध्यमातून पुन्हा एकजीव होते. फॅमिली कोर्टामध्ये धाव घेण्यापूर्वीही जोडप्यांना काऊन्सेलिंगद्वारे समजवण्याचा प्रयत्न केला जातो. विवाह समुपदेशनाच्या माध्यमातून

पती-पत्नीच्या दरम्यानच्या समस्यांचा अभ्यास केला जाऊन त्याबाबत योग्य तो व परिणामकारक सल्ला दिला जाऊ शकतो. विवाह समुपदेशनाच्याद्वारे पती-पत्नीमधील भांडणाचे मूळ शोधून तसे प्रसंग टाळण्याबाबत मार्गदर्शन मिळू शकते. मुलांचे संगोपन आणि त्यांच्या भविष्याच्या जबाबदारीची जाणीव जोडप्यांना करून दिली जाते. त्यामुळेही जोडप्यांना घटस्फोट घेण्यापासून परावृत्त करता येणे शक्य होते. विवाहपूर्व समुपदेशनाद्वारे योग्य मार्गदर्शनामुळे मानसिक स्थिती, स्वभाव लक्षात घेऊन योग्य सल्ला दिला जाऊ शकतो. तसेच लग्नानंतरच्या समुपदेशनाने दोन कुटुंबांतील तुटणारे रेशीमबंध पुन्हा साधण्याचे पवित्र कार्य होते. त्यामुळेच विवाह समुपदेशन ही काळाची गरज आहे, यात शंका नाही.

# राजाराणीचटणी



आधुनिक केसरी



सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

खोबरे आणि तीळ हे आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त पदार्थ असून अधिक ऊर्जा मिळण्यासाठी सुके खोबरे आणी तीळ खाणे उपयुक्त ठरते. खोबरे व तीळ हे बलवर्धक पदार्थ ,त्यात मोठ्या प्रमाणात प्रोटीन , फट भरपूर असतात. रोगप्रतिकार शक्ती ही आपल्या शरीरासाठी अत्यंत गरजेची असते, कारण हीच रोगप्रतिकार शक्ती आपल्याला विविध आजारांपासून दूर ठेवते आणि शरीराला त्यांच्याशी लढण्यासाठी ताकद देते. ज्या व्यक्तीची रोगप्रतिकार शक्ती मजबूत असेल तो व्यक्ती फार कमी आजारांना बळी पडतो आणि नेहमी निरोगी राहतो. जर तुम्हालाही तुमची रोगप्रतिकार शक्ती मजबूत राखायची असेल तर आवर्जून नारळाचे आणी तीळाचे सेवन करा. कारण नारळामध्ये रोगप्रतिकार शक्ती वाढवणारे गुण , आरोग्यासाठी तीळ वापरणे अत्यंत फायदेशीर आहे. हिवाळ्यात हे वापरणे फायदेशीर मानलं जात. खोबरे तिळामध्ये पोषक तत्त्वांचा खजिना असतो. .खोबरे आणी तीळ उष्ण असल्याने थंडीमध्ये शरीरातील उष्णता टिकवून ठेवण्यासाठी त्यांचा वापर केला जातो. खोबरे म्हणजे राजा आणी तीळ म्हणजे राणी , दोघांचा संसार ऐकमेकांच्या साथीशिवाय पुर्णत्वास जाणार नाही . शरीररुपी राज्य चालवण्यासाठी दोघांची गरज असतेच म्हणून बहूधा ह्या चटणीला " राजाराणी " म्हणत असावेत . मग घ्या लिहून साहीत्य आणी कृती .

**साहीत्य :** एक वाटी सुके किसलेले खोबरे , अर्धी ते पाऊण वाटी तीळ , पाव वाटी पंढरपूरी डाळे , तीन ते चार हिरव्या मिरच्या , मोठा चमचा लिंबाचा रस , एक चमचा दाण्याचा कूट , मोठा चमचा बारीक चिरलेली कोथिंबीर ,चवीनूसार मीठ साखर , हळद , हिंग , जिरे , दोन ते तीन चमचे तेल ईत्यादी .

**कृती :** कढईत तेल गरम करुन घ्या .त्यात जिरे घाला मग बारीक चिरलेल्या मिरच्या , बारीक चिरलेली कोंथिंबीर घातल्यावर लगेचच हळद घाला म्हणजे छान हिरवट पिवळा कलर येतो .आता त्यात पंढरपूरी डाळे घाला. तीळ , खोबरे घाला गस बारीक करा. आता चवीनूसार साखर मीठ घाला .एकसारखे हलवा आता लिंबाचा रस घालून मिश्रण एकसारखे परता. खोबरे कुरकुरीत होईपर्यत मधूनमधून मिश्रण हलवा. खमंग ,कुरकुरीत अशी तीळखोबऱ्याची राजाराणी चटणी तयार .बघा मग करुन नक्कीच सगळ्यांना आवडेल.

# फ्रुट डेझर्ट ..



आधुनिक केसरी



सौ. स्नेहा मुसरीफ
संपर्क क्र. ९५०३४३४४२४

साहित्य : 2 संत्री , 2 किवी , 4 स्ट्रॉबेरी, पिकलेली पपई , 2 केळी , 1 सफरचंद , पाव वाटी साखर,बदाम पिस्ते काप , पाऊण लिटर दूध ,अर्धा कप कस्टर्ड पावडर , 8..10 थेंब व्हॅनिला इसेन्स ,अर्धा कप मिठाई मिक्स.. कन्डेन्स्ड मिल्क .

कृती : प्रथम गॅसवर अर्धा लिटर दूध गरम करण्यास ठेवावे.चांगले तापले की साखर घालावी .साखर् विरघळली की एका बाऊल मध्ये राहिलेल्या पाव लिटर दुधात कस्टर्ड पावडर नीट मिक्स करून हळू हळू उकळत असलेल्या गॅस वरच्या दुधात घालावे.हे घालत असताना सतत ढवळत राहावे म्हणजे गुठळ्या होणार नाहीत. मग त्यात कॅन्डेन्स्ड मिल्क व व्हनिला इसेन्स घालावे.हे लगेचच घट्ट होईल.मग ते थंड करण्यास ठेवावे. संत्रे आणि किवी यांची साले काढून थोड्या पातळ चकत्या कराव्यात व बाकीच्या मध्यम फोडी कापव्यात.पपईची पण साल काढून फोडी कराव्यात.साधारण 7..8 फोडी घ्याव्यात. स्ट्रॉबेरीच्या पण काही पातळ चकत्या व फोडी कराव्यात.सफरचंदाच्या व केळीच्या साले काढुन पातळ फोडी कराव्यात. एका काचेच्या आडव्या खोलगट बाउलमध्ये आपल्याला आवडतील तशा रंगसंगती मध्ये फोडी लावून घ्याव्यात.मग बाकीच्या शिल्लक राहिलेल्या सर्व फोडी,बदाम पिस्ते गार झालेल्या घट्ट दुधात मिसळावेत.हे सर्व मिश्रण सावकाशपणे शक्यतो खालच्या फोडी हलू न देता अलगदपणे बाऊल मध्ये भरावे.फ्रीझर मध्ये सेट करण्यास ठेवावे. साधारण अर्ध्या तासाने काढून सेट झाले असल्याची खात्री करून घ्यावी. एकदम घट्ट झाले की एका डिश मध्ये काढून सुरीने त्याचे काप करावेत व सर्व्हिंग डिश मध्ये काढून थंड सर्व्ह करावे.

**वैशिष्ट्य :** ही डिश एकदम हेल्दि व नावीण्यपूर्ण आहे. आकर्षक तर इतकी आहे की पाहूनच लहानापासून मोठ्यांपर्यंत सर्वांनच्यांच तोंडाला पाणी सुटेल. आइसक्रीम व रंगीबेरंगी विविध फळे यांच्या सुरेख संगमामुळे पुन्हा पुन्हा खाण्याचा मोह नक्कीच आवडेल.

# माझी चैत्रगौर

आधुनिक केसरी

सोनसळीचा पदर, सांजरंगाची पैठणी
गर्भरेशमी आभाळशेला, पांघर गं साजणी ...
सूर्यकिरणांनी रेख भाळी कुंकवाची चिरी
गळा नक्षत्रमण्यांची माळ
खुलू दे साजिरी, जाईजुईचा मांडव
त्यात चंदनाचा झूला, ये ग सये चैत्रगौरी
सख्या झुलविती तुला...
(साभार गुगलतात्यांचा खजीना)

चैत्र महीना लागतो तो हिरव्या पालवीची चाहूल घेवूनच . वसंताच्या चाहूलीने झाडे हिरव्या रंगाने मोहरून बहरु लागतात . उन्हाची चाहूल लागते आणि सुर्यदेव हळूहळू तापायला सुरवात करतात . काळ्या माठाच्या थंडगार पाण्याला वाळ्याच्या वासाची संगत , केशरटपिवळ्या पुरणपोळीने होळीची लज्जत वाढते . मग येतो चैत्र गुढिपाडवा नवसंवत्साराची करुन सुरवात रंगीबेरंगी साडी लेवून , पांढरी शुभ्र साखरेची गाठ , हिरव्याकंच कडूलिंबाच्या पाल्यांने तिची नजाकत अजूनच वाढते . गौरीच्या आगमनाने तर वसंताची रंगत बहरायला सुरवात होते. आमच्या परिक्षा झाल्या की आईची लगबग सुरु व्हायची ती हळदीकुंकवासाठी. स्वतःच्या सोयीने हळदीकुंकवाचा दिवस ठरला जायचा , आदले दिवशी पिवळे,करड्या रंगाचे हरभरे पितळेच्या बादलीत मोठ्या पातेल्यात गार पाण्यात रात्रभर डुंबत बसायचे . सकाळी सकाळी त्यांच्या सुदृढेत भरपूर वाढ झालेली असायची , आता त्यांची रवानगी गोणपाटावर व्हायची त्यातले अंगकाठी न बदलेले काढून परत पाण्यात नाहीतर उन्हात जायचे .



सौ. आरती राजाराम
परिचारक

हिरव्या ,हिरव्या मोठ्या मोठ्या कैऱ्या सालीकाढून किसल्या जायच्या . पिवळी धम्मक हरभऱ्याची डाळ पाण्यात भिजवत ठेवायची .पितळी गौरीचे फेशियल छान लिंबूसाखर लावून व्हायचे . कोमट तेल,पाण्याने मसाज व्हायचा , कोरड्या रुमालाने घासून अंग कोरडे करायची , मग सकाळी साग्रसंगीत पूजा करुन ठेवणीतल्या रेशमीखणाची अंगभर साडी नेसून दागीने , हार, फुले लेवून खास तिच्यासाठी तयार केलेल्या ( पाटावर ) कोंदणात बसायची .

आस्मादिकांचे माहेर परभणी रेल्वे कालनीत स्टाफक्वार्टसमध्ये त्यामुळे शेजार सगळा कास्मोपालीटिन ! त्यामुळे आमच्याकडे आणी एकदोन घरातच हळदीकुंकावाचा समारंभ असायचा . त्यातही आई भयंकर हौशी ! पंढरपुरची , उत्पात घराण्यातली .मोठ्या बहिणी आईला सगळ्या कामात मदत करुन , अंगणात सुंदर रांगोळी रेखाटायच्या . मी आणी धाकटी



बहीण ह्यांच्याकडे आमंत्रण देण्याचे काम असायचे . कालनीभर , नातेवाईक यांचेकडे आदले दिवशीच पोच व्हायचे .

सगळेजण ह्या आमंत्रणाची वाट पाहत असायचे . आई समईवर गौर बसवायची तिला चापूनचोपून , सुंदर , भराभरा वेगळ्यावेगळे पद्धतीने साडी नेसवण्यात तर तीचा हातखंडाच.... . मग गौरीच्या प्रभावळीवर बाहुलीचा मुखवटा बसवायचा तिला छान दागिने घालायचे , नटवायचे . कधी झोपाळा , कधी बैलगाडीत , कधी हत्तीवर ,कधी वनराणी फुलराणी अश्या विविध रुपात गौर बसायची . आम्हा बहीणीची खेळणी तिच्या पुढ्यात मांडायची. पांढऱ्या शुभ्र एकसारखी मुरड घातलेल्या करंज्या , गोलगोल काटेरी खुसखुशीत चकली , टपोरे एकसारखे गोल गरगरीत वळलेले बेसनाचे ,रव्याचे लाडू , पिवळी धम्मक शेव , सोनेरी रंगावर तळलेले शंकरपाळे हे सगळे ठेवणीतल्या डिशमध्ये बसून वेगळ्यावेगळ्या रंगानी भरलेल्या ग्लासवर ठिय्या मारुन बसायची .खरतर उन्हाळ्याच्या सुट्टीतील खाबूगिरीसाठी ह्यांची बेगमी असायची . घरी येणारी प्रत्येक स्त्री जणू माहेरवाशीणच ! तिला अलगद हळदकुंकू, चांदीच्या मोराच्या पोटातले अत्तर लावायचे, हलक्या हाताने गुलाबदाणीतले थंडगार पाणी शिंपडताना आम्हाला फार मज्जा यायची . चुरमुरे आणी काकडीच्या गोलगोल चकत्या तिच्या हातावर ठेवायच्या .खिरापतीला साखरखोबरे असायचेच .! मग तिच्या हातावर हिरव्या हिरव्या बदामाच्या पानावर पिवळीधम्मक आंब्याची डाळ त्यातून अधूनमधून डोकावणारी हिरवी मिरची आणी कोथिंबीर वरून घातलेली चरचरीत फोडणी अहाहा ! आणी जोडीला परफेक्ट चवीचे वेलदोडे घालून केलेले पन्हे ! क्या बात है ! अशी दाद बऱ्याच जणांनकडून यायची तेव्हा आईच्या चेहऱ्यावरचे कृतकृत्य झाल्याचे भाव असायचे . असा गौराईसोबतचा पाहुणचार घेवून मंडळी तृप्त व्हायची पुढच्यावर्षीच्या हळदीकुंकावाची वाट बघत !! !! अशी अन्नदा ,सुखदा, परिश्रमाने ,कल्पकतेने नटवणारी ,मिरवणारी कष्टाळू , मायाळू ,प्रेमळ , सुगरण गौराई म्हणजे साक्षात आईचेच रुप !!

# खुलताबाद आरोग्य विभागातर्फे आशा दिवस व जागतिक क्षयरोग दिवस

आधुनिक केसरी न्यूज



खुलताबाद : आरोग्य विभागाच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्र बाजार सावंगी येथे आशा दिवस आणि जागतिक क्षयरोग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला,ग्रामीण भागाच्या आरोग्य व्यवस्थेचा कणा असलेल्या आशा यांचा गौरव केला जावा या उद्देशाने दरवर्षी 24 मार्च हा आशा दिवस म्हणून साजरा केला जातो.त्याचेच अवचित्य साधून हा कार्यक्रम राबविण्यात आला. ग्रामीण कार्यक्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अशांना तालुका आरोग्य अधिकारी यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले तसेच यावेळी आशांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा व त्यांना हक्काचे व्यासपीठ निर्माण व्हावे यासाठी इतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे व रांगोळी स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी आरोग्य विषयक विविध सुंदर रांगोळ्या आशा मार्फत रेखाटण्यात आल्या,उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या आशांना पारितोषिक देण्यात आले.

याबरोबरच आज जागतिक क्षयरोग दिन असल्याने जिल्हा क्षयरोग कार्यालयाच्या वतीने येथे क्षयरोग दिन ही साजरा करण्यात आला त्यानिमित्ताने क्षयरोग विषयी जनजागृती करण्यात आली आणि शासनाच्या वतीने क्षयरोग संदर्भात देण्यात येणाऱ्या मोफत तपासणी,मोफत औषध सेवा आणि इतर सुविधांची ही माहिती देण्यात आली तसेच क्षयरोग रुग्णांना सकस आहारासाठी शासनातर्फे 500 रु देण्यात येणाऱ्या भत्याविषयी माहिती देण्यात आली यावेळी महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुरमू यांनी उद्घाटन केलेल्या निक्षय मित्र या संकल्पने संदर्भातही माहिती देऊन जास्तीत जास्त कर्मचारी व नागरिक यांना निक्षयमित्र होण्यासंदर्भात अहवाण करण्यात आले यावेळी जिल्हा क्षयरोग कार्यालयाच्या वतीने क्षयरोग निर्मूलनासाठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर किरण शिंदे यांनी आशांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले.सदरील कार्यक्रमसाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर किरण शिंदे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉक्टर निलोफर अंजुम,वैद्यकीय अधिकारी जिल्हा क्षयरोग केंद्र डॉक्टर सतीश गवळी व डॉ तृप्ती चव्हाण,वरिष्ठ उपचार पर्यवेक्षक राजकुमार दुर्गे,आरोग्य सहाय्यक श्री चौधरी,समुदाय आरोग्य अधिकारी डॉक्टर रमेश शेळके डॉक्टर विशाल ढेपे,आरोग्य सहायक विजय जाधव,श्री विजय जोजारे,सुनील जाधव,आरोग्य सेवक अशोक आहेर,अनिल बनकर,सुनील करपे,सुनील बहुरे,अमजद सय्यद एलएचव्ही किरण देहाणकर,आरोग्य सेविका ज्योती चिमणे, वैशाली चौधरी,सीता माहुरे,शुभांगी काळे, प्रियांका दळवी,बीसीएम श्री ज्ञानेश्वर हरदे,श्री दीपक पाडळे,आमरदीप सोनवणे,तालुका लेखापर्यवेक्षक प्रतीक्षा पवार संध्या चव्हाण,गट प्रवर्तक भागूबाई जाधव,राधा ठेंगडे,छाया तुपे,सविता राठोड,मनीषा वरकड,तसेच आशा यांची प्रमुख उपस्थिती होती कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉक्टर किरण शिंदे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर रमेश शेळके यांनी केले डॉक्टर निलोफर अंजुम यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

# खांडवी फाट्यावर टिप्परची एसटीला धडक

## एस. टी. ड्रायव्हरसह सात ते आठ प्रवासी किरकोळ जखमी

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव जा. :** 25 मार्चच्या सकाळी साडेसहाच्या दरम्यान मुक्ताई नगर आगाराची एम.एच.२० एल ०७२० क्रमांकाची प्रवाशांना घेवून जाणारी बस जळगाव जामोद बस डेपोवरून मुक्ताई नगर कडे जात असतांना खांडवी फाट्यावर माणेगाव वरून भरधाव वेगाने वाळू घेवून जाणाऱ्या विना नंबरच्या टीप्परणे बसला जोरदार धडक दिली...यामध्ये एस.टी. बस कंडक्टर,डायव्हर सात ते आठ प्रवाशांना किरक दुखापत झाली असून टीप्परमधील चार ते पाच मजूरांना सुद्धा किरकोळ मार लागलेला असून जखमिंना जळगाव जामोद ग्रामीण रूग्णालयात दाखल केले असून ज्यांना ज्यास्त मार लागलेला आहे त्यांना खामगाव रेफर करण्यात आले आहे.त्यांना हॉंस्पीटलमध्ये रेफर करण्यात आले आहे.

बुलढाणा जिल्ह्यातून संग्रामपूर, शेगाव,जळगाव जामोद, नांदुरा, मलकापूर या तालुक्यातून पुर्णा नदी वाहते,याच नदीतून रात्र अन् दिवस वाळू माफियांकडून अवैधपणे रेतीची वाहतूक केल्या जाते.या रेतीमाफीयावर अंकुश ठेवण्यात महसूल प्रशासन कुचकामी ठरतांना दिसत आहे.यागोदर सुद्धा जिल्ह्यात अशा अपघातच्या घटणा घडलेल्या आहेत.परंतू या वाळू माफियांचा बंदोबस्त करण्यास प्रशासण सपशेल अपयशी ठरत आहे.त्यामुळेच त्यांना एवढी मुजोरी चढली आहे. दिवसेंदिवस अवैधपणे वाहतूक करणाऱ्या या वाहणांच्या अपघातामध्ये वाढ होत आहे.रात्र दिवस रेतीची अवैधपणे चोरी होत असून प्रशासनाचे याकडे साठ दुर्लक्ष आहे...सरपंच,तलाठ्यापासून मोठ्या अधीकाऱ्यां प्रयंत रेतीमाफियांचे हप्ते सुरू आहेत. त्यामुळे जिल्ह्यात अवैधपणे रेतीची अवैधपणे वाहतूक सुरू असून अपघाताचे प्रमाणही वाढत आहे.

# लिटल चॅम्प इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात




आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** मुधळवाडी येथील लिटल चॉम्प इग्रंजी शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन आज थाटात साजरे झाले. यावेळी शाळेतील मुला-मुलींनी नवीन जुन्या हिंदी-मराठी गीतावर आकर्षक वेषभुषा परिधान करून विद्यार्थ्यीनी दिलखेचक नृत्ये व अभिनय सादर केले,यावेळी बाल विद्यार्थींनी आकर्षक वेशभूषा करुन पालकांचे लक्ष वेधले एकूण चौदा उत्कृष्ठ रेकार्डीग डॉन्स करणाऱ्या विद्यार्थांमधून पथम, द्वितीय, तृतीय क्रमांक काढून त्यांना मेडल आणि प्रमाणपत्र शोळेचे संस्थापक अध्यक्ष युनूस मंजुरभाई शेख यांच्या हस्ते व दिव्य मराठी चे प्रतिनिधी रमेश शेळके यांच्या उपस्थिती वाटण्यात आले. याप्रसंगी लिटल चॉम्प शाळेचे संचालक युनूस शेख,शिक्षिका वर्षा गिरे वर्षा जैन , दीपाली तूपकरी, अनुराधा वाघ ,अंकिता औचर आरती चाबुकस्वर,सह इतर उपस्थित होते. यावेळी स्नेहसंमेलनाचे सुत्रसंचालन वर्षा गिरे,यांनी तर आभार अनुराधा वाघ यांनी व्यक्त केले, या स्नेहसंमेलनासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.

# सावळदबारा येथे पवित्र रमजान महिन्याची सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथे पवित्र रमजान महिनाला सुरुवात झाली असून भर उन्हाळ्यात येत आहेत. भर उन्हाळ्याचे तापमान वाढ मधे हि ठेवणार उपास कालच्या चंद्र दर्शन नंतर पवित्र रमजान महिनाच्या सुरुवात झाली आहे.मार्च आणि एप्रिल महिन्यात कडक उन्हात या वर्षी रोजे रोजेद्र -रांची चांगली कसोटी आहे.मुस्लिम बांधव वर्षांच्या बारा महिने पैकी रमजान महिना विशेष मानला जातो. याच महिन्यात पवित्र धर्मग्रंथ कुराण अव-तरीत झाले.मागील चार वर्षांपासून पवित्र रमजान महिना उन्हाळ्यात पाहणार उन्हाळ्यातील रोजे हे रोजेदारांची खरी कसोटी पाहणारे ठरत असतात. कारण रोजा ठेवल्यानंतर संपूर्ण दिवसभर तब्बल १४ ते १५ तास विना अन्न, पाण्या चे राहवे लागतो. मुस्लिम समाजातील सात वर्षाच्या मुलापासून आबालवारूध रोजे धरतात. रमजान मध्ये मुस्लिम बांधव दिवसात नमाज पठण करून दिवस मध्ये इबादत मध्ये व्यस्थ असतो. संध्याकाळी इफ्तार नंतर ईशा ची नमाज नंतर विशेष तरावीची नमाज पण पठण करतो.अशी माहिती मुजावर मो.शब्बीर मो.सरवर सावळदबारा यांनी बोलताना सांगितले.





# हमारी अधुरी कहानी!

आधुनिक केसरी



सुनील शिरपुरे
संपर्क क्र. ७०५७१८५४७९

**ज्या गोष्टींना कुणीही नाकारू शकत नाही, त्या गोष्टींना युनिव्हर्सल ट्रुथ म्हणजे शाश्वत सत्य असे म्हणतात. त्यातीलच एक गोष्ट म्हणजे पहाटेचं स्वप्न...असं म्हटलं जातं की, पहाटेला बघितलेलं स्वप्न खरं ठरत असतं. तर असेल बहुतेक...एकदा अशाच एका पहाटेला गुलाबी बोच-या थंडीत मखमली दुलईमध्ये स्वत:ला टेक अप करून मी स्वप्नांच्या आटपाट नगरीत जावून लँड झालो. आणि... पुढे बघतो तर काय?**



तिच्या प्रशस्त घराच्या उंबरठ्यावर ती उभी असताना माझी नजर तिच्यावर पडताच क्षणी तिचा तो निरागस चेहरा, तिचं स्मितहास्य, तिचा शांत व मनमिळाऊ स्वभाव यामुळे माझ्या ह्रदयरुपी कॅमे-याने तिची प्रतिमा टिपून माझ्या मनपटलावर चित्रित केली. तेव्हापासून माझं तिच्यावर प्रेम बसलं आणि स्वप्न माझं फुलणार, असं वाटायला लागलं. माझ्या आयुष्यातील तो एक अनमोल ठेवा आहे. पण हे स्वप्न सत्यात उतरणार काय? याची अनामिक भीती मनात साचलेली. आपलं पहिलं प्रेम कसं व्यक्त करावं हेच कळेना. श्रावणाच्या पहिल्या सरीनं सृष्टीला धुंद करून टाकावं तशीच ती माझ्या जीवनात आली. अगदी हळूवारपणे...तिचं बोलणं, हसणं, दिसणं तिचा तो स्वभाव सारंकाही अगदी मनाला भारावून टाकणारं. तिची आणि माझी कळत नकळत जेव्हा कधी भेट झाली ती अपघातानंच. बघा! आता ती घाबरली असणार. अगं येडू! अपघात म्हणजे एक योगायोग.

मनात उचंबळणा-या विचारांचा अथांग महासागर म्हणजे भावना. प्रत्येकालाच आपल्या भावना कुणाजवळ तरी व्यक्त कराव्याशा वाटतात. व्यक्त केलेल्या भावनेच्या समाधानातूनच जीवनाचं सार कळत असतं. कारण ह्रदयातील या भावनांना आवर घालता येत नाही ना! त्या ओसांडणारच प्रेमाच्या सागरात अन् तिच्या विरहात पण...

तिला कसे सांगू
माझं मला कळत नाही
भावना येतात ओठापर्यंत
पण शब्दच मिळत नाही

प्रेम केल्यानं होत नाही. ते एकदाच नकळत केव्हा, कधी व कोणत्या परिस्थितीत होतं हे उमजतंच नाही. माझ्या बाबतीतसुद्धा असंच घडलं. मलासुद्धा कळलं नाही की, या मनातील भावनांच्या वेलीवर प्रेमाची कळी कधी उमलली व त्या कळीचं कधी प्रेम फुलात रुपांतर झालं, हे कळलंच नाही. पण एक मात्र निश्चित माझं प्रेम पवित्र व निःस्वार्थी होतं. आताही आहे आणि पुढेही राहणार. तेही केवळ तिच्यावरच. एकदा तिच्या अप्रत्यक्ष कथनाने माझ्या मनात कंप उसळविला की, 'मी तिला विसरलो म्हणून. कसं विसरणार बरं!

तिची आठवण आली नाही
असं कधीच झालं नाही
आठवायला विसरावं लागतं
पण तिला विसरताच आलं नाही

एकदा कुणीही ह्रदयाच्या कारावासात बंदिस्त झाला की, त्याला काढण्यासाठी ह्रदयच चिरावं लागतं. कारण त्याला तेथील वातावरणाची सवय झालेली असते. तो तेथे पूर्णतः एकरुप झालेला असल्याने काढता काढून निघत नसतो. आणि ती म्हणते...अगं येडू! तुझ्याविना दुस-या कुणालाही या वेड्या मनानं स्वीकारलं नाही आणि कधी स्वीकारणारही नाही. आताही माझ्याकडे तिची एक वस्तू जशीच्या तशी आहे. ती माझ्यापासून दूर होताना हातात हात दिलेला तो स्पर्श आजही मुठीबंद करून ठेवला आहे. प्रतिदिन प्रभातकाळी त्या स्पर्शाचं दर्शन करीत असतो.

मला तिच्याकडून कोणतीच अपेक्षा नव्हती. एवढंच का जेव्हा कधी मी अंतरंगातून मनानं पूर्णतः खचून जाणार तेव्हा केवळ प्रेमानं पाठीवर हात ठेवून 'तू काही घाबरू नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे' या दोन शब्दाने धीरगंभीर आधार दिला असता तरी या वेड्या मनाला पुरेसा होता. कारण माणूस एका यशोशिखरावर प्रगतीने तेव्हाच झगमगू शकतो, जेव्हा त्याच्या पाठीशी एक प्रेरणात्मक शक्ती उभी असते. ती शक्ती म्हणजे दुसरी कुणीही नसून आपल्यावर प्रेम करणारी व्यक्ती असते. प्रत्येक दिवशी उगवणारा सूर्य तोच असला तरी दरदिवशी तो वेगळंच महत्त्व घेऊन येतो. अगदी त्याचप्रमाणे प्रत्येक दिवशी तिला बघण्यासाठी मनाला लागलेली भावस्पर्शी हुरहुर तर दुसरीकडे ती न दिसल्यामुळे पूर्ण दिवस उदासीनतेत जायचा.

प्रिये आठवण तुझी येता
मन माझं उदास होते
एका क्षणासाठी का होईना
गालावर अश्रूंचा पूर येते

कधीकधी वाटायचं, तिला सर्व काही सांगून मोकळं व्हावं. मन रितं करून मनाचा भार हलका करावा. अव्यक्त प्रेम तिच्यापुढे व्यक्त करावं पण...

प्रेम कुणावरही करा, पण ते सांगायचं नसतं
नेत्र पल्लवीच्या संकेतानं, तर ते जाणायचं असतं

नाण्याला दोन बाजू असतात ना! तसंच प्रत्येक गोष्टीलासुद्धा असतात. दुस-या बाजूंनी विचार केल्यास...

तिला समजावून सांगावं
अशी ही गोष्टच नव्हती
न सांगितल्यामुळे तिला समजलं नाही
एवढीही ती नासमज नव्हती

तत्पूर्वी एक विचार मनात लहर उसळवून गेला की, माझ्या ज्या भावना तिच्याबद्दल आहेत, त्याच भावना तिच्या पण असेल काय? ती माझ्या प्रेमाचा स्वीकार करेल काय? तिला काय वाटतं माझ्याबद्दल हे मला कधी कळणार की नाही? असं किती दिवस माझं प्रेम बंदिस्त राहील? ह्रदयातील या भावना कधीतरी एकदा मोकळ्या कराव्याच लागतील ना!

समजून घे तू सारं
मी न सांगता काही
कदाचित उद्या मला
ते सांगता येणार नाही

मला माहीत आहे की, माझं तिच्यावर जेवढं प्रेम होतं तेवढंच तिचंसुद्धा माझ्यावर होतं. पण त्या येडूला कळलंच नाही. असं असतानाही माझ्यात अशी कोणती उणीव होती की, ज्यामुळे तिला मला जीवनाच्या अर्ध्या वाटेवरच सोडून जावं लागलं. मी मन मानेल तेथे, स्वतंत्र पक्षाप्रमाणे मनसोक्त विहार करीत होतो. त्याचवेळी ती मोठ्या खुबीने माझ्याभावती प्रेमाचे जाळे विणून मला कैद केलं आणि मग...

ती माझ्या आयुष्यात आल्यावर
काहीतरी मिळाल्याचं समाधान वाटलं
पण मला सोडून गेल्यावर
सर्वकाही हरविल्याचं दुःख दाटलं...

निदान ती तिच्या विश्वात परतताना न घाबरता तिच्या मनात जे काही होतं, ते सांगून मोकळं व्हायला हवं होतं. तिचा नकार असता तरी विशेष फरक पडला नसता. कारण ज्याप्रमाणे कुणालाही नापसंत करण्याचं काही कारण नसतं. त्याचप्रमाणे कुणालाही पसंत करण्याचं काही सबब नसतो. हा तर आपापल्या मनाचा प्रश्न असतो.


# अलंकाराचा साज पांघरुन आलेला काव्यसंग्रह

आधुनिक केसरी



विशाल मोहोड
संपर्क क्र. ७०५७१८५४७९

**जिथे आनंदाला सीमा राहतं नाही... आणि अंतरंग फुलून फक्त परमोच्च सुखाच्या अनुभवाची अनुभूती होते... जिथंला शब्दन् शब्द काळजातल्या वृंदावनात बागळायला लागते. अशी एक आनंदाची लहर मनाच्या किनाऱ्याला मनमोहक करून जाते आणि अलंकाराच्या गावी जाऊन फिरून यावं,जणूकाही स्वतःला स्वर्ण कलशामध्ये भिजून घ्यावं असंच कुठेतरी या कवितेच्या बागेत फेरफटका मारून आल्यावर वाटणे स्वाभाविक आहे.**




असाच काहीसा हाती पडलेला एक अदभूत कवितासंग्रह म्हणजे "रानफुलांच्या कविता " कवी डॉ. सतीश कोंडू खरात हे पेशाने जरी डॉक्टर असले तरी त्यांच्यामधल्या प्रतिभा शक्तीचं जेवढं कौतुक करावं तेवढं कमीच... त्यांची एक एक कविता जणूकाही  लोखंडाला परिस स्पर्श करावी अशीच आहे. आणि त्यामुळेचं कदाचित हा योगायोग म्हणावा की काय..? या संग्रहाचं प्रकाशन सुद्धा पुणे येथील परीस प्रकाशनानेचं केलेलं आहे. असा दुर्मिळ योग सहजासहजी शोधून सापडत नाही असाच आहे. त्यामध्ये आणखी एका नावीन्यतेची भर घालावी ती म्हणजे प्रख्यात कवी किशोर बळी यांची प्रस्तावना आणि प्रा. अशोक बागवे यांचा मलपृष्ठावरील ब्लर्ब हा या चिरतरून संग्रहाचं आणखीनच सौंदर्य खुलवणारं आहे.

कवितेच्या जगात वावरायला लागलं की, माणूस स्वतःच जगणं विसरतो. मग कविता जणू त्याच्या प्राणाच्या पलीकडे जाऊन आतल्या खोल अंतरंगात दडून बसते.आणि काव्याचं एक एक रोपटं उगवायला लागते.कवी डॉ सतीश खरात यांच्या 'रानफुलाच्या कवितेला' अनेक पुरस्कारानी ओवाळणी घातली आहे. रानावनातल्या अनपेक्षित गोष्टी आणि अलंकारीक भाषा घेऊन अवतरलेली कविता ही जीवनातल्या प्रत्येक कडू-गोड अनुभवाचा भावार्थ उलघडा करणारी आहे.एकूण ४० कविताचा हा कलश अक्षरशः डोक्यावर घेऊन नाचावे वाटते. पहिल्याच पानावर कोरलेल्या 'रानफुले' कवितेमध्ये कवी म्हणतात,

"इवलाली रानफुले
वाऱ्यावर घेत झुले
दवारल्या पात्यावर
सोनवर्खी ऊन खुले"

कवीने प्रत्येकच कवितेवर आपली विशिष्ट छाप पाडल्यासारखे भासते. प्रत्येक कवितेचा दरवळ काही निराळाच आहे.कवितेतील शब्दन् शब्द गंगेत न्हाऊन निघाल्याप्रमाणे नवंतेजाने उसळ्या मारते. केव्हा केव्हा तर वाचणाऱ्याच्या मनात असा विचार येऊन जातो की, कवी सतीश खरात सरांना  निसर्गाची खूप मोठी देणं लाभली असावी, म्हणूनचं ते शब्दाशी इतके लाडीवाळपणे वागतात. त्यामुळेचं मला ते शब्दप्रभू वाटतात.

"मुळावरच घाव करू" या कवितेमध्ये तर कवी एका बापाचं विदारक दुःख मांडताना  आपल्या मनात दुःखाचं खूप मोठं वारूळ करून जाताना दिसतात.ओझ्याखाली दबलेल्या घामाचं मोल सांगताना ते म्हणतात की,
"आपले हात आपल्याला जड नसतात, त्यामुळेचं संसाराचा कधीच भार वाटला नाही,आणि पोट भरण्यासाठी कष्टापुढे कधी झुकलो नाही " अशा अनेक नवीन गोष्टीचा उगम जणूकही ही कविता आपल्याला शिकवून जाते.

तर त्याच धाटणीची 'स्वप्न' नावाची कविता अनेक बोचऱ्या दुःखात हसऱ्या वेदना देऊन जातात.शब्दांनी दुखावर वार करणे तेवढं सोपं नसते पण कवी प्रत्यक्ष अनभूती घेऊन त्यावर लिहिणारे कवी आहेत. पुढे ते म्हणतात,

सुनसान शिवारात
काटेरी फांदीचा
टोचणारा निवडुंग
सलणाऱ्या बाभुळी
रुतणाऱ्या धस्कटांनी
रक्ताळलेली पावलं
पळसाच्या लालजर्द फुलासारखी
घराचा उंबरठा ओलांडताना
तेव्हा बोचाऱ्या वेदना
हसऱ्या होतात.

माणसाने दुःख सहन करावं तर किती करावं याच्याही सीमा असतात, बंधन असतात. परंतु त्या सर्वच सीमा लेखकाच्या कवितेने पार केलेल्या दिसतात. मग ते बापाचं दुःख असो की,मायचं दुःख असो. ते लेखकाला व्याकुळ करताना दिसते.कवितेतून शब्दाची मांडलेली कैफियत ही माणसाला दुःखाच्या खोल गर्तेत घेऊन जाते.त्यातले स्वानुभव आणि चौफेर शब्द सामर्थ्य ही कलात्मक दृष्टी घेऊनच कवी जन्माला आले असावे असे वाटते, कधी कधी तर ते स्वतःच  दुःखाच्या झुल्यावर झुलून माणसाला माणूस होण्यासाठी विनंती करताना दिसतात.

"माणूस माणसासारखा वागला की,
मंदिर, मस्जिद होतं नाही,
माणुसकीचं नातं जुळतं
आर्त कोलाहल होतं नाही "

कवी खरात यांना फक्त माणसातला खरा माणूस पाहायचा आहे. कारण दुःख माणसाला माणूस म्हणून वागायला शिकवते तर सुख माणसाला माणसातला अहंकार दाखवते.ज्याप्रमाणे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गुरुदेवाकडे आर्त हाक देतांना आपल्या भजनात म्हणतात की,

"माणूस द्या मज, माणूस द्या
भीक मागता प्रभू दिसला"

त्याचप्रमाणे कवी समाजात माणूस शोधण्याचा प्रयत्न करतो. आणि पुढे ते म्हणतात, "घरावरून गेलेलं सुख नकोय मला, माझ्या पदरात पडलेलं वेदनेच रान सुद्धा मला प्रिय आहे.. कारण भाग्यानुसार प्रत्येकाला जेवढं मिळायचं तेवढं मिळतच. खरं तर तेवढ्यावरच माणसाने समाधान मानून ऊन, वारा, पाऊस जसे कुणी सांगितलं म्हणून बदलत नाही तशी आपण स्वतःला सवय करूनच घ्यायला हवी तेवढ्याची......"

सुख, दुःख, गरिबी,श्रीमंती याभोवती फिरत असलेली कविता कुठेतरी  बाहेर येऊन रात्रीच्या गर्भात,मंद तारकांच्या विलासात धुंद झालेली भासते. म्हणूनचं 'चंद्रोत्सव' या कवितेत कवी म्हणतात,

"अबोल रात्रीस
चांदणे दुधाळ
उत्सव मधाळ
चोहीकडे "

तर  कधी चंद्रबन सारख्या कवितेत कवी शब्दाची आरास मांडताना दिसतात जसं ताऱ्याचं रिंगन, तरुच्या सावल्या,सरूचं वन,तिमिर मौन, नितळ नभ,काजव्यांचे थवे, काळोखाचे दिवे, यापद्धतीने कवीला शब्दप्रभू म्हटल्यासं वावगे ठरणार नाही. पुढे चंद्रबन मध्ये ते लिहितात

सुरूच्या वनात
घुटमले रात
उदास वाऱ्यात
गुंतलेली"

कुठे रात्रीचं वर्णन, तर कुठे उदास वारा यामध्ये गुंतलेला प्रत्येक प्रसंग मनाच्या नवीन पालवीला जन्म देतो हे विसरता येणारं नाही.शब्दा शब्दात केलेलं अलवार वर्णन हे  खरंच आकाशात जणू इंद्रधनुष्याच्या रंगाला फिके पडणारं वाटते.

म्हणूनचं पुढे कवी 'श्रावण हर्ष' या कवितेत म्हणतात,

रानफुलांचे उधळीत रंग, वाऱ्यावर डोलती
लवलवणारे गवत पोपटी, निळ्या नभाशी बोलती
हिरवी नवती सजली भवती, आला श्रावण
हर्ष दाटला चोहीकडे चैतन्याने फुलले जीवन"

कवितेचे शीर्षक जरी 'रानफुलांच्या कविता' हे असलं तरी, रानफुलाशी संबंधित रानावनासोबतचं ग्रामीण जीवनाचा वेध घेणारा हा काव्यसंग्रह आहे.संपूर्ण कवितेचा आढावा घ्यायचा झाल्यास कवीने "रानफुलांच्या कवितेच्या "  माध्यमातून  सूक्ष्म सूक्ष्म गोष्टीचा यथार्थपूर्ण ज्ञानसागर वाचकांच्या पुढ्यात ठेवला आहे. समुद्रातुन मोती वेचावे आणि कायम स्वरूप ते ध्यानी,मनी, चित्ती वसू द्यावे याप्रमाणे त्यांची कविता मनामनाचा ठाव घेणारी कविता आहे. त्यामध्ये दवं भिजल्या पहाटे, माती, चांदवा, कातरवेळ, पायवाट, उजेड जपून ठेवा, बैल, काळोख उजळल्या रात्रीस आणि चांदणरात यासारख्या सुवर्णमद्य प्राशन करून आलेल्या कविता वाचणाऱ्याला धुंदी चढवल्या शिवाय सोडतं नाही. एकंदरीत संपूर्ण कवितासंग्रहच हा जन्मता तोंडात चांदीचा चमचा घेऊन आल्यामुळे श्रीमंतीचा थाट हा सुरुवातीपासूनचं झळकतो यात दुमतचं नाही, आणि साहित्य अकादमी पेक्षा कुठेच कमी नसलेला हा संग्रह कसा बरे त्यांच्यापासून दुर्लक्षित व्हावा या गोष्टीने मनं थोडं खिन्न होते.  तरी मी पुनच्छ एकदा,शब्दपंडीत,शब्दाचे धनी असणारे सामर्थ्यवाण कवी डॉ सतीश कोंडू खरात यांना या काव्य संग्रहासाठी अभिष्ट चिंतन चिंतीतो आणि पुढील लेखणासाठी भरभरून शुभेच्छा देतो.....!

# विश्व रंगभूमी व मराठी रंगभूमी: एक विचार मंथन!

आधुनिक केसरी

**बाल रंगभूमीने नाट्य व सिनेमा सृष्टीला अनेक कलावंत दिले आहेत. मराठी रंगभूमीला सशक्त करण्यासाठी लहान वयापासूनच रंगभूमीची माहिती व आकर्षण निर्माण होणे गरजेचे आहे. यासाठी अशा बालनाट्य शिबिराची आवश्यकता असते. यातून कलावंत, तंत्रज्ञ आणि रसिक निर्माण होण्याचे कार्य घडत असते. खऱ्या अर्थाने मराठी रंगभूमीला सशक्त करण्याचे काम राज्यभरात होणाऱ्या अशा बालनाट्य स्पर्धा आणि शिबिरातून होत असते. हे डॉ.सतीश साळुंके, डॉ.दीपा क्षीरसागर आणि आसिफ अन्सारी यांचे मत महत्त्वपूर्ण वाटते. मराठी रंगभूमीचा उद्धार केला पाहिजे, अशी तोंडाची वाफ आपण सतत दवडतो. परंतु रंगभूमीसाठी प्रत्यक्षात काय करतो? गेलेले सुवर्ण दिवस आठवण्याशिवाय रंगभूमीच्या उत्कर्षासाठी काही करतो का? हा चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे. अशी मनाची तगमग श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजी- अलककार हे या लेखातून व्यक्त करत आहेत.**

आद्य नाटककार अश्वघोष, तृतीय रत्नकार महात्मा जोतीरावजी फुले यांच्या लेखणीतून निर्माण झालेली भारतीय नाट्य परंपरा आजही बहरत आहे. विष्णूदास भावे यांच्या सीता स्वयंवर या नाटकाचा सन १८४३मध्ये सांगली येथे प्रयोग सादर करण्यात आला. त्यानंतर मराठी रंगभूमीने वेगवेगळी वळणे घेतली. त्यातील एक महत्त्वूर्ण वळण म्हणजे संगीत रंगभूमी होय. मराठी रंगभूमीवर सादर झालेली संगीत नाटके मराठी रंगभूमीचा सुवर्णकाळ होता. दरम्यान, अगोदर चित्रपट त्यानंतर खासगी दूरचित्रवाहिन्या आणि आता स्मार्ट भ्रमणध्वनी, इंटरनेट, संगणक यांच्या आक्रमणामुळे नाटक टिकणार का? अशीही शंका रसिकांच्या मनात येत आहे. सध्याची तरुणाई ही स्मार्टफोन, फेसबुक, व्हॉट्सअ‍ॅप, ट्विटर, इन्स्टाग्राम यात गुरफटलेली आहे. परंतु या सर्व माध्यमांकडे शत्रू म्हणून न पाहता मित्र म्हणून पाहुया. त्याचा मराठी नाटकांची प्रसिद्धी आणि तरुणाईला मराठी नाटकांकडे वळविणे यांसाठी अधिकाधिक उपयोग करून घेण्याची गरज आहे. लोकांना जे आवडते ते देण्यातच आपली मराठी रंगभूमी मश्गूल राहिली. म्हणून आपले नाटक मागे पडले. कोणतेही प्रश्न तीव्रतेने मांडणारे नाटक तुम्ही घ्या, ते चालले नाही. कारण मुळात प्रेक्षकांची मनोभूमिकाच बदललेली नाही. काही मोजके कलाकार-लेखक तसा प्रयत्न करीत असले, तरी त्याचा उपयोग होत नाही, असे स्पष्ट प्रतिपादन ज्येष्ठ नाटककार आणि लेखक प्रेमानंद गज्वी करतात.

रंगभूमीच्या इतिहासापासून ते आजची रंगभूमी, मराठी नाटककारांनी लिहिलेली नाटके, त्यांच्या मर्यादा, प्रेक्षकांची मनोभूमिका या मुद्द्यांवर सविस्तर विवेचन करणे काळाजी गरज आहे. विष्णूदास भावे यांच्या काळातील नाटके, ज्येष्ठ नाटककार खाडीलकर, देवल, कोल्हटकर, गडकरी यांनी लिहिलेली नाटके यांचा परिचय आजच्या पिढीला करून दिले पाहिजे. मराठी रंगभूमीचा इतिहास सांगताना सन १८४३पूर्वी रंगभूमी होती आणि तेव्हापासून व्यावसायिक रंगभूमी कशी अस्तित्वात आली? हे लक्षात घेतले पाहिजे. पूर्वी तंजावरमध्ये नाटके लिहिली जायची, त्यांचे प्रयोग व्हायचे. शिक्षणसम्राट महात्मा जोतिबा फुले यांनी सन १८५५ साली नाटक लिहिले होते. परंतु त्या नाटकाचा प्रयोगच होऊ शकला नाही. कारण ब्रिटिशांनी त्यांना प्रयोग करण्याची परवानगी दिली नाही. मात्र त्यांनी नाटक लिहिलेय, हे आपल्याला कळले ते सन १९७८ साली. कारण त्याची नोंदच नव्हती. याचा अर्थ रंगभूमीवरील नोंदी घेणे आवश्यक आहे. मराठी रंगभूमी खऱ्या अर्थाने बदलली ती विजय तेंडुलकरांच्या काळापासून. पण, त्यांना जेवढा त्रास झाला तेवढा कोणत्याही नाटककाराला झाला नाही. याचे कारण म्हणजे त्यांचे वास्तववादी लेखन होय. आजपर्यंतच्या रंगभूमीचा आढावा घेतला असता; असे लक्षात येते, की इंग्रजी नाटके मराठीत अनुवादित होतात. मात्र, मराठी नाटक इंग्रजीत अनुवादित होत नाहीत. शेक्सपिअरची सर्वच्या सर्व नाटके आपल्याकडे अनुवादित झाली आहेत. परंतु मराठीतील एकाही नाटककाराचे नाटक इंग्रजीत गेलेले नाही. आपली नाटके लंडनमध्ये वगैरे सादर होतात. मात्र ती तिथल्या महाराष्ट्र मंडळांनी म्हणजे आपल्याच लोकांनी आपल्याला निमंत्रित केलेले असते. इंग्रजांनी कधी आपल्याकडील एखादे नाटक सादर करण्यासाठी तेथे निमंत्रित केले आहे का? त्या ताकदीची कलाकृती निर्माण व्हायला हवी, हे नाटककार प्रेमानंद गज्वी यांचे मत गांभीर्याने विचारात घ्यावे लागेल. बाल रंगभूमीने नाट्य व सिनेमा सृष्टीला अनेक कलावंत दिले आहेत. मराठी रंगभूमीला सशक्त करण्यासाठी लहान वयापासूनच रंगभूमीची माहिती व आकर्षण निर्माण होणे गरजेचे आहे. यासाठी अशा बालनाट्य शिबिराची आवश्यकता असते. यातून कलावंत, तंत्रज्ञ आणि रसिक निर्माण होण्याचे कार्य घडत असते. खऱ्या अर्थाने मराठी रंगभूमीला सशक्त करण्याचे काम राज्यभरात होणाऱ्या अशा बालनाट्य स्पर्धा आणि शिबिरातून होत असते. हे डॉ.सतीश साळुंके, डॉ.दीपा क्षीरसागर आणि आसिफ अन्सारी यांचे मत महत्त्वपूर्ण वाटते. मराठी रंगभूमीचा उद्धार केला पाहिजे, अशी तोंडाची वाफ आपण सतत दवडतो. परंतु रंगभूमीसाठी प्रत्यक्षात काय करतो? गेलेले सुवर्ण दिवस आठवण्याशिवाय रंगभूमीच्या उत्कर्षासाठी काही करतो का? हा चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे.



आपल्याकडे असंख्य विषय आहेत. आपल्याकडील आदिवासींचे जगणे घ्या. देशाला स्वातंत्र्य मिळून एवढी वर्षे झाली, परंतु देशाने त्यांना आपल्यात सामावून घेतले आहे, असे दिसत नाही. त्यांचे जगणे हा नाटकाचा, विषय आहे. असे विविध विषय हाताळले गेले पाहिजेत. एक नाटककार म्हणून तुम्ही का लिहिता? असे जर मला विचाराल, तर मी म्हणेन की तुम्हीच मला लिहायला भाग पाडता. तुम्ही जर प्रश्न निर्माण केले नसते तर मी का लिहिले असते? समाजामध्ये निर्माण झालेले प्रश्न आहेत म्हणून लेखक लिहितो. माझी नाटके ज्या दिवशी कालबाह्य होतील तो दिवस माझ्यासाठी अविस्मरणीय असेल. हे प्रेमानंद गज्वी यांचे मतही आपणास विचार करायला भाग पाडते. समाजाला दिशा देण्याचे काम लेखक-कलावंत करतात. देशातील सांस्कृतिक पर्यावरण जेवढे निकोप राहील तेवढी विधायक कामे अधिक होतील. साहित्य-सांस्कृतिक क्षेत्राचे दमन न करता सरकारने योग्य धोरण ठरवावे. चांगले सांस्कृतिक धोरण जगभरात भारताची प्रतिमा अधिक उजळ करील, असा आशावादही यावेळी व्यक्त करायला हरकत नाही. सद्याच्या काळात सांस्कृतिक क्षेत्राची मोठी कुचंबणा होत असल्याचा सूर उमटतो. भाई तुम्ही कुठे आहात? या नाटकाचे लेखक, प्रसिद्ध समीक्षक डॉ.ऋषिकेश कांबळे म्हणतात, की सध्याच्या काळात साहित्य-संस्कृती क्षेत्राचे मोठ्या प्रमाणात दमन झाले. यापूर्वी संस्कृती व वाङ्मय क्षेत्रातील धुरिणांना विलक्षण प्रतिष्ठा दिली गेली. मात्र, सरकारला भय वाटत होते. लेखणीची ताकद सत्ता उलथवू शकते, या भयापोटी सरकारने लेखकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी केली. म्हणून अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या बाजूने आणि संविधानाच्या आधाराने लेखकांना भूमिका घ्यावी लागली. सरकार योग्य दिशेने असेल, तर भय वाटण्याचे कारण नसते. तसेच निकोप सांस्कृतिक वातावरणासाठी राष्ट्रीय पातळीवर संस्थात्मक उभारणीची गरज आहे.

मराठी रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाने अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करू नये, असे मत दवबिंदू पेटताना... या नाटकाचे लेखक डॉ.विलासराज भद्रे मांडतात. वेगवेगळ्या नाट्य प्रयोगाकरिता नवीन नाट्यसंस्थांची गरज आहे. जीवनमूल्ये अधोरेखित करण्याचे काम रंगभूमी करते. त्यामुळे या क्षेत्राला पोषक वातावरण तयार करणे सरकारची जबाबदारी आहे. प्रादेशिक रंगभूमी जपून लोककला व कलावंतांचे प्रश्न सोडवण्यासाठी उपाययोजना करण्यात यावी. रोजगाराच्या संधी नसल्यामुळे इंग्रजीचे स्तोम वाढले आहे. भारतीय भाषा टिकवण्यासाठी रोजगार वाढवणे आवश्यक आहे. मराठी दिनाच्या शासकीय कार्यक्रमात भाषासंवर्धन कमी होते आणि काही लोकांना त्यात रोजगार निर्मिती दिसते. साहित्य क्षेत्रात ज्येष्ठ झाल्याशिवाय संधी मिळत नाही. त्यामुळे तरुण लेखकांसाठी, रंगकर्मींसाठी राष्ट्रीय स्तरावर मंडळ स्थापन करून कार्यशाळा आयोजित करण्यात यावी. विविध उपक्रम राबवले पाहिजेत. महाराष्ट्र फाउंडेशन अमेरिका यांचा रा.शं.दातार पुरस्कार प्राप्त नाटककार डॉ.अनिलकुमार साळवे म्हणतात, की तरुण नाटककार रंगभूमीला नवीन रंगभाषा देत आहेत; त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी जुन्या-नवीन रंगकर्मींनी सुसंवाद साधने गरजेचे आहे. लोककलेचा आपल्याला समृद्ध वारसा लाभलेला असून लोकरंगभूमी संवर्धनासाठी अधिक प्रयत्न होत नसल्याची वस्तुस्थिती आहे, अशी खंत लोककलेचे प्रख्यात संशोधक डॉ.गणेश चंदनशिवे व्यक्त करतात. देशातील रंगभूमीला, सांस्कृतिक क्षेत्राला बळकटी देण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे, नाटक जगले पाहिजे. विविध पुरस्कार, समित्यांवर तज्ज्ञांची नियुक्ती करून पारदर्शी निवड करावी. नवीन लेखकाला आणि रंगभूमीवर उपजीविका असणाऱ्या कलावंत, बॅकस्टेज आर्टीस्ट, वृद्ध कलावंत यांना विविध योजनांमधून भरघोस अनुदान द्यावे. तरच रंगभूमी समृद्ध होईल, असे मला वाटते.

मुंबई-पुणे वगळता व्यावसायिक नाट्य निर्मितीचे प्रयत्न रसिकांचा प्रतिसाद घटल्याने बंद पडले आहेत. नवीन रंगकर्मींच्या प्रयत्नांकडेही प्रेक्षकांनी पाठ फिरवल्याने प्रयोगाला मर्यादा पडल्या आहेत. व्यावसायिक प्रयत्नांची नाट्य वर्तुळात चर्चा असूनही रंगकर्मी-रसिकांची अनास्था, नवोदितांची निराशा करणारी ठरली आहे. टीव्ही चॅनल्सची वाढती संख्या, मोबाइल, इंटरनेट यांनी मनोरंजनाचे अनेक पर्याय खुले केले. त्यामुळे व्यावसायिक नाटकाला प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळणे कठीण झाले आहे. समाजाला उन्नत आणि उदात्त दिशा देण्याचे काम लेखक- कलावंत करतात. त्यांच्या पाठिशी राज्यकर्त्यांनी उभे राहणे अपेक्षित असते. सद्यस्थितीत अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच होऊन लेखक-कलावंत एकाकी पडले आहेत. कलावंत, विचारवंत, लेखक यांना बोलण्याची मुभा राहिली नाही. शासकीय व्यवस्थेने लेखक व कलावंतांचा सन्मान राखण्याची गरज आहे. समाजाला दिशा देणाऱ्या लेखकांचे महत्त्व गौण ठरवले गेले आहे. ही दृष्टी बदलणे क्रमप्राप्त आहे. वयोवृद्ध व गरजू कलाकार-कलावंतांची काळजी घेणे प्रत्येक सरकारचे कर्तव्य आहे. शिवाय केंद्र सरकारने राष्ट्रीय पातळीवर भाषेसाठी महत्त्वाचे काम करण्याबाबत नियोजन करावे. नाट्य, साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत शासकीय संस्थांमध्ये राजकीय हस्तक्षेप वाढला. सोयीच्या विचारधारेची, पण सामान्य क्षमतेच्या व्यक्ती पदांवर नेमल्या गेल्या. हा प्रकार सांस्कृतिक पर्यावरणासाठी घातक आहे. राष्ट्रीय नाट्यविद्यालय, एफटीआयआय, नाट्य-साहित्य संमेलन, सेन्सॉर बोर्ड अशा अनेक ठिकाणी त्याची प्रचिती येते. याला अटकाव करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावे, अशीच रास्त अपेक्षा!

!! विश्व रंगभूमी दिवस निमित्त सर्व रसिकांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजी-**
**अलककार.** संपर्क क्र. ९४२३७१४८८३

# रेवडी संस्कृती : निवडणूक जिंकण्याचा सोपा मार्ग

आधुनिक केसरी



मच्छिंद्र ऐनापुरे, जत
जि. सांगली

**जनतेला मोफत सुविधा देण्याच्या प्रक्रियेत केंद्र आणि राज्य सरकार कर्जाच्या ओझ्याखाली दबले जात आहेत. 2022-23 या आर्थिक वर्षात केंद्र सरकारने 4.36 लाख कोटी रुपयांचे अनुदान (सबसिडी) वितरित केले आहे. आगामी आर्थिक वर्ष 2023-24 मध्ये, केंद्राने निश्चितपणे अनुदान कमी केले आहे, परंतु कोरोना कालावधीपासून जारी केलेल्या मोफत रेशन योजनेला डिसेंबर 2023 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. राष्ट्रीय अन्नधान्य योजनेंतर्गत देशभरात मोफत अन्नधान्य घेणाऱ्या लाभार्थ्यांची संख्या सुमारे नव्वद कोटी आहे. केंद्रीय मंत्र्यांनी संसदेत मान्य केले आहे की विविध राज्यांमध्ये 55.37 लाख अपात्र लाभार्थी बनावट शिधापत्रिकेद्वारे योजनेचा लाभ घेत आहेत. 2022-23 या आर्थिक वर्षात केंद्राने मनरेगावर नव्वद हजार कोटी रुपये खर्च केले. त्याबदल्यात देशात पंचवीस टक्केदेखील विकासकामे झालेली दिसत नाहीत.**

गेल्या वर्षभरात महसुलात एक टक्क्यांनी वाढ झाल्याचा रिझर्व्ह बँकेचा अंदाज आहे, मात्र केंद्रीय अर्थसंकल्पात अनुदानाचा वाटा सात टक्क्यांवर पोहोचला आहे. म्हणजे सरकार जीएसटी आणि इतर करांच्या माध्यमातून पैसा वसूल करत आहे, त्याचबरोबर कितीतरी पट रक्कम फुकटात वितरित करत आहे. मुक्त रेवडी ही घोषणा म्हणजे सत्ताधारी राजकीय पक्षांसाठी निवडणुका जिंकण्याचा एक सोपा मार्ग मानला जातो. त्यामुळे देशातील पायाभूत सुविधा मात्र कोलमडल्या आहेत. आता देशातील सामान्य माणसाची मानसिकता गरीब राहून जगण्याची झाली आहे. त्याला त्याच्या पातळीपेक्षा वर जायचेही नाही!

आता त्याला मिळणाऱ्या मोफत आणि अनुदानावर आधारित योजना गमावण्याच्या भीती सतावत आहे. देशातील दहा राज्यांनी आपली कर्ज घेण्याची शेवटची सीमारेषादेखील ओलांडली आहे.

आरबीआयच्या अहवालात असे म्हटले आहे की, जर या राज्यांनी मोफत वितरण योजना बंद केल्या नाहीत, तर राज्यांमधील विकासाची स्थिती श्रीलंका आणि पाकिस्तानसारखी होईल. या अहवालानुसार, देशातील 30 राज्यांनी एप्रिल 2022 ते डिसेंबर 2022 या नऊ महिन्यांच्या कालावधीत 2.28 लाख कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते, तर जानेवारी 2023 ते मार्च 2023 या पुढील तीन महिन्यांत 3.34 लाख कोटी रुपयांचे कर्ज घेण्याच्या रांगेत समावेश होता. पंजाब, केरळ, बिहार, राजस्थान, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, हरियाणा, झारखंड, मध्य प्रदेश या आरबीआयच्या अहवालात घोषित केलेल्या दहा राज्यांची स्थिती अशी आहे की त्यांच्या एकूण उत्पन्नापैकी नव्वद टक्के पगार, निवृत्ती वेतन, कर्मचाऱ्यांचे व्याज आणि अनुदान यावर खर्च होत आहे. सर्व खर्च केल्यानंतर या राज्यांमध्ये विकासासाठी दहा टक्केही निधी शिल्लक राहत नाही. ही राज्ये घेतलेले कर्ज परत करू शकतील का, हाही प्रश्न आहे. परिस्थिती इतकी वाईट असतानाही निवडणूक जिंकण्यासाठीच्या प्रयत्नांमध्ये मुक्त घोषणा करण्यात कोणतेही सरकार मागे नाही.

रिझर्व्ह बँकेच्या गणनेनुसार, सरकारच्या आर्थिक शिस्तीत कर्जाचा बोजा त्या राज्याच्या जीडीपीच्या 30 टक्क्यांपेक्षा जास्त नसावा, परंतु पंजाब 53.3 टक्के, राजस्थान 40 टक्के, बिहार 38, उत्तर प्रदेश 34, मध्य प्रदेश 32 टक्के ओझे घेऊन बसले आहेत. वित्तीय संस्था या राज्यांना अधिक कर्ज देण्यास टाळाटाळ करत आहेत, परंतु ही गरजू राज्ये स्थावर मालमत्ता आणि रोखे तारण ठेवून कर्ज मिळविण्याच्या रांगेत आहेत. ही राज्ये नियमित कर भरणाऱ्या नागरिकांवर अधिक कर आणि विकास अधिभार लादून उत्पन्नाची साधने विकसित करत आहेत. त्यांच्या आरोग्य आणि शिक्षणासारख्या अत्यावश्यक सुविधादेखील मागे पडल्या आहेत. अत्यावश्यक सेवांमध्ये नियमित भरती करण्याऐवजी कंत्राटी व अतिथी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जात आहे.

अत्यावश्यक सेवा वगळता, ज्यांचा परतावा शून्य आहे, त्या योजनांवर राज्याचा जीडीपी हिस्सा एक टक्क्यापेक्षा जास्त नसावा, असे अर्थतज्ज्ञांचे मत आहे. परंतु मोफत आणि अनुदानावर आधारित योजनांमध्ये पंजाब राज्याचा 2.7 टक्के, आंध्र प्रदेश 2.1, मध्य प्रदेश 1.5 आणि राजस्थान 2.0 टक्के हिस्सा आहे. पंजाबची लोकसंख्या सुमारे तीन कोटी असून त्यावरील कर्ज तीन लाख कोटी रुपयांहून अधिक आहे. अशाप्रकारे राज्यातील प्रत्येक नागरिकावर एक लाखाचे कर्ज आहे. राज्यातील 25 टक्के तरुण बेरोजगार आहेत. राज्य सरकार रोजगाराच्या संधी निर्माण करण्यास सक्षम नाही. साधारणपणे, ही त्या सर्व राज्यांची स्थिती आहे, ज्यांना आरबीआयने संवेदनशील राज्यांच्या श्रेणीत ठेवले आहे.

जागतिक बँकेचा अंदाज आहे की स्थानिक विकास, ड्रेनेज आणि पाणीपुरवठ्यासाठी पुढील पंधरा वर्षांत देशातील नगरपालिका संस्थांना 840 अब्ज डॉलरची गरज आहे. महापालिका संस्था आतापर्यंत केंद्र आणि राज्य सरकारच्या आर्थिक मदतीवर अवलंबून राहत आल्या आहेत. राजकीय गैरव्यवस्थापनामुळे संस्था उत्पन्नाचे स्रोत विकसित करण्यात अपयशी ठरल्या आहेत. कर्जबाजारी राज्यांच्या मोफत घोषणांचा सर्वाधिक परिणाम शहरी विकासावर झाला आहे. संस्थांमध्ये तांत्रिक कर्मचारी भरती करण्याऐवजी कंत्राटी पद्धतीने काम केले जात आहे. यामुळे नागरी सेवांमध्ये गुणवत्ता आणि जबाबदारीचा अभाव दिसून येत आहे. नागरी सेवा चांगल्या प्रकारे पुनर्संचयित करण्याऐवजी, सरकारे केवळ मतांच्या व्यवस्थापनाद्वारे सत्ता मिळवण्यात व्यस्त आहेत. किसान सन्मान निधी अंतर्गत केंद्र सरकार दरवर्षी देशातील शेतकऱ्यांना साठ हजार कोटी रुपयांपर्यंतची रक्कम वाटप करते. अनेक राज्य सरकारे या व्यतिरिक्त आणखी अनुदान वाटप करत आहेत.

परंतु देशातील कृषी क्षेत्राची स्थिती इतकी बिकट आहे की, निसर्गाने थोडा जरी हात आकडता घेतला तरी , दुसऱ्या दिवसाची व्यवस्था करायला शेतकऱ्यांकडे उपाययोजना नाही. योजनांच्या माध्यमातून आपण शेतकऱ्यांना कितपत सक्षम करू शकलो, हा प्रश्नच आहे. आज देशातील प्रत्येक शेतकरी कुटुंबावर सरासरी 74121 रुपयांचे कर्ज आहे. तर प्रति कुटुंब मासिक उत्पन्न फक्त 10,218 रुपये आहे. शिक्षण आणि आरोग्यावरील अनुदानाऐवजी सर्व मोफत योजना देशाला खिळखिळी करण्यासाठीच आहेत, असा इशारा अर्थतज्ज्ञ देतात. मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थान या तीन मोठ्या हिंदी राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. आरबीआयच्या यादीत मध्य प्रदेश आणि राजस्थानने कर्जाची मर्यादा ओलांडली असून संवेदनशील क्षेत्र गाठले आहे. या राज्यांना त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या मासिक पगार आणि पेन्शनसाठीही कर्ज घ्यावे लागते. मध्यप्रदेश सरकार असा दावा करते की ते गरिबांना जन्मापूर्वीपासून अंत्यसंस्कारापर्यंत आर्थिक मदत करते.

आता राज्यातील 2.50 लाखांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या प्रत्येक महिलेला 1000 रुपये मासिक पेन्शन देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या 'लाडली बहना' योजनेवर सरकार पाच वर्षांत सुमारे 61 हजार कोटी रुपये खर्च करणार आहे. केंद्र सरकारने अमृत 2.0 योजनेसाठी निधी देण्यास नकार दिल्याने राजधानी भोपाळसह संपूर्ण राज्यातील मलनिस्सारण व्यवस्था सुधारणा करण्यात अडथळा निर्माण झाला आहे. सरकारला आपले रोखे आणि स्थावर मालमत्ता गहाण ठेवून बाजारातून कर्ज घेण्यास भाग पडले आहे. छत्तीसगडवरील कर्ज हे एकूण घरगुती सकल उत्पादनाच्या 28 टक्के आहे. मात्र कर्ज काढून ते मोफत वाटण्यात ते राज्य एक पाऊलही मागे नाही. आर्थिक तज्ज्ञांचे मत आहे की 2023-24 या आर्थिक वर्षात राज्यांमधील कर संकलन मागील वर्षाच्या तुलनेत दोन टक्के कमी असेल. येत्या काही वर्षांत, आता राज्यांना केंद्राच्या कुबड्या सोडून नवे उत्पन्नाचे स्रोत विकसित करावे लागतील. मात्र मोफत वाटप करून सत्ता मिळवण्याचे सूत्र राज्यांना दिवाळखोर आणि नागरिकांना परावलंबी बनवत आहे.

## चिऊ



ये ना गं ये ना गं
अंगणात माझ्या चिऊ,
चाहुलीने नको अशी
भुर्रकन उडुनिया जाऊ.

देईन गं मी तुला
पाणी अन् खाऊ,
इवली इवली चोच
चिव चिव चिऊ

एक घास देते तुला
बाळं लागेल ग जेऊ
तुला पाहताच गं
गाणे लागेल गाऊ.

चिऊ काऊ चिऊ काऊ
आनंदाने मग चाऊ न माऊ
एक घास चिऊचा एक घास
काऊचा खाऊ लागले खाऊ.

पानगळीच्या जंगलात ही
पालवी लागेल फुलू
चारा घरटे होईल, फिर तू
माघारी
दूर दूर तू नको अशी जाऊ.
दूर दूर तू नको अशी जाऊ.

- सौ. वैशाली महाडिक.
मो .9767437923



## मन मोकळे मोकळे

मन मोकळे मोकळे
जसे वारू उधळले
पाहताना तुला सखे
मनी या साठवले

मन मोकळे मोकळे
जसे वाहणारे वारे
आठवताना तुला
समोर पाहणारे

मन मोकळे मोकळे
जसे चांदणे फुलावे
बोलताना तुजपाशी
तुझे शब्दच व्हावे

मन मोकळे मोकळे



तुलाच आठवते
डोळे मिटल्यावरती
तुझ्याकडेच धावते

मन मोकळे मोकळे
जसे पिलाचे रडणे
तुझ्या नजरेच्या तीराने
मन घायाळ हे होणे

मन मोकळे मोकळे
जसे सुगंधी फवारे
सहवासात तुझ्या
मन झाले हे बावरे

मन मोकळे मोकळे
जसे निसर्गाचे नाते
तुझ्यावर सखे
तसे प्रेम हे माझे...
सखे प्रेम हे माझे...

- स्वानंद नंदकुमार मराठे


## गुढीपाडव्याचा सण हा....

हिंदू नववर्षाची सुरुवात
निसर्गात हर्षवलास दाटतो
गुढीपाडव्याचा सण हा
नव आनंद घेऊन येतो

घराघरांवर उभारूया गुढी
आपसातली सोडवू अढी
संदेश असा हा एक मानावा
चैत्र प्रतिपदा – गुढीपाडवा

वनवास बारा वर्षाचा
संपूनी प्रभुराम आले
स्वागताला त्या समायापासूनी
गुढी उभारणी स्वागत झाले

नव्या वर्षी नवे स्वप्न पाहू
देवाची लेकरे माणुसकीने राहू
मानवात देव शोधू
बंधूभावाने व एकजुटीने आपण सारे
राहू



सर्वांना नूतन वर्ष आनंदाचे
जावो हीच सदीच्छा
नव वर्ष आणि गुढीपाडव्याच्या
सर्वांना खूप खूप शुभेच्छा

– संदीप वाकडे पाटील
रा.खेडा ता. कन्नड, 9766992776

## चैत्राच्या गं महिन्यात

चैत्राच्या गं महिन्यात
फुटे झाडांना नवती
पिंगा घालितो भ्रमरं
फुलं कळ्यांच्या भोवती

चैत्राच्या गं महिन्यात
सण गुढीपाडव्याचा
करू आनंदे साजरा
संसारात गोडव्याचा

चैत्राच्या गं महिन्यात
निंबमोहराचा मानं
चिंच,गुळ ,डाळी संगे
प्रसाद हा झाला छान

चैत्राच्या गं महिन्यात
फळं राजां मोहरला
इवली- इवली फळं
पानों -पानी बहरला

चैत्राच्या गं महिन्यात



सुगी सराई ही आली
बळीराजाच्या घरात
रास धान्यांची हो झाली

चैत्राच्या गं महीन्यात
धुम लग्न सराईची
दोन जीव करतील
सुरुवात संसाराची

चैत्राच्या गं महिन्यात
आणा साखरेची गाठी
आपुलकीने होऊ द्या ना
पुन्हा जिव्हाळ्याच्या भेटी
पुन्हा जिव्हाळ्याच्या भेटी...

सौ.शारदा श्रीकृष्ण
वानखेडे, परभणी.

## ढग गाती नादब्रम्ह...



हिरव्या शालूत नटेल
धरतीचा अणूरेणू
गळा चढविता गोठ
सप्तरंगी इंद्रधनू....!!

आसमंती जलधारा
उठे जलधी तरंग
इथे शिवारी शेतात
राबे माझा पांडुरंग..!!

वखर चाले नामधातूचा

माती गातीया अभंग
नांगऱ्या झुलतो खुशीत
पहाटे भूपाळीचा संग...!!

असं नशीब उजळावं
दारी सोनियाची रास
दशदाने भोगताना
ओठी मोतीयाचा घास..!!

वारा फुंकतोय पावा
स्वर निघे सा-रे-ग-म
झाडे वाजविती टाळ
ढग गाती नादब्रम्ह...!!

रज्जाक शेख, श्रीरामपूर अहमदनगर
9665778558

## अनुप्रास वसंताचा

अग्नी शमन करतो
ऋतू वसंत वेल्हाळ
गर्द सुखाच्या पखाली
नभी शोभतो बल्लाळ ..!

साज चढे पालवीला
क्षण आले बहरून
अंतरंगातील श्वास
घेतो हृदयी भरून ..!


प्रीत अशी खुलू येता
स्वप्न येई पूर्णत्वास
लुप्त पावल्या लोचनी
जगण्याला मिळे आस ..!

सूत्र सुखाचे कळता
प्रेमभाव ओळखावा
नित्य जीवन पुष्पाला
मुक्त सुवास असावा ..!

मनी मोहर फुलवी
अनुप्रास वसंताचा
दाह सोसवेना आता
रौद्र खेळ वैशाखाचा ..!

मना मनातली गुढी
प्रसंगात उभारावी
हर्ष होईल तेंव्हाच
सृष्टी साभार फुलावी ..!

©प्रदीप बडदे, नवी मुंबई.
मो. ९५९४०२७९९५



## पळस फुलला



पळस फुलला, पळस
फुलला
लाल, केशरी गर्द रंगानी
दुतर्फा शोभून दिसतात
त्या फुललेल्या पळसांनी

हिरवे, हिरवे पाने त्याची
तरीही ताजेतवाने दिसतात
निसर्गाची किमया न्यारी
त्या फुलांना सजवतात

पळस फुलला, पळस फुलला
कडक उन्हाचे चटके सोसून
लक्ष वेधून घेते वाटसरुंचे
किती मोठे आहे हो त्याचे मन

शिकून घ्यावे त्याच्याकडून
प्रत्येक मानव प्राण्यांनी
जगतो कसा तो संघर्ष करून
नसते तो कधीही अभिमानी

सौ.संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली
७८२१८१६४८५

आयुष्याची तगमग नशीबाची पडझड
काळ कधी नेईल का हिरावून

कण्हत कुथत,धावत पळत
हा जीवनप्रवास जातोया सरत

ओंजळभर सुखासाठी
सारं आयुष्य निघतया पिळून

जो दिवस येतोया
घेतोया सारी मेहनत गिळंकृत करून

कणखर शरीर झिंझत जातय
घामाच्या सोबतीला रक्त ही झिरपतय

तळागळातून प्राण खेचून येतोय
सरणावर जाऊन विसावा घ्यावा म्हणतोय

-लक्ष्मण वाल्डे-कन्नड




## एवढ्याचसाठी का?



एवढ्याचसाठी का मी
बसलो इथे कधीचा
तिरपा कटाक्ष टाकून गेलीस तू निघोनी

माझ्या मनातला हा भाव कुणा सांगू
ही सांजवेळ झाली, येथे नसेच कोणी


काही कसे तुला ते थोडेही वाटले ना
उठली तशीच तेव्हा, नाराज मज करोनी

अंधार आज इथला, हा सहन होत नाही
पक्षी पसार झाले मम खिन्नता बघोनी

येशील का पुन्हा तू सांग एकदाच मजला
वाटेस पाहुनी त्या गेलो आता थकोनी

उद्धव भयवाळ
छत्रपती संभाजीनगर

## माहे रमजान!



बरकतीचा महिना हा
रमजान येणार आहे,
इबादत करण्यासाठी
आतुरता वाढली आहे.

पाचवेळची नमाज ही
रोज पढण्यात येईल,
पहाटे – पहाटे सेहरी
सुर्यास्त ईफ्तार होईल.

पवित्र रोझे धरण्यास
सारे आनंदित दिसेल,
साऱ्या नेक रोझेदारांच्या
तोंडावर नुर येईल.

दिवसभरात कुराण
पढण्यात वेळ जाईल,
रात्रीला ईशा- तराबीची
पवित्र नमाज होईल.

छोटे मुले जीवनातला
पहिला रोझा धरतील,
मशीदीत दुवा पढुन
पवित्र रोझा सोडतील.

रमजान महिन्यामध्ये
भरपूर पुण्य मिळते,
दुवा ही कबुल होऊन
मनी समाधान लाभते.

– अय्युब पठाण लोहगांवकर,
मो. ९७६४३५०३७४.

# माळीवाडा येथे महादेव भगवान कानिफनाथ यात्रा



आधुनिक केसरी न्यूज

**प्रकाश लकडे**

माळीवाडा येथे गुडीपाडव्याचा तिसऱ्या दिवशी महादेव कानिफनाथ महाराज यात्राची 201 वर्षापूर्वीची परपरा असलेल्या महादेव कानिफनाथ महाराज यात्रा मोठ्या उस्ताहास सुरुत झाली.

गुडीपाडव्याच्या वर्षे प्रतिपदेस सकाळी महादेवाचा मंदिरात पुजा करुन मंदिरा समोर महाल बसाविण्यात येतो.30 फुट उंच बाबूस (काठी)सजवून महादेव समोर महादेवाची पितळी प्रतिमा ठेवण्यात येते.भक्त मोठ्या श्रध्देने पुजा करतात.व संध्याकाळी अंबिलच्या घागरी आणून त्याची पूजा केली जाते. त्यानंतर घागरीतुन आनलेले अंबिल भक्ताना प्रसाद म्हणून वाटण्यात येते.

महादेवाचा यात्रा गुडीपाडव्याचा तिसऱ्या दिवशी शुक्रवारी सकाळी गावातील मानाचे गावकरी महादेवाच्या काठीला नऊ घडीचे बाशीग व नाग फनीचे बाशीग बनवतात. महादेव कानिफनाथ महाराज यात्रा रात्री 12 वाजेपासुन सुरू होऊन ढफ, वाजत गाजत गावातुन मिरवून शंक नाद हर हर महादेव गर्जनाने सर्व परिसर भक्तीम होतो.फट्याक्याची आतिष बाजी,भक्त मंडळी काठीवर रेवड्या फेकून नवस पार पाडतात महादेव कानिफनाथ काठी गावातील वेशी बाहेर येऊन महाल उभे करतात.

काटेरी फास (फुले) आगोदरच वेशी बाहेर सात उनगे लाईन मध्ये आनुन ठेवतात. व काट्याची माण्यता पुजा केली जाते.नंतर काटेरी फास उभे केले जाते.

गावातील वेशीत हे (काठ्या) महाल उभे करातात,मुख्य महालापासुन सुमारे 100 फुटाच्या अंतारावर फास (काट्या) उभा ईचक्याचा (काठ्या)आधारावर भक्त तोलुन धरतात,काटेरी फासावरा उडी घेणारे भक्त गण प्रथम वाजत गाजत काटेरी (फुले) फासाचे दर्शन घेतात,महालाच्या मागे जाऊन उभे राहतात.

भक्तगण काटेरी फुलावर हरबला हरबला हरहर महादेव घोषणा देत पळत जाऊन उड्या मारतात.या वर्षी 13 भक्तानी काटेरी (फुले)उड्या मारल्या खालील भक्त कोडिराम पल्हाळ,विनायक पल्हाळ,सोमनाथ मुळे,गोरख हेकडे,दादाराव पल्हाळ,राम विटोरे, सोमिनाथ पल्हाळ,शामराव पल्हाळ,शाईनाथ रमेश पल्हाळ,रविंद्र वावरे,दिलीप काळे,आणणा नामदेव पल्हाळ, संजय वावरे, यात्रा सकाळी 4:30 वाजता काटेरी फास जाळुन यात्रेची समाप्ती झाली. नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.महिला ची संख्या जास्त होती.




## डी. बी. जगतपुरीया यांना पुरस्कार



आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** थोर साहित्यीक, समीक्षक, सुप्रसिद्ध कवी, लेखक, पत्रकार डी. बी. जगत्पुरीया सर यांना शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगर च्या वतीने तापी पुर्णा राज्य स्तरीय जीवनगौरव पुरस्कार घोषित करण्यात आला. मंगळवेढा येथे होत असलेल्या २र्या राज्य स्तरीय साहीत्य संम्मेलनात त्यांना हा पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. पुरस्कार स्वीकारण्यासाठी उपस्थित रहावे म्हणून आग्रहाचे निमंत्रण देतांना संस्थेचे राज्य सचिव डॉ. प्रा. सुभाष बागल सर तसेच छ. संभाजी नगर जिल्हा संपर्क प्रमुख ॲड सर्जेराव साळवे.



## राहुल गांधींच्या कारवाईवर महाविकास आघाडीच्या आमदारांचे तोंडावर काळ्या पट्ट्या बांधून मूक

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर झालेल्या कारवाई संदर्भात आज महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर ठाण मांडत तोंडावर काळयापट्टया बांधून मूक आंदोलन केले. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या कामकाजाचा आजचा शेवटचा दिवस असून अधिवेशनाचे कामकाज सुरू होण्याअगोदर विरोधी पक्षनेते अजित पवार आणि अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली विधानभवनाच्या पायऱ्यांवर बसून हातात 'लोकशाहीची हत्या' असे फलक घेऊन हे मूक आंदोलन करण्यात आले.

## राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ पैठणमधे काँग्रेसकडून निदर्शने

आधुनिक केसरी न्यूज

**दादा घोडके**

**पैठणः** सुरत न्यायालयाने काँग्रेस नेते राहुल गांधी यांना 'मोदी' आडनावबद्दल केलेल्या टीकेवरुन दोन वर्षांची शिक्षा सुनावली. यानंतर काही तासांतच त्यांची खासदारकीही रद्द करण्यात आली. यावरुन काँग्रेसकडून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. याच समर्थनात माजी मंत्री अनिल पटेल यांच्या नेतृत्वाखाली बस स्थानक चौकात तालुका काँग्रेसच्या वतीने विरोधात निदर्शने करण्यात आली.




तसेच केंद्रशासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

यावेळी ओबीसी सेलचे मराठवाडा अध्यक्ष कांचनकुमार चाटे, शहराध्यक्ष निमेश पटेल,माजी सभापती मोहमद हनीफ, मुश्ताक पठाण चेरमन अशोक नाना नरके,रावसाहेब नाडे,माजी नगरसेवक फाजल टेकडी, रफिक कादरी अजित पगारे,नंदकिशोर नजन, ॲड.वैभव चव्हाण,अनिल मगरे,संभाजी काटे,तुकाराम लिंबोरे,महेश पवार,अजय करकोटक,युनूस पठाण,योगेश जोशी,ज्ञानेश सपकाळ,गोविंद पहिलवान,निखिल काळे, ॲड.रमेश गव्हाणे,अबेद पठाण,योगेश शिपणकर, इर्शाद खान,श्रीधर उघडे,मुख्तार पठाण, बबरू कदम,अरुण राठोड,अभिजित धोकटे, गब्बर तांबोळी,दिनेश माळवे,दादू पटेल,भागवत भूमरे, बबलू शेख,गणेश बुरकुळे,शिवाजी संदलसे,भीमराव नवगिरे आदी उपस्थित होते.

## फुलंब्री शहर व तालुका काँग्रेस कमिटीची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

फुलंब्री शहर व तालुका काँग्रेस कमिटी ची बैठक जिल्हा काँग्रेस कमिटीचे प्रभारी ॲड मुजाहेद खान व जिल्हाध्यक्ष माजी आमदार डॉ कल्याणराव काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आली होती.

यावेळी हाथ से हाथ जोडो अभियान कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला तसेच दि. २ एप्रिल रोजी मराठवाडा सांस्कृतिक मंडळाच्या मैदानावर #महाविकास आघाडीच्या नियोजित सभेला गंगापूर तालुक्यातुन जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहण्यासाठी नियोजन करण्यात आले.

या बैठकीस जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष श्री किरण पाटील डोणगावकर निमेश पटेल तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री संदीप दादा बोरसे सुदाम भाऊ मते सुभाषराव गायकवाड संतोष राव मेटे पुंडलिकराव जंगले वरून भैया पात्रीकर सदाशिव विटेकर राधाकिसन गाढे रामेश्वर गाडेकर अंबादास गायके बाबुराव टकले कचरू मैद प्रभाकर वाघ विठ्ठलराव लुटे विठ्ठलराव कोलते मुद्दसर पटेल कारभारी वाटोळे दिनकर कापडे



लहू अण्णा मानकापे सुनीता मारकताई शेख रज्जाक पंढरीनाथ जाधव हाफिज मन्सुरी गंगाधर सोनवणे अंकुश वाहूटूळे आदि पदाधिकारी उपस्थित होते.

# क्षयरोगाचे समूळ उच्चाटन करण्याचा निर्धार करूया : डॉ. श्रीकांत देशमुख

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आज वैद्यकीय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशांन्वये तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, मा. ना. श्री. गिरीश महाजनजी (वैद्यकीय शिक्षण मंत्री) यांच्या निर्देशानुसार आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त जागतिक क्षयरोग दिनानिमित्त भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

छत्रपती संभाजीनगर शहागंज येथील महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ रॅलीचे उद्‌घाटन डॉ. शंकर डांगे, डॉ. मनीषा भोंडवे, डॉ. अविनाश लांब, डॉ. वीरेंद्र वडगावकर, डॉ. सुनील सावजी, डॉ. गणेश कल्याणकर, डॉ. श्रीकांत देशमुख, डॉ. लता काळे, डॉ. अमित वांगीकर, डॉ. राजन महिंद्रा, डॉ. संदीप कांबळे, डॉ. जयश्री देशमुख या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

क्षयरोग हा "मायक्रोबॅक्टेरियम ट्युबरक्युलोसीस" नामक जंतूमुळे होणारा एक संसर्गजन्य असा आजार आहे. या रोगाला टीबी असे देखील संबोधतात. क्षयरोग हा संसर्गजन्य आजार असल्याने बाधित व्यक्तीकडून इतरांना त्याची बाधा होण्याची शक्यता असते. त्यामुळे



क्षयरोगाची लक्षणे काय आहेत, उपचार पद्धती कशी असते, तो कसा बरा होऊ शकतो अशा बाबी सर्वांनी जाणून घेणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे क्षयरोगाबद्दल सर्व ठिकाणी जनजागृती व्हावी अशा उद्देशाने जागतिक क्षयरोग दिन साजरा केला जातो. त्यामुळे जागतिक क्षयरोग दिनाचे महत्त्व सर्वांना स्पष्ट होणे गरजेचे आहे, असे छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख यांनी आवाहन केले.

सकाळी 06.30 वाजता रॅलीची सुरुवात शहागंज येथील महात्मा गांधी पुतळ्यापासून निघून ते जुना बाजार पोस्ट ऑफिसमार्गे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या विभागीय केंद्र येथे या रॅलीचा समारोप करण्यात आला. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ २५ वा रौप्य महोत्सव साजरा करत आहे. दि. १ जानेवारी २०२३ ते दि. १० जुन २०२३ या कालावधीत विद्यापीठाद्वारे विविध शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व इतर उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. येणाऱ्या दि. ७ एप्रिल रोजी जागतिक आरोग्य दिनानिमित्त (कॅटरॅक्ट /थायरॉईड अवेअरनेस) या आजाराबाबत जनजागृतीसाठी रॅलीचे आयोजन विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयाद्वारे करण्यात येत आहे. तसेच म. आ. वि. वि. सलग्नित CSMSS आयुर्वेद महाविद्यालय, CSMSS दंत महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण आयुर्वेद महाविद्यालय, धनेश्वरी आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद्र, साई आयुर्वेद मेडिकल कॉलेज आणि रिसर्च सेंटर, डी. के. एम. एम. होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय, फोस्टर डेव्हलपमेंट होमियोपॅथी महाविद्यालय, सायली होमियोपॅथी वैद्यकीय महाविद्यालय, श्री भगवान होमियोपॅथी मेडिकल कॉलेज, स्वातंत्र्यसेनानी स्व. उत्तमराव पाटील परिचर्या महाविद्यालय, एम. जी. एम. परिचर्या महाविद्यालय, कमलनयन बजाज परिचर्या महाविद्यालय, एम. आय. टी. परिचर्या महाविद्यालय, डॉ. हेडगेवार परिचर्या महाविद्यालय, शासकीय दंत महाविद्यालय, शासकिय क्षयरोग विभाग, आनंद आयुर्वेद महाविद्यालयातील प्राध्यापक, अधिकारी, डॉक्टर, विद्यार्थी मोठ्या संख्येने रॅलीमध्ये सहभागी झाले होते. यावेळी प्रास्ताविक CSMSS आयुर्वेद महाविद्यालय प्राचार्य तथा विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. श्रीकांत देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. अमित वांगीकर, सूत्रसंचालन डॉ. संजय सरोदे यांनी केले.

# चंद्राखाली तारा तर्क-वितर्काला उधाण

आधुनिक केसरी न्यूज

बंडू खडांगळे

**लखमापुर :** निसर्ग कोणत्या वेळेस काय किमया घडवून आणेल याबाबत विचार करणे म्हणजे एकप्रकारे विज्ञानांला आव्हान देणारेच ठरले. दिनांक २४ मार्च रोजी अचानक संध्याकाळच्या ठिक रात्री ७ वाजुन १० मिनिटांनी अनेकांच्या नजरा आकाशांकडे लागल्या. त्या म्हणजे चंद्र देवतेच्या खाली शुक्र तारा आला. हे चित्र पाहायला मिळाले. त्यामुळे अनेकांनी हे दृश्य टिपण्यासाठी आपले मोबाईल कँमेरे आकाशांकडे धरले. व वेगवेगळ्या मोड छायाचित्रे काढण्यांस सुरुवात केली. त्यामुळे ग्रामीण भागात यामुळे विविध चर्चेला एकप्रकारे उधाण आले आहे. परंतु यामध्ये कोणी अंधश्रद्धा आणु नये.असे आवाहन अनेकांकडून करण्यात आले आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की तो तारा नेमका कोणता ? तर तारा आहे. शुक्र ग्रह .त्याची तेजस्विता ४ ते ६ अंशाच्या वर असते. तो अंत्यर्वर्ती ग्रह असल्याने तो सुर्यापासुन कधीच दूर दिसत नाही. तो जास्तीत जास्त४७.८ अंशापर्यत दुर जाऊ शकतो. त्यांची तेजस्विता ही सुर्योदयाच्या वेळी किंवा सुर्यास्ताच्या वेळी सर्वात जास्त असते. त्यामुळे त्याला पहाटेचा तारा किंवा सायंतारा असेही म्हणतात. सुर्यमालेतील शुक्र हा सुर्यापासुन बुधानंतर आणि पृथ्वी अगोदर येणारा क्रमाने दुसरा ग्रह आहे. जरी सर्व ग्रहांच्या भम्रणकक्षा लंबगोलाकार असल्यातरी शुक्राची भ्रमणकक्षा जवळजवळ वर्तुळाकार आहे. त्यांचा व्यास १२.१०४ कि.मी.एवढा आहे. यामुळे हा ग्रह आपल्याला आकाशात फक्त सकाळी किंवा संध्याकाळीच दिसतो. त्यामुळे या ग्रहांची तेजस्विता इतर ग्रहांपेक्षा तेजस्वी दिसते.

शुक्र पृथ्वीहुन जास्त सुर्याजवळ असल्यामुळे आकाशात नेहमी सुर्याच्या दिशेकडे दिसतो. त्यामुळेच तो पहाटे किंवा संध्याकाळी क्षितिजावर दिसु शकतो. जर तो जास्त प्रखर बनला तर दिवसाही दिसु शकतो. शुक्र हा सुर्य व चंद्रापाठोपाठ पृथ्वीवरून तेजस्वी दिसणा-या चांदण्यात तिसऱ्या क्रमांकावर आहे. या शुक्र ग्रहांचा अस्तकाल साधारणपणे सन २००९ पासुन पाहायला मिळतो.





### ज्योतिषशास्त्रातील शुक्र

**भारतीय ज्योतिषांनुसार शुक्र हा लाभदायक ग्रह आहे. वृषभ आणि तूळ राशींचा स्वामी आहे. ज्योतिषान्वये शुक्र हा रोमान्स ,कामुकता,कलात्मक प्रतिभा, शारीरिक व भौतिक जीवनाची गुणवत्ता ,धन,आनंद, प्रजोत्पती,स्त्रेण गुण,तसेच ललित कला, संगीत, नृत्य,चित्रकला, आणि मुर्तीकला,यांचे प्रतीक आहे. त्यामुळे ज्यांच्या राशींचा स्वामी शुक्र आहे. त्यांनी या कालखंडात शुक्राची साधना करावी.**

**-संदीप जोशी, प्रसिध्द ज्योतिष अभ्यासक करंजवण ता.दिंडोरी**

### शुक्राच्या अस्तकाळांचा काही काळ आपल्याला पाहायला मिळतो

**सन २००९ साली १३ दिवस.**
**सन २०१० साली ४८ दिवस.**
**सन २०११ साली ४४ दिवस.**
**सन २०१२ साली ०९ दिवस.**
**सन २०१३ साली ५५ दिवस.**
**सन २०१४ साली ५५ दिवस.**
**सन २०१५ साली १४ दिवस.**
**सन २०१६ साली ५१ दिवस.**
**सन २०१७ साली २१ दिवस.**
**सन २०१८ साली ४५ दिवस.**
**सन २०१९ साली ४३ दिवस.**
**सन २०२० साली ०८ दिवस.**
**सन २०२१ साली १४ दिवस.**
**सन २०२२ साली ०६ दिवस.**
**सन २०२३ साली ०९ दिवस.**

**त्यामुळे शुक्रांचा अस्तकाळ असल्याने तो सध्या चंद्राजवळ काही अंशी पश्चिमेला अस्तकाळांचा परिक्रमेत आहे.**

# आशा डांगे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य गौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** येथील लेखिका व कवयित्री आशा डांगे यांना जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळातर्फे देण्यात येणारा डॉ बाबासाहेब आंबेडकर साहित्य गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

आशा डांगे या बळीराम पाटील विद्यालयात शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे "परिघाबाहेर" आणि "प्रिय, हा कण गॉड पार्टिकल आहे.." हे दोन कविता संग्रह प्रसिद्ध आहेत. नुकत्याच त्या नेपाळ येथील भारतीय राजदुतावास आणि अक्षरयात्री विटा मार्फत घेण्यात आलेल्या विश्व साहित्य संमेलनात सहभागी झाल्या होत्या. यापूर्वी त्यांना जे के जाधव साहित्य पुरस्कार, पुरोगामी साहित्य संघाचा स्त्रीवादी लेखन पुरस्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाले आहेत.

नागपूर येथे होणाऱ्या जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाच्या वर्धापन दिनी रविवार दि 26 मार्च रोजी 89 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. अध्यक्षस्थानी जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाचे विद्यमान अध्यक्ष दीपक कुमार खोब्रागडे राहतील तर दिल्ली येथील डॉ के पी वासनिक, मधुकर वानखेडे, बेळगाव येथील मल्लेश चौगुले यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडणार आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य राजाराम राठोड, उपाध्यक्ष ॲड अभय राठोड, सचिव नितीन राठोड, कोषाध्यक्ष डॉ बिपीन राठोड त्याचबरोबर मुख्याध्यापक श्रीमंगले सर व शिक्षकांनी आशा डांगे यांचे अभिनंदन केले आहे.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर



# बीजेपी ने काढली राहुल गांधी यांची प्रेत यात्रा

## भजन मंडळी बोलवून गांधी पुतळ्यापर्यंत निरोप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राहुल गांधी यांच्या वादग्रस्त वक्तव्यावर संपूर्ण महाराष्ट्रात राजकारणाचे वातावरण खराब झाले आहे तसेच त्यांची खासदारकी रद्द झाल्याने काँग्रेस तीव्र आंदोलन हे करत आहे अशावेळी धुळे शहरात चक्क अंगणवाडी सेविका यांना कामावर बोलवून त्यांच्या गळ्यात बीजेपी चे मफलर टाकून त्यांना आंदोलनात सामील करण्यात आले.

व भारतीय जनता पार्टी यांनी राहुल गांधी यांची प्रेत यात्रा काढण्यात आली ज्याप्रकारे मृत व्यक्तीसाठी अंतयात्रा विधी राबवतात त्याच प्रकारे राहुल गांधी यांची प्रेत यात्रा देखील त्याच प्रकारे निघाली होती भजन मंडळी, व इतर साहित्य घेऊन आग्रारोड ने निघाली व गांधी पुतळ्याजवळ पुतळ्याची शांती करण्यात आली.

# नाट्यगृहे सुसज्ज होण्यासाठी प्रयत्न आवश्यक

## अभिनेते प्रशांत दामले यांचे परखड मत

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** महाराष्ट्राला दोनशे वर्षांची नाट्यपरंपरा असून येथील नव्या पिढीत नाटक रुजवण्यासाठी राज्यातील सर्व नाट्यगृहे सुसज्ज होणे गरजेचे आहे आणि अखिल भारतीय नाट्य परिषदेसह सर्वांनीच त्यासाठी नेटाने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे परखड मत प्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले यांनी व्यक्त केले.

बन्सल क्लासेस महाराष्ट्र आणि राजस्थानी मल्टिस्टेट यांच्या वतीने 'एका लग्नाची पुढची गोष्ट' या नाटकाच्या प्रयोगासाठी प्रशांत दामले जालना शहरात आले असता विनोद जैतमहाल यांनी त्यांची विशेष मुलाखत घेतली.

गेल्या तीन दशकांत सुमारे साडेबारा हजारांच्या वर प्रयोग करणारे दामले हे विक्रमी अभिनेते म्हणून ओळखले जातात. आजही त्यांच्या प्रयोगांचा झपाटा विलक्षण आहे. एवढी ऊर्जा कुठून मिळवता ? असे विचारले असता ते म्हणाले की, "महाराष्ट्राच्या सर्वच भागांमधील प्रेक्षक ही ऊर्जा मला देतात. कलाकार आणि प्रेक्षक यांच्या अभिसरणातून ही प्रचंड शक्ती तयार होते आणि तिच्या बळावरच इतक्या मोठ्या संख्येने प्रयोग मला करता आले."

जालना शहरात एक मोठे नाट्यगृह असूनही शहराबाहेर एका लॉनवर नाटकाचा प्रयोग त्यांना करावा लागला. राज्यातील सर्वच नाट्यगृहे सुधारण्यासाठी काय करता येईल ? या प्रश्नावर ते म्हणाले की, "हे खरे तर अखिल भारतीय नाट्य परिषदेचे काम आहे आणि सरकारकडे सतत पाठपुरावा करून हे काम परिषदेने करून घेतले पाहिजे. कलावंत म्हणून आम्हीही वेळोवेळी आवाज उठवतोच आहोत. राज्याच्या यंदाच्या अर्थसंकल्पात नाट्यगृहांसाठी 50 कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवण्यात आला आहे. त्याचा उपयोग नाट्यगृहांसाठीच व्हायला हवा. या निधीला भलतीकडेच वाट फुटू नये याकडेही नाट्य परिषदेने लक्ष द्यायला पाहिजे. नाट्यगृहे सुसज्ज झाली तरच प्रेक्षकांना नाटकाचा नीट आस्वाद घेता येईल. नव्या पिढीलाही नाटकाची गोडी लागेल."



महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण ते विलासराव देशमुख यांच्यापर्यंत महाराष्ट्रातील नेत्यांची संगीत, साहित्य व नाटकाची रसिकता सर्वांनाच माहीत आहे. आजच्या नेत्यांबद्दल काय सांगता येईल ? असा प्रश्न विचारला तेव्हा प्रशांत दामले यांच्या चेहऱ्यावर एक मिश्किल हास्य उमटले.

ते म्हणाले की,"आजही काही नेते नाटक बघायला येतात. पण त्यांची संख्या कमी आहे. कारण बहुतांश नेत्यांची स्वतःचीच नाटके जोरात सुरू असतात. तरीही नेत्यांना मी आवाहन करीन की त्यांनी नाटक पाहायला यावे. त्यांच्यासोबत इतर कार्यकर्त्यांचेही पाय नाटकाकडे वळतात. नाट्यगृहांची अवस्थाही नेत्यांना आतून पाहता येते. त्यात सुधारणा होण्याची शक्यताही वाढते." तुमची नाटके विनोदी असली तरी इतकी चालण्याचे कारण काय ? यावर प्रशांत दामले यांनी सांगितले की, "माझी नाटके लोकांना हसवतात हे खरे आहे. पण त्या हसण्यातून त्यांचे मन शांत होते. अशा शांत मनात शेवटी एखादा चांगला विचार माझे नाटक देते आणि तो विचार लोकांना काही तरी नवीन प्रेरणा देऊन जातो. त्यामुळे लोक पुन्हा पुन्हा ही नाटके पाहायला येत असावेत."

बन्सल क्लासेस आणि राजस्थानी मल्टिस्टेट यांनी अकोला, नांदेड, परळी वैजनाथ, लातूर, जालना, छत्रपती संभाजीनगर अशा विविध शहरांत इतर कुठला कार्यक्रम न घेता एका मराठी नाटकाचे प्रयोग आयोजित केल्याबद्दल त्यांनी आयोजकांना धन्यवाद दिले.

# पक्षाने संधी दिली तर निवडणूक लढणार व्यापारी सारंग मुंदडा

## भोकर बाजार समिती निवडणूक

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शेतक-याच्या हिताचे निर्णय घेऊन बाजार समिती नावारूपाला आणण्यासाठी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी सतत पाठपुरावा केला.आता निवडणूक जाहिर झाल्याने अनेक इच्छुकाची गर्दी वाढली आहे.व्यापारी मतदार संघातून



येथील नवयूवक व्यापारी सारंग मूंदडा हे ईच्छुक आहेत. पक्षश्रेष्ठिने मला सेवेची संधी दिली तर रिंगणात उतरणार अशी माहिती श्री.मुंदडा यांनी पत्रकारांशी बोलताना दिली आहे.

# येथील बाजार समिती तेलंगणा सिमेवर असल्याने तालूका व परराज्यातील शेतकरी आपला माल येथील बाजार पेठेत आणतात.शेतक-याची हेळसांड होऊ नये म्हणून बाजार समिती नेहमी शेतकऱ्यांच्या बाजूंनी भक्कमपणे उभे असते.नावारूपाला आलेल्या बाजार समितीवर ताबा मिळवण्यासाठी निवडणूक जाहिर होताच विविध पक्षांचे पुढारी राजकीय डावपेच आखत आहेत..नुकतेच बाजार समिततीवर प्रशासक नियुक्त केल्याने विकास कामे ठप्प झाली होती.आता निवडणुका जाहीर झाल्याने उमेदवारी पदरात पाडून घेण्यासाठी खटाटोप सुरू झाला आहे. कोणबाजी मारेल हे आतातरी स्पष्ट सांगतां येत नाहीं कारण घोडामैदान पुढे आहे. वेवेगळ्या मतदार संघात राजकीय पक्षांनी उमेदवारांची चाचपणी सुरू केली आहे.

### व्यापारी मतदार संघ

होऊ घातलेल्या निवडणुकीत सर्वच मतदार संघात राजकीय पक्ष दंड थोपटून आहेत.व्यापारी मतदार संघात काँग्रेस पक्षाकडून अनेक इच्छुकांनी मागणी केली असली तरी काहि राजकीय पेचामूळे मातब्बर उमेदवार अडचणीत आले आहेत. प्रसिद्ध व्यापारी सारंग मूंदडा हे काँग्रेस पक्षाच्या हायकमांडच्या विश्वासातले असून मोंढ्यातील आप्तस्विकीय व्यापारी, मर्जीतील मंडळीनी त्यांना मुकसंमती दिल्याने त्याची जमेची बाजू आहे असे समजते.ईतर पक्षातील ऊमेदवारहि याच मतदारसंघात नशिबी आजमावण्यासाठी जोरदार हालचाली सुरु केल्या आहेत.काग्रेसपक्षानी मला सेवेची संधी दिली तर मी सदैव व्यापारी व शेतकरी याच्या भल्यासाठी झटत राहिले अशी ग्वाही श्री .मूंदडा यांनी दिली आहे.

# जालना तालुक्यातील 245 गावात जलताराच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात



**परतुर :** आर्ट ऑफ लिविंग सोशल प्रोजेक्टच्या माध्यमातून परतुर मंठा आणि जालना तालुक्यातील 245 गावांमध्ये शेतकऱ्यांच्या शेतामध्ये प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली आहे या प्रकल्पाच्या माध्यमातून 245 गावातील प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये चार बाय चार आणि सहा फूट खोल जलतारा पीठ ची निर्मिती करण्यात येत आहे ज्यामुळे प्रति खड्ड्यांमध्ये 30 हजार लिटर पाणी भूगर्भामध्ये मुरण्यास मदत होणार आहे हा पूर्ण प्रकल्प शेतकऱ्यांसाठी आणि कोरडवाहू आणि अवर्षणग्रस्त भागातील पाणी पातळी वाढवण्यासाठी कमालीचा उपयोगाचा होणार आहे. मंठा तालुक्यातील खांबेवाडी, किनखेडा, रामतीर्थ, एरंडवडगाव, किरला,तर परतुर तालुक्यातील पांडेपोखरी,सातोना, येथे शेतकऱ्यांच्या उपस्थितीत उत्साह पूर्ण वातावरणामध्ये उद्घाटन करून जलतारा कार्यास सुरुवात झाली आहे.

मागील दोन वर्षापासून मंठा तालुक्यातील टंचाईग्रस्त 50 गावांमध्ये या प्रकल्पाच्या माध्यमातून पाण्याची प्रचंड पाणी पातळी वाढली सोबत अतिवृष्टीमध्ये मातीचे व पिकाचे संरक्षन जाले. जलतारा योजना शेतकऱ्यांना नव संजीवनी ठरत आहे. या योजनेबद्दल शेतकऱ्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत आहे. या योजनेचे समन्वयक प्राध्यापक डॉक्टर पुरुषोत्तम वायाळ व अमेरिकेतील मनु निंबोधरी, आर्ट ऑफ लिविंग सोशल प्रकल्पाचे समन्वयक गजानन वायाळ विवेक काकडे, प्रकाश जाधव व जलताराचे शंभर प्रतिनिधी परतूर मंठा व जालना तालुक्यातील 245 गावांमध्ये यावर्षी जलताराही योजना राबवण्यासाठी परिश्रम करत आहेत.

### जल ही जीवन है ! जलसंधारणातून ... ग्रामसमृद्धी डॉ . पुरुषोत्तम वायाळ जलतारां

जलसंधारणातील अत्यंत सोपी परिणामकारक व कमी कालावधीमध्ये जलतारा ही आम्ही शोधलेली योजना आज शेतकऱ्यांसाठी नवसंजीवनी ठरत आहे . संपूर्ण गावाच्या परिक्षेत्रामधील पाण्याची पातळी तर वाढतेच सोबत अतिवृष्टीमध्ये मातीचे व पिकाचे संरक्षण होऊन पिके चिभडत नाहीत . आज शेतकऱ्यासमोर असलेली ही दोन्ही संकटे या योजनेच्या माध्यमातून पूर्णपणे संपली आहेत . गावे पाणीदार होत आहेत व शेतकऱ्यांची वाटचाल आर्थिक समृद्ध तिकडे होत आहे . याचा सार्थ अभिमान आहे







# जागतिक क्षयरोग दिननिमित्त वैजापुरात जनजागृती फेरी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर:** क्षयरोग होतो बरा-उपचार नियमित करा",बिडी ,सिगारेट तंबाखू सोडू-क्षयरोगाला मातीत गाडू"आरोग्य हीच संपत्ती" क्षयरोगाला पळवू या-आरोग्यदायी जीवन जगू या"अशा घोषणा देत पालिकेच्या मौ,आझाद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शुक्रवार( ता,२४ ) रोजी क्षयरोग जनजागृती फेरी काढून क्षयरोग बाबत नागरिकात जागृती केली,राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत या फेरीला जिल्हा आरोग्य समिती चे सदस्य तथा जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी हिरवा ध्वज दाखविला, उपजिल्हा रुग्णालय, पालिका मौ,आझाद विद्यालय




,तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय,संपूर्ण सुरक्षा केंद्र,आय,सी,टी,सी, क्षयरोग पथक वैजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ही फेरी आयोजित करण्यात आली होती, फेरीच्या समारोप प्रसंगी त्यांनी उपस्थिताना संबोधित करतांना सांगितले की२०२५पर्यंत देशातून ह्या आजाराचे समूळ उच्चटन करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने समाजात या आजाराचे दुष्परिणाम सांगून बिडी,सिगारेट, तंबाखू, दारू पासून दूर राहण्याचे आवाहन केले,अंगात ताप असणे,१५दिवसापेक्षा जास्त दिवस खोकला असल्यास,व थुंकीतून रक्त आल्यास, छातीत दुखत असल्यास रुग्णालयात जाऊन तपासणी करावी नियमित औषध, नियमित तपासणी व पौष्टिक आहार,शुद्ध हवेत राहणे याने क्षयरोग पूर्णपणे बरा होतो, या प्रसंगी मुख्याध्यापक जी,जी,राजपूत, उपमुख्याध्यापक बी,बी,जाधव,नीता पाटील,राजश्री बंड, ज्योती दिवेकर,गोकुळ राठोड, शशिकांत पाटील,

रामेश्वर नारळे, प्रशांत गिरी,राजेंद्र लाटे, जी,के,दिवेकर, मनीषा जाधव,सिद्धेश्वर पास्ट, नितीन जाधव,विक्रम वाळके,पांडुरंग गवळी,साईनाथ बारगळ,बाबा हिंदुस्थानी,श्याम उचित,लता सुखासे,सुवर्णा बोर्डे, श्रीमती शेलार यांनी सहभाग नोंदविला.



# वैजापूर येथे उद्या रविवारी जगदंबा देवीची पालखी मिरवणूक व यात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर:**वैजापूरचे वैभव व आराध्य दैवत असलेल्या श्री जगदंबा देवीची यात्रा रविवार रोजी आहे,या निमित्त देवीच्या मूर्तीची भव्य पालखी मिरवणूक रविवार( ता,२६ )रोजी सायंकाळी पांच वाजता देवीचे पुजारी श्री राजस ( भाटिया महाजन वाडी )यांच्या घरापासून निघून शहरवासीयांच्या दर्शनासाठी प्रमुख रसत्यावरून जाणार आहे, व देवी मंदिरात महाआरती होणार आहे.

या निमित्त देवीचा इतिहास माहीत व्हावा व शहराचा इतिहास माहीत व्हावा म्हणून शहरातील वैद्यनाथ महादेव मंदिर येथे शुक्रवार( ता,२४ )रोजी पुजारी श्री राजस व जेष्ठ नागरिक तथा जेष्ठ समाज कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी महिला मेळाव्यात या बाबत सखोल माहिती दिली, व देवीच्या उत्सवात शहरातील महिला-पुरुषांनी हजारोच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन केले,या वर्षी पालखी मिरवणूकित मुख्य आकर्षण आदिवासी भोवाडे व नृत्य ,तसेच महिषासुर मर्दानी देखावा,व नवदुर्गा देखावा असणार आहे, तसेच लेझीम पथक व बँड जुगलबंदी असणार आहे ,तरी समस्त गावकरी व यात्रा कमिटी यांनी सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे, या मेळाव्यात संतोषी लालसरे,सौ,पवार,मनीषा राजपूत, वैशाली साखरे,श्रीमती लालसरे, श्रीमती रामैय्या यांची प्रमुख उपस्थिती होती

# जिंतूर बसस्थानकावर असुविधांमुळे प्रवाश्यांचे हाल

## सुलभ स्वच्छता गृहाचे दर अवाजवी, महाराष्ट्र राज्य प्रवासी संघटना व ग्राहक पंचायत ने दिले निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** येथील बस आगार मध्ये प्रवासी नागरिकांना अनेक असुविधांचा सामना करावा लागत आहे .प्रवासी संघटना व अखिल भारतीय ग्राहक पंचायत समितीने विभागीय नियंत्रण परभणी यांना दिनांक 23 मार्च रोजी निवेदन देण्यात आले आहे.

तालुक्यातील 170 गावांचा कारभार जिंतूर आगारा मार्फत नागरिकांच्या सुविधासाठी बसचा उपयोग केला जातो. परंतु अनेक दिवसांपासून जिंतूर आगारातील नागरिकांना मूलभूत सुविधा पासून वंचित रहावे लागत आहे. प्रवासी संघटने कडे अनेक प्रवाशांनी तोंडी स्वरूपात तक्रारी देण्यात आल्या .त्या तक्रारीची दखल घेऊन प्रवासी संघटना व अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या वतीने बस स्थानकामध्ये मध्ये प्रवाशांना पिण्याचे पाण्याची व्यवस्था करावी, बस प्लॅटफॉर्मवर लावावी, दर्शनी भागावर गावाच्या नावाचे बोर्ड बस मध्ये लावावा, प्रवाशांना बसताना व उतरताना वाहकाने सहकार्य करावे . महिला व ज्येष्ठ नागरिकांशी सौजन्याने वागावे. अनेक वाहक प्रवाशांची आरेरावची भाषा करीत आहेत. त्यांना योग्य त्या सूचना देण्यात याव्यात. बस दुरुस्ती असल्या शिवायत पुढील



प्रवासाला पाठवू नये. अनेक वेळा बस नादुरूस्त असल्यामुळे प्रवाशांना मधेच प्रवास सोडून दुसऱ्या वाहनाने प्रवास करावा लागत आहे. डिझेलच्या अडचणीमुळे अनेक बस बंद केले आहेत. त्या पुर्ववत चालू कराव्यात. जिंतूर बस स्थानकातील सुलभ स्वच्छालय गृहामध्ये महिला व नागरिकांची जास्त पैसे घेऊन लूट केली जात आहे. ती लूट थांबवावी अशा मागण्या प्रावासी संघटनेच्या व अखिल भारतीय ग्राहक पंचायत वतीने आगार प्रमुख एम.बी. जवळेकर,डि डी पांचाळ, जिंतूर, जिल्हाधिकारी कार्यालय परभणी यांच्याकडे करण्यात आले आहेत .या निवेदनावर प्रवासी संघटनेचे तालुकाध्यक्ष सचिन रायपत्रीवार, संघटक किशोर पारडे, व अखिल भारतीय ग्राहक पंचायत तालुकाध्यक्ष गुलाबराव शिंदे ,सचिव मंचकराव देशमुख मार्गदर्शक चंद्रकांत गवळी उपाध्यक्ष महेश देशमुख, प्रल्हाद टाकरस अनेक सदस्यांच्या स्वाक्षरी आहेत.

# स्वेरीज कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये पालक मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**गोपाळपूर (ता. पंढरपूर) :**येथील स्वेरी तथा श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित बी. फार्मसीमध्ये पालक मेळावा नुकताच संपन्न झाला. या मेळाव्यात विद्यार्थी व पालकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन स्वेरीतील शैक्षणिक संस्कृती व सुविधांबद्दल समाधान व्यक्त केले.

स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ.बी.पी. रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली व स्वेरीच्या बी.फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांच्या नेतृत्वाखाली हा पालक मेळावा घेण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून एस.जी. कांबळे तसेच महिला पालक प्रतिनिधी सौ.दीप्ती गडम तसेच श्रीकांत बिस्किटे हे उपस्थित होते. प्रास्तविकात प्रा.प्रदीप जाधव यांनी महाविद्यालयाची, उच्च शिक्षित प्राध्यापकांची, उपलब्ध साहित्य साधनांची माहिती करून देताना महाविद्यालयात उपलब्ध सोयी, सुविधा, कमवा आणि शिका योजना, रात्र अभ्यासिका, अत्याधुनिक प्रयोगशाळा, सोलार रुफ टॉप पॉवर प्लांट, प्ले ग्राउंड, जिमखाना, लायब्ररीमध्ये उपलब्ध असलेली अभ्यासक्रमाची व स्पर्धा परीक्षेसाठी लागणारी संदर्भ पुस्तके, वसतिगृहातील सुविधा, बसेसची सुविधा, १०२४ एम.बी.पी.एस. लिज लाईन क्षमतेची वाय-फाय इंटरनेट सुविधा, फीडबॅक सिस्टम तसेच औषधांची निर्मिती कशी होते हे पाहण्यासाठी थेट आयव्ही अर्थात




**स्वेरी कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये पालक मेळाव्या प्रसंगी दीपप्रज्वलन करताना डावीकडून पालक प्रतिनिधी श्रीकांत बिस्किटे, प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, महिला पालक प्रतिनिधी सौ.दीप्ती गडम, प्रमुख अतिथी एस.जी.कांबळे व प्रा.जी.बी.कंदले.**

इंडस्ट्रीयल व्हिजीट आदी आवश्यक बाबींची माहिती दिली. प्रमुख पाहुणे एस.जी.कांबळे म्हणाले की,'विद्यार्थ्यांना फॉरेन एज्युकेशनच्या संधी उपलब्ध करून त्यांना फॉरेन एज्युकेशनबद्दल आवड निर्माण होण्याबाबत प्रयत्न करावेत.' सौ.दीप्ती गडम म्हणाल्या की, 'स्वेरीत डॉ. रोंगे सरांच्या मार्गदर्शनाखाली आमच्या पाल्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे करिअर देखील उज्वल होत आहे.' प्राचार्य डॉ.मणियार म्हणाले की, 'विद्यार्थी व पालकांनी या महत्वाच्या शैक्षणिक वर्षात काळजी घ्यावी. पालकांनी वेळोवेळी आमच्या प्राध्यापकांशी संवाद साधून पाल्याची प्रगती जाणून घेतल्यास पाल्य अधिक जागरूक राहून अभ्यास करू शकतो. आपल्या प्रत्येकाच्या विश्वासामुळे आम्हाला ज्ञानदान करण्यासाठी अधिक बळ मिळते.' असे त्यांनी प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबद्दल अथवा शैक्षणिक शंका, अडचण असल्यास त्वरीत संपर्क साधण्याचेही त्यांनी आवाहन केले. यानंतर अनेक पालकांनी महाविद्यालय आणि संस्थेच्या शिक्षणप्रणाली बाबत समाधानी असल्याच्या प्रतिक्रिया दिल्या. त्यात डॉ.जाधव यांनी स्वेरीची शिस्त व मुलींच्या सुरक्षितेबद्दल कॉलेजची प्रशंसा केली. कार्यक्रमानंतर पालकांनी आपल्या पाल्यांचे वर्गशिक्षक व प्राचार्यांच्या भेटी घेवून पाल्याच्या प्रगतीबाबत विचारणा करून अधिक माहिती जाणून घेतली. यावेळी महाविद्यालयात 'फार्मासिस्ट डे' निमित्त घेतलेल्या विविध कौशल्यात्मक स्पर्धांची प्रमाणपत्रे प्रमुख मान्यवरांच्या हस्ते वितरीत करण्यात आली. यावेळी सोलापूर जिल्ह्यासह लगतच्या जिल्ह्यातील असे मिळून जवळपास १५० पालक, विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.ए.आर.चिक्काले यांनी केले, प्रा.जी.बी.कंदले यांनी आभार मानले तर प्रा. एस.डी.तोरसकर यांनी कार्यक्रम समन्वयक म्हणून काम पाहीले.

# भगवान झुलेलाल जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक

**पैठण :** सिंधी समाजाचे आराध्य दैवत भगवान झुलेलाल यांची जयंती आयोलाल झुलेलालच्या जयघोषात व फटाक्यांच्या आतषबाजीत उत्साहात साजरी करण्यात आली.

गुरुवारी सायंकाळी उदासी महाराज मठ, गागाभट्ट चौक येथून भगवान झुलेलालची भव्य मिरवणूक काढण्यात आली.यावेळी भगवान झुलेलाल व पूज्य बैराणा साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन माजी जि प सभापती विलास बापू भूमरे,राज्य दूध संघाचे अध्यक्ष नंदलाल काळे, माजी नगराध्यक्ष सोमनाथ परदेशी,दत्ता गोर्ड, डॉ सुनील शिंदे,किशोर चौहान,सिंधी समाजाचे अध्यक्ष श्याम पंजवानी ,उदासी मठाचे नानक वेदी यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी भगवान झुलेलाल यांची प्रतिमा सजविलेल्या रथात ठेऊन फटाक्याची आतिशबाजी करीत मिरवणूक काढण्यात आली. सदरील शोभायात्रा गागाभट्ट चौक,छत्रपति शिवाजी महाराज चौक,.बसस्थानक, खंडोबा चौक ते गोदावरी तीरापर्यंत ही मिरवणूक नेण्यात आली, गोदावरी नदी तटावर विधिवत पूजा आरती,पल्लव,अरदास करून बैराणा साहिबचे नदीत विसर्जन करण्यात आले. या मिरवणुकीत सिंधी समाजाचे प्रमुख राजकुमार रोहरा, दीपक आहुजा, घनश्याम आहुजा, महेश मोतियानी, राम आहुजा, जगदीश पंजवानी, मुकेश पंजवानी, राम पंजवानी संत धवन, महेश रोहरा, मुकेश आहुजा, गोपी आहुजा, जगदीश आहुजा, गोपी आहुजा, यश आहूजा,राज पंजवानी,अभिषेक वेदी, कुमार सेजवानी, हरीश आहुजा , प्रशांत आहुजा , रवी रोहरा , किशन सेजवानी , प्रेम सेजवानी , दीपक मोतियानी, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.या प्रसंगी जीतू परदेशी मित्र मंडळाच्या वतीने मिरवणुकीस कोल्डड्रिंकचे वाटप करण्यात आले सिंधी महिला मंडळ अध्यक्ष डॉ रिया पंजवानी, उपाध्यक्ष सृष्टि रोहरा ,सचिव अनुष्का पंजवानी,कोषाध्यक्ष नेहा आहूजा यांच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमास कल्याण बरकसे ,डॉ पंडित किल्लारीकर,किशोर चौधरी,भूषण कावसनकर,तुषार पाटील,कृष्णा मापारी, अनिल घोड़के,बजरंग लिंबोरे,बादशहा परळकर,राजेंद्र मापारी,,पवन लोहिया,विजय पापडीवाल,संजय सारडा,सुनील देशमुख,अँड राजेंद्र गोर्ड,अप्पासाहेब गायकवाड,आदि उपस्थित होते.